ब्रह्मीं नित्यसुखानुभूतिरस त्या रंगेंचि जें रेखिलें,
कीं पुण्यार्णव देवकीजठरजें त्याही मिषें ओतिलें, ।
गोपींच्या कुचकुंकुमें करुनियां माळा गळां माखिली,
क्रीडान्तीं हरिमूर्ति सावधपणें ती एकली देखिली. ॥ १७६
गोपींच्या स्थिरजंगमासहित जो त्यांच्या पतींचा हरी,
आत्मा कारण संतदृष्टिस दिसे जो तंतु सर्वांबरीं ।
त्यांशीं सर्व निशा निशापतिमुखी ज्या क्रीडती सुंदरी,
त्यांला धन्य किती म्हणों ? त्रिभुवना ज्यांचीं कथा उद्धरी. ॥ १७७
कामी लोक तयांस ही निजकथाप्रीतिप्रद श्रीहरी,
विश्वोद्धारनिमित्त गोपललनाक्रीडा विचित्रा करी, ।
ऐसें आपणही करूं म्हणउनी जो कां अपेक्षा धरी
थोडेसें विष तो गळां न मिरवी कां हो ! शिवाचे परी ? ॥ १७८
गोपींतें रतिलाभ देउनि सदा जो ऊर्ध्वरेता हरी,
तेव्हां तत्पति मानिती निजभुजीं आलिंगिल्या सुंदरी; ।
जो लक्ष्मीपति नित्य मुक्त करिती जे मूढ त्याची सरी,
ते तोंडें वर्णवा पिऊं न म्हणती, कां हो ! तयाचे परी ? ॥ १७९
गोपींच्या नटनश्रमें करुनि जो आला उबारा हरी,
कालिंदीसलिलामधें गजगतीं संगेंचि लीला करी; ।
संगें गौळणि मागती उपवनीं त्यांशीं रमे श्रीहरी,
भाग्यें गोपवधूंचिया क्रमिलिया ऐशा बहू शर्वरी. ॥ १८०
गोपीनाथकथारुची, सुजन हो ! ध्यों आपुलाल्या मना,
शृंगारामृत हेंचि ध्या त्यजुनियां दुर्वासना कामना; ।
गोपींतें अधरामृतें, कलियुगीं नामामृतें वामना
केलें धन्य, तया तुम्ही फुकट कां नेधों जगजीवना ? ॥ १८१

---

१. ब्रह्मसुखाचा प्रत्यय हाच रस. २. पुण्यसागर. ३. उदरजें. (कृष्णें.) ४. सकल वस्त्रांमध्यें. ५ चंद्रवदना. ६. कामुक. ७. गोपीसह विलास. (ललना=स्त्री.) ८. इच्छा. ९. प्रमाणें, शिवासारखा. १०. ब्रह्मचारी. ११. बरोबरी. १२. कृष्णानें बारा गांव अग्नि भक्षिला या गोष्टीकडे कविकटाक्ष आहे. १३. नाचणें. १४. 'तोही उबारा हरी' असा अन्य पाठ. १५. पाणी. १६. गजगामिनी स्त्रिया. १७. 'गजगती तज्जाति क्रीडाकरी' असें पाठांतर आहे. १८. पुनः. १९. बागेंत. २०. रात्री. २१. ध्यान करा. २२. घेत नाहीं.

[1]जो नेणे विषयाविणें रुचि तया आम्हा तुम्हां कारणें
केला '**गोपवधूविलासरस**' हा विख्यात नारायणें, ।
त्याही ऊपरि काव्यनाटकमिषें शृंगार जो पाहणें ।
या श्रीकृष्णकथामृतीं न रमणें धिग् धिक् तयाचें जिणें. ॥ १८२
गाईचें शिशु तें पशू, परि सुधा ते तों श्रवे त्या मिसें,
कर्मे आचरती समस्त हि ऋषी वेदोदितें[*] त्या रसें, ।
लोकोद्धारनिमित्त गोपललनासंगें मुकुंदें असें
केलें, त्या चरितामृता शुकमुखें राजर्षि प्याले तसे. ॥ १८३
देतां ही विष पावली अमृतता ते राक्षसी पूतना,
[6]नीवीमोक्ष अपेक्षितांचि चढल्या वैकुंठ गोपांगना; ।
द्वेषें दानव शत्रु दैत्य तरले ऐशा जगज्जीवना
ध्या प्रेमें श्रवणें करूनि हृदयीं हे वामनप्रार्थना. ॥ १८४

गोपीगीत.

([9]शुद्धकामदावृत्त.)

प्रकटलासि तूं नंदगोकुळीं, म्हणुनि [10]इंदिरावास येस्थळीं ।
सकळ ही सुखी या [11]व्रजीं हरी! विरहदुःखिता गोप[12]सुंदरी. ॥ १

---

१. ज्या तुम्हां आम्हां विषयरसाशिवाय कशाचीही रुचि कळत नाहीं त्या तुमच्या आमच्या-सारख्या सामान्यजनासाठीं कृष्णानें हा 'गोपवधूविलासरस' केला—असें तात्पर्य. २. या प्रकरणास 'गोपवधूविलासरस' अशी संज्ञाही साजण्यासारखी आहे. ३. पृष्ठ २०९ टीप १० व पृष्ठ ३५३ टीप ६ पहा. ४. वेदप्रतिपादितें. ५. अमरत्व, मुक्ति. ६. निरी सोडणें. ७. 'ध्या कानें, नयनें मनें करुनियां हे वामनप्रार्थना' असाही पाठ आहे. ८. हें प्रकरण दशमस्कंधाच्या ३१ व्या अध्यायास अनुसरून रचिलेलें आहे. रासक्रीडा समाप्त झाल्यावर गोपींना स्वसौंदर्याचा गर्व झाला असें पाहून कृष्ण अदृश्य झाला. त्या समयीं विरहव्याकुळ होऊन गोपी मधुवनांत कृष्णाचे गुण गात गात त्यास शोधूं लागल्या. या काव्यांत गोपीकृत कृष्णगुणगीत आहे, म्हणून याला '**गोपीगीत**' असें नांव दिलें आहे. हें समश्लोकरूप काव्य अत्यंत लोकप्रिय असून याच्या म्हणण्याचा पाठ फार आहे. या काव्याचें वृत्त कामदा. या प्रकरणास 'गोपिकास्तुति' अशी संज्ञा एका जुनाट प्रतींत आ-ढळते. ९. या वृत्ताच्या प्रत्येक पादाची न, र, र, एक लघु व एक गुरु अक्षर अशी यथानुक्रम रचना असते. १०. लक्ष्मीवास. ११. गोकुळ. १२. गोपांगना.

प्रकट होइं तूं विश्वभूषणा! प्रियतमा! त्वरें दावि आपणा, ।
हुडकितों तुतें गोपकामिनी, तुजवरी हरी! प्राण ठेवुनि. ॥ २
कमळगर्भिचे[३] श्रीसें[४] [५]जे हरी करिं कृपा तये दृष्टिनें हरी! ।
सुरतनाथ[७]! तूं शुल्कदासिका[८] वंटकि गोपिका त्या तुझ्या फुका. ॥ ३
वैरं[१०] हि देउनी आस लावुनी विरहकूपिं या माजि घालुनी, ।
तदुपरी हरी! दोर कापणें तरि मृतासही[११] काय मारणें? ॥ ४
विगतदर्प[१२] तो सर्प कालिया, करुनि रक्षिलें गोकुळास या, ।
विषजलाचिया[१३] नाशुनी भया, विरहसागरीं घातलें प्रिया. ॥ ५
व्रज गिळूं म्हणे त्या अघासुरा[१४] अजगरासि[१५], कारुण्यसागरा[१६]! ।
वधुनि रक्षिलें, त्या तुला हरी! व्रजवधूंवरी कोप कां तरी? ॥ ६
प्रळयमेव[१७] ही वर्षतां वरी [१८]गिरि धरूनियां रक्षिल्या, हरी! ।
प्रळय तो स्वयें त्यां वरी करी कठिण चित्त हें आजि कां परी? ॥ ७
पिउनि अग्नि[१९] तूं ज्यांस रक्षिसी, विरहअग्निनें आजि जाळिसी! ।
हरुनि सर्व ही आमुचीं भयें विरहसंकटीं घालिशी स्वयें. ॥ ८
नव्हसि गोपिकासुत[२०] निश्चयें, सकळअंतरीं साक्षि[२१] तूं स्वयें, ।
यदुकुळीं विधिप्रार्थनामिषें[२२] भुवन[२३] तारिशी या कथारसें. ॥ ९
म्हणुनियां तुतें प्रार्थितों हरी! सफळ आमुची प्रार्थना[२४] करीं, ।
प्रकट शीघ्रें[२५] तूं होउनि प्रिया अभय देउनी छेदिंजे भया. ॥ १०
भवभयास ही दूरि जो करी निवति[२६] लागतां गोपसुंदरी; ।
अभयहस्त[२७] तो आमुच्या शिरीं करुनियां कृपा ठेविं गा! हरी! ॥ ११

---

१. शोभितों. २. आमचे पंच प्राण तुझ्यावर अवलंबून आहेत. ३. कमळाच्या गाभ्यांतील. ४. शोभा. ५. दृष्टि. ६. चोरी. ७. संभोगपते. ८. 'भोगदायका' असाही पाठ आहे. शुल्कदासिका=वेतन घेऊन सेवा करणाऱ्या दासी. ९. 'दासि गोपिका तूझिया फुका' असा अन्य पाठ. १०. 'विरह देउनी, आस लावुनी, सकळ ही अडामाजि घालुनी' असा अन्य पाठ. ११. जो आधींच मेला त्यासच. १२. गर्वहीन. १३. विषयुक्त उदकाच्या. १४. अघासुर हाच अजगर. १५. 'अजगरा तया जी रमावरा' असाही पाठ आहे. १६. 'कापट्यसागर' असाही पाठ आहे. १७. अतिवृष्टिप्रसंगीं. १८. गोवर्धनपर्वत. १९. द्वादश गांवें अग्नि गिळून व्रजाचें संरक्षण केलें-अशी कथा आहे. २०. यशोदासुत. २१. पाहणारा, प्रेक्षक. २२. विश्वतारणासाठीं अवतार घे अशी ब्रह्मदेवानें प्रार्थना केली म्हणून. २३. विश्व. २४. कामना, इच्छा. २५. लौकर. २६. शांत होतात. २७. अभय देणारा हात.

प्रकटतां [1]रमा क्षीरसागरीं धरिशि तूं तिचा हात ज्या [2]करीं, ।
अभयहस्त तो [3]मस्तकावरी निवविं ठेवुनी गोपसुंदरी. ॥ १२
व्रजजनांचिया दुःखनाशका! [4]मदनदावि कां गोपनायिका! ।
[5]चेटिके आपुल्या ज्या तयांवरी हृदयिं एवढा कोप कां, हरी! ? ॥ १३
सहज दावुनी भाव हांससी, तरि तुं आमुचे [6]गर्व नाशिसी ।
नख न लावितां छेदणें जया, हरि! कुऱ्हाडि कां हाणणें तया? ॥ १४
अशुभ शीघ्र [7]जो वंदनें हरी, [8]कमलजा वसे ज्यांत सुंदरी, ।
[9]तृणचरांसवें हिंडतो वनीं, चरण ठेविं तो आमुचे स्तनीं. ॥ १५
निजसुखामृता लुब्ध होउनी, [10]भ्रमरि ज्यामधें [11]सिंधुनंदिनी, ।
पद[12]सरोज तें या कुचांवरी करुनियां दया ठेविं, गा! हरी! ॥ १६
रगडुनी फणां कालिया [13]फणी दवडिला खळांचा [14]शिरोमणी, ।
मदन दुष्ट हा आमुचे उरीं पदतळें तसा मर्दि गा! हरी! ॥ १७
हरुनि [15]दर्प [16]कंदर्प हा हरी दवडिं [17]कालियाचेपरी [18]अरी, ।
[19]रविसुता[20]ऱ्हदीं कालिया जसा, हृदयिं आमुच्या [21]कामही तसा. ॥ १८
मधुर [22]वैखरी बोल आमुशीं [23]निगम[24]रूपें जें [25]संतमानसीं, ।
विरहमूर्छिता या स्वकिंकरी [26]स्वाधरामृतें जीववीं, हरी! ॥ १९
तुझि कथा[27]सुधा [28]तापल्या जना निववि अंतरीं, विश्वजीवना! ।
अमृत निंदिती स्वर्गिचें मुनी, तव कथामृता वंदिती जनीं. ॥ २०
अमृत [29]मातवी स्वर्गिचें हरी! तुझि कथासुधा [30]बंध संहरी, ।
अमृत जे पिती त्यांचिया शिरीं चरण देउनी ने कथा वरी. ॥ २१
अमृत गोड तें जों जिभेवरी, तुझि कथासुधा गोड हे, हरी! ।
[31]श्रवणिं [32]आननीं बाह्य [33]अंतरीं मधुर [34]सर्वथा जे [35]परोपरी. ॥ २२

---

१. लक्ष्मी. २. हातानें. ३. 'आमच्या शिरीं' असाही पाठ आहे. ४. 'वदन दावि' असाही पाठ आहे. ५. दासी. ६. 'गर्भ नासिसी' असा अन्य पाठ. गर्भ=पुनर्जन्म. ७. जो चरण. ८. लक्ष्मी. ९. पशूंबरोबर. १०. 'भ्रमरी'शब्द येथें छंदोभंग न व्हावा म्हणून ऱ्हस्व केला आहे. ११. लक्ष्मी. (क्षीरसागरतनया.) १२. कमल. १३. सर्प. १४. श्रेष्ठ. १५. गर्व. १६. मदन. १७. कालियासारखा. १८. शत्रु. १९. यमुना. २०. डोह. २१. मदन. २२. वाणी. २३. 'सुगम जें रुचे सत्य मानसीं' असाही पाठ आहे. २४. वेदासारखी. २५. साधूंच्या मनांत. २६. आपल्या अधरामृत पानानें. २७. अमृत. २८. संसारतप्त. २९. मालवितें. ३०. संसारबंधन. ३१. कान. ३२. तोंड. ३३. आंतून. ३४. 'सर्वदां' असाही पाठ आहे. ३५. हा व्यतिरेकालंकार जाणावा.

कनक आणि ते गुंज जोखणें, तुझि कथा सुधातुल्य लेखणें[1], ।
सुलभ जे सदा सर्व ही स्थळीं अमृत तुच्छ[2] तें देवताकुळीं ॥ २३
त्रिभुवनेश ! तूं त्या तुला जशी करिति तुल्यता ऊर्णनाभि[3]शीं, ।
अमृतसाम्य ही श्रीकथामृता, वदति तेथ हा भाव तत्त्वतां. ॥ २४
सवत[4] लक्षुमी ती तुझ्या उरीं तसिच मुक्ति ते श्रीकथेवरी, ।
बहु उदार जे जे अशी कथा श्रवण याचकां[5] देति सर्वथा. ॥ २५
सुजन याचकां अर्पिती धनें, परि मदासि[6] तीं होति साधनें, ।
हरि ! कथा तुझी विश्वपावनी[7] बहु उदार जे वर्णिती जनीं. ॥ २६
विरहें[8] जरी प्राण टाकिती[9] तरि कथामृतें गोपिका जिती, ।
परि हरी ! तुझे संगतीविणें मरण तें बरें, काय हें जिणें[10] ? ॥ २७
सरस[11] हास्य सप्रेम पाहणें[12] विहरणें चिदानंदलक्षणें, ।
करिति अंतरीं ध्यान जे मुनी, विसरती कशा गोपकामिनी ? ॥ २८
स्मरविलास[13] एकांतिचे वनीं बहु रुतोनि जे राहिले मनीं, ।
करिति आमुच्या क्षोभ मानसीं, कपटिया ! कसा गुप्त आमुशीं[14] ? ॥ २९
फिरसि [15]गोधनें चारितां वनीं, पद तुझें व्रजीं[16] आठवू मनीं, ।
दुखवतील कीं ते तृणांकुरीं[17] म्हणुनि बूडतों दुःखसागरीं. ॥ ३०
दिवस मावळे, येसि तूं व्रजा, नयनिं दाविशी श्रीमुखांबुजा[18], ।
कुरळ केश जे [19]भृंग ते जसे, वरि परांग[20] ते धूलिही दिसे. ॥ ३१
परतसी वनीं दैत्य मारुनी, दिससि थोर तूं वीरें[21] लोचनीं[22], ।
वदनें[23]चंद्र [24]सांजेस दावुनी, मदन सोडिसी आमुचे मनीं. ॥ ३२
पुरवि वंदनें सर्व कामना, चरण तो तुझा नंदनंदना ! ।
त्वरित ठेवुनी आमुचे कुचीं पुरविं ईतुकी[25] आस[26] आमुची. ॥ ३३

---

१. मानणें. २. क्षुल्लक. ३. कोळी, सुतेरा. ४. सपत्नी. ५. मागणाऱ्या जनांस. ६. गर्व. ७. विश्वातें पूत करणारी. ८. विरहानें. ९. 'कंठिती' 'काढिती' असे अन्य पाठ आहेत. १०. जिवंत असणें. ११. 'सुरस हांसणें प्रेम पाहणें' असा अन्य पाठ. १२. 'बोलणें' असाही पाठ आहे. १३. 'स्मरविलास जे दाविसी मनीं' असाही पाठ आहे. १४. 'मानसी' 'मारशी' असेही पाठ आहेत. १५. गाई. १६. गोकुळांत. १७. गवताच्या अग्रांनीं, कुसळांनीं. १८. मुखकमला. १९. भ्रमरासारखे. २०. पुष्परज. २१. वीराचें लक्षण असें:—'वीतरागभयद्वेषो रहितः सर्वसंशयैः । सर्वभूतानुकंपी च **वीर** इत्युच्यते बुधैः ॥.' २२. 'ये विलोचनीं' असा अन्य पाठ आहे. २३. 'इंदु' असाही पाठ आहे. २४. संध्याकाळीं. २५. 'एवढी' असाही पाठ आहे. २६. आशा.

सतत पूजिला जो [1]चतुर्मुखें, वसति ज्यामध्यें सर्वही सुखें, ।
[2]धरणिला अलंकार या वनीं, चरण ठेवि तो आमुचे स्तनीं. ॥ ३४
सकळ संकटीं [3]ध्येय अंतरीं, स्मरति त्यांचिया आपदा [4]हरी, ।
त्वरित गोपिकांच्या [5]पयोधरीं चरण आपुला ठेवि तूं, हरी ! ॥ ३५
सुरत वाढवी, शोक जो हरी, [6]स्वरित वेणुनें [7]चुंबिलाधरीं, ।
विसरवी जनां सर्व [9]रक्तता त्वरित पाजि त्यां स्वाधरामृता ॥ ३६
सुरततृप्ति ही झालियावरी, अधर जो तुझा चुंबितां, हरी ? ।
सुरतवासना होय मागुतीं अमृत तेथिंचे दे रमापती ! ॥ ३७
ढकलुनी युगासारिख्या [10]त्रुटी, दिवस कंठुनी थोर संकटीं, ।
नयनिं पाहतां श्रीमुखाप्रती लवति पापण्या त्या न [11]सोसती. ॥ ३८
नयनिं पाहतां तूज माधवा ! करिति पापण्या विघ्न जेधवां, ।
करुनि [12]अंगुलीभंग तेधवां बहुत निंदिती [13]पद्मसंभवा. ॥ ३९
[14]न पुरती मुखा पाहतां [15]धणी, करिति पापण्या विघ्न पापिणी, ।
[16]कपटिया अशा ज्या [17]विलासिनी त्यजिल कोण त्यां तूजवांचुनी ? ॥ ४०
[18]कुलपतीसुतभ्रातृबंधुतें त्यजुनियां शठा ! पावलों तुतें, ।
स्वरित्त मोहिल्या गोपसुंदरी त्यजिल कोण रात्रीं वनांतरीं ? ॥ ४१
पूर्व सूचना कळति आम्हुतें, तरि न धांवतों काननीं तुतें, ।
कशि निराश विश्वासघातका ! करुनि मारिल्या दासि गोपिका ?॥ ४२
वदन लोचनीं पाहतां, हरी ! अजि[20] विशाळता देखतां उरीं, ।
उपजती मनीं कामकामना घडि घडि [21]स्पृहा वाढते मना. ॥ ४३

---

१. ब्रह्मदेवानें. २. पृथ्वीला. ३. ध्यान करण्यास योग्य. ४. हरण करी. ५. स्तनांवर. ६. 'खरित' असाही पाठ आहे. स्वरित=स्वर करणारा. (पांवा.) ७. चुंबिला+अधरीं. हा संधि चिंतनीय होय. ८. 'विसरली जनीं सर्व सूचिता' असाही पाठ आहे. ९. 'शक्तता' असाही पाठ आहे. १०. निमिषाचा ३००० हिस्सा; निमेष=डोळ्याचें पातें एकदां लवण्यास लागणारा काळ. ११. कृष्णदर्शन अंतरतें म्हणून पापण्या लवणें सुद्धां न सोसे. १२. बोटें मोडणें. १३. ब्रह्मदेवाला. १४. 'पुनरपी' असाही पाठ आहे. १५. तृप्ति. १६. 'कपटिया कसें त्यागिलें वनीं, वरिल कोण यां तूजवांचुनी' असा अन्य पाठ. १७. स्त्रिया. १८. 'पतिसुतान्वयीं बंधु बंधुता त्यजुनि पातलों तूज अच्युता । मुरलिच्या रवें मोहिलों मनीं कपटि कोणसा टाकि यामिनी ॥' असाही पाठ आहे. 'पतिसुतादि हे बंधुबंधुता', 'पतिसुतादि हे सर्व टाकुनी तुजचि पावलों सर्व लंपुनी' असे अन्य पाठ आहेत. १९. आत्र. २० 'अति' असाही पाठ आहे. २१. [illegible]

विविध शब्द एकांतिचे तुझे, श्रवणिं ऐकतां काम[1] उपजे, ।
तुजविणें हरी! प्राण जातसे केरिं कृपाळ! बा! बांचती असें.[2] ॥ ४४
भुवनमंगळें[3] मूर्ति जे करी, व्रजजनास ते पावली, हरी![4] ।
त्यजुनि कोप, या गोपसुंदरी निववि दावुनी कामकौसरी.[5] ॥ ४५
चरण ठेवितां कर्कश[6] स्तनीं, बहु भितों मनीं गोपकामिनी, ।
फिरसि त्या पदीं तूं चहूंकडे, झणि तयासि ही रुतती खडे.' ॥ ४६
सकळ ही अशा गोपसुंदरी करिति गायनें त्या परोपरी ।
रडति सुस्वरें अश्रु लोचनीं[7] धरुनि लालसा[8] कृष्णदर्शनीं. ॥ ४७
रडति तों तयांमाजि ये हरी, प्रकट आपुलें रूप तो करी; ।
मदनमोहन[9] श्रीपति स्वयें पुसतसे तयांलागिं विस्मयें. ॥ ४८
वसन[10] पींवळें, हार कंधरीं,[11] नयनिं देखुनी गोपसुंदरी, ।
उठलिया[12] जशा प्राण आलिया, सकळ शक्ति त्या येति इंद्रियां. ॥ ४९
धरिति धांवुनी [13]एकि त्या करीं, धरिति एकि त्या पीत [14]अंबरीं, ।
भुज धरीति त्या एकि अंगदीं[15] कितिकिनीं मिठ्या घातल्या पदीं.[16] ॥ ५०
हरिपदीं तया नित्य वामनें[17] त्रिभुवनीं मिठी घातली मनें, ।
अमन या मनें वृत्ति गोपिका, सकळ झालिया चित्सुखात्मिका. ॥ ५१

---

[18]कंसवध.

(श्लोक.)

नवरसें भवरोगरसायनें[19] करि हरी करिती मुनि गायनें; ।
किमपि कंसवधीं रसें[20] देखिले, कथिन जे [21]मनिं वामनिं रेखिले. ॥ १

---

१. कामेच्छा. २. 'परि कृपाळवें बांचलों असें' असाही पाठ आहे. ३. जगताचें कल्याण. ४. 'फावली बरी' असाही पाठ आहे. ५. कौशल्य. ६. कठिण. ७. नेत्रांत. ८. इच्छा. ९. मदनास-मान मोहविणारा. (कृष्ण.) १०. वस्त्र. ११. कंठ. १२. कृष्णरूप प्राण येतांच गोपांगनास उठण्याची शक्ति आली. १३. कांहींजणी (गोपांगना). १४. पीतांबराच्या ठिकाणीं. १५. बाहुभूषणाच्या ठायीं. १६. 'भुज धरीति त्या एकि अंगठीं, कितिक त्या गळां घालिती मिठी' असाही पाठ आहे. १७. वामनपंडितानें. १८. कंसास मारण्यासाठीं कृष्णानें मथुरेंत प्रवेश केला, त्या प्रसंगीं तो कोणकोणास कसकसा भिन्नस्वरूप दिसला ह्याचें या प्रकरणांत वर्णन आहे. याला 'नवरस' असेंही दुसरें नांव आढळतें. हें प्रकरण अध्याय ३६-४४ यांच्या आधारें रचिलें असून यांत कंसवधाची कथा आहे. १९. भव (संसार) हाच रोग त्यावर रसायन (औषध). "रसायन म्हणजे शरीरांतील रसादि धातु उत्तम रीतीचे प्राप्त होण्याचा उपाय". (सार्थ वाग्भट–पृ० १३७२.) २०. शोक भय इत्यादि उत्कट मनोवृत्ति. २१. वामनानें मनांत आणिलेले नवरस.

रंगाचिया[1] दारवटांचि[2] हस्ती[3] मारूनि घे साग्रज[4] [5]दंत हस्तीं[6], ।
[7]देहीं गजाचे मदरक्तबिंदु तो मल्ल[8]रंगांत मुकुंद वंदूं. ॥ २
भिन्न भिन्न मतिच्या अवलोकीं देखिला कसकसा रस लोकीं, ।
श्लोक[9] एकचि वदे शुक राया, जे रसज्ञ तिहिं अर्थ कराया. ॥ ३
मल्लां[10] वज्र[11] गमे, नरां नृप गमे, काम[12] स्वयें स्त्रीजना,
गौळ्यां आप्त, नृपां खळां प्रभु[13], शिशु[14] मातापित्यांच्या मना; ।
कंसा मृत्यु[15], अशक्त पामरजनां, संतांसि तत्वामृत[16],
[17]श्रीशेषासन यादवां हरि दिसे रंगांत रामान्वित[18]. ॥ ४
दे मल्लां रस रौद्र[19], अद्भुत नरां, शृंगार नारीजना,
गौळ्यां हास्य, नृपांस वीर, करुणा मातापित्यांच्या मना; ।
कंसालागिं भयानकाख्य[20] रस दे, बीभत्स मूढां भ्रमे,
संतां शांतरस, स्वभक्तिरस[21] तो दे यादवां, या क्रमें. ॥ ५

---

१. मल्लयुद्धमंडपाच्या. २. दरवाजांतच. ३. कुवलयापीड नामक हस्ती. ४. अग्रज (बळराम) त्या सहित. ५. त्या हत्तीचा दांत. ६. हातांत. ७. ज्या कृष्णाच्या देहावर मारलेल्या गजाचे रक्तबिंदु आणि मदबिंदु (दानोदकबिंदु) उडाले होते. ८. मुष्टिर, चाणूर, शल, तोशलक इत्यादि मल्लांच्या युद्धस्थानीं. ९. 'मल्लानामशनिर्नृणां नरवरः' इत्यादि श्लोक. १०. यांत 'उल्लेख' नामक अलंकार आहे. याचें लक्षणः—'क्वचिद्भेदाद्ग्रहीतॄणां विषयाणां तथा क्वचित् । एकस्यानेकधोल्लेखो यः स उल्लेख इष्यते ॥' [साहित्यदर्पण–कारिका ६८२], 'एकस्य वस्तुनो निमित्तवशाद्यदनेकैर्ग्रहीतृभिरनेकप्रकारकं ग्रहणं तदुल्लेखः' [रसगंगाधर]. अनेकधर्मयुक्त वस्तूला (पदार्थाला) त्या त्या धर्मामुळें अनेकांनीं अनेक प्रकारें मानिलें (उल्लेखिलें) असतां तेथें उल्लेख नामक अलंकार होतो. या पद्यांत श्रीकृष्णास मल्ल, मनुष्य, स्त्रिया, गोपाळ, दुष्ट नृप इत्यादिकांनीं वज्र, नृप, काम, आप्त, शास्ता इत्यादि प्रकारें मानिलें (लेखिलें) आहे म्हणून येथें 'उल्लेख' अलंकार आहे. याचें दुसरें उदाहरणः—'तो राजा सौंदर्यानें स्त्रीजनांस काम, दातृत्वानें याचकांस कल्पवृक्ष आणि पराक्रमानें अरिजनाला यम असा वाटला.' येथें एकाच पुरुषाच्या ठायीं तीन गुण आहेत म्हणून त्या त्या गुणानें स्त्रियांस मदन, याचकांस कल्पवृक्ष आणि शत्रूंस काळ असा एकच पुरुष तिघांस भिन्नभिन्न वाटला. जेव्हां एकाच पुरुषाला भिन्नभिन्न गुणांमुळें एकच पदार्थ अथवा पुरुष निरनिराळ्या पदार्थांसारखा अथवा पुरुषासारखा वाटतो, तेव्हांही हाच अलंकार होतो, जसें—'हा राजा वाक्पटुत्वें गुरु, सुयशें अर्जुन, शरासनें भीष्म आणि प्रतापें तपन—असा मला वाटतो.' येथें उल्लेख करणारा एकच पुरुष आणि गुण मात्र भिन्नभिन्न आहेत, यांत एकच मनुष्य (कवि) अनेक प्रकारचा उल्लेख करीत आहे. ११. जो (कृष्ण) मल्लांला वज्रासारिखा कठोर दिसला. १२. जो स्त्रियांना प्रत्यक्ष मदन दिसला. १३. शास्ता. १४. बालक. १५. काल. १६. ब्रह्मज्ञानामृत. १७. शेषशायी. १८. बळरामयुक्त. १९. या प्रसंगीं निरनिराळ्या लोकांस कृष्णाचे ठिकाणीं भिन्नभिन्न नवरस दिसले त्यांचें यांत वर्णन आहे. २०. भयानक नांवाचा रस. २१. भक्तिरस हा दहावा रस होय.

नवरस हरि दावी यांत मल्लादिदृष्टी,
करि [1]दशम रसाची यादवांमाजि वृष्टी; ।
रस दश कथिले जे ज्या क्रमें श्रीशुकानें,
हरिगुणरस तैसे घ्या सुखें आणि कानें. ॥ ६
दहा रस श्रीशुक बोलिला, हो! त्यांचा क्रमें घ्या श्रवणादि [2]लाहो; ।
रसीं प्रतिश्लोकरसावलोकीं गुणामृतप्राशन मृत्युलोकीं. ॥ ७
वधुनि [3]दारवटांचि [4]महाकरी उभय दंत [5]सहाग्रज घे करीं, ।
गज वधूनि मृगांत जसा [6]हरी त्वरित [7]मल्लदळांत निघे हरी. ॥ ८
रंगांगणीं लक्षुनि [8]कैटभारी, मत्राहुनी मानिति मल्ल भारी, ।
ऐशा हरी रौद्ररसाशि दावी, कथारसाची रुचि हे वदावी. ॥ ९
[9]भोजराज [10]विगतप्रभ झाला, श्रीपती नृप गमे मनुजांला. ।
दाखवी सुरस [11]अद्भुत लोकीं कीं असें जन मला अवलोकीं.॥ १०
सर्वांगशृंगाररसास नेत्रीं [12]कीं रंग दावूनि [13]कुरंगनेत्रीं, ।
[14]अनंगरंगांबुधिच्या [15]तरंगीं रंगीं करी व्याकुळ [16]अंतरंगीं. ॥ ११
शरीर [17]रक्तांकित, दंत [18]हस्तीं येतो कसा डोलत मत्त हस्ती? ।
म्हणोनि जे हांसति [19]सख्यभावें, गोपाळ हा हास्यरस स्वभावें. ॥ १२
'घेऊनियां याच [20]नृपासनातें, करील आम्हांवरि शासनातें.' ।
वाटे असें दुःख नृपांसि भारी, [21]वीराख्य दावी रस कैटभारी. ॥ १३
कृष्ण हा परम [22]देवदेव कीं हें स्मरे न वसुदेव देवकी; ।
लेंकरूं म्हणुनि वर्षती दया, दाखवी हरि [23]दयारसोदया. ॥ १४
'कृष्ण [24]हीनबळ बाळ लेंकरूं, मल्ल मारितिल काय मी करूं?' ।
येरिती करिति खेद [25]दंपती फुंदती रडति आणि कांपती. ॥ १५
[26]द्विरददंत जसे उपडूनि घे, रस भयानक कंसमनीं निघे; ।
मनिं म्हणे, 'निमिषें वधिला [27]वैरी मजहि मारिल यावरि लौकरी.'॥ १६

---

१. भक्तिरसाची. २. लाभ. ३. दारांत. ४. मोठा गज. ५. बलरामासह. ६. सिंह. ७. मल्लांच्या सैन्यांत. ८. कैटभ+अरि=कैटभ नामक दैत्याचा अरि. (कृष्ण.) ९. कंस. १०. निस्तेज. ११. अद्भुतरस. १२. वास्तव कीं, अशासाठीं कीं. १३. हरिणनयनीं. १४. मदनसागराच्या. १५. तरंग=लाट. १६. मनांत. १७. रक्तानें भरलेलें. १८. हातांत (गजाचा) दांत. १९. मित्रभावानें. २०. सिंहासनातें. २१. वीर आहे आख्या (नाम) ज्याची तो (रस.) २२. परमात्मा. (विष्णु.) २३. करुणरसाच्या उदया. २४. असमर्थ. २५. जायापती. (वसुदेव देवकी.) २६. हत्तीचे दांत. २७. कुवलयापीड नामक गज.

[1]अनंतशक्तीसहि [2]अज्ञलोकीं अशक्त मानूनि कृपावलोकीं, ।
निरूपिला खेद बहू प्रकारें, बीभत्स केला रस [3]निर्विकारें. ॥ १७
श्रीमूर्ति देखूनि [4]महाविभूती, संतां गमे स्वात्मसुखा[5]नुभूती; ।
[6]ते देखती शांत निजस्वरूपीं, दावी हरी शांतरस स्वरूपीं. ॥ १८
नवरस कवि गाती हेचि वर्णूनि जाती,
नि[7]जचरितरसीं त्या दाखवी दिव्यजाती; ।
दशम रस अनन्य प्रेमभक्तीस लोकीं
यदुपति हरि तो दे यादवां [8]स्वावलोकीं. ॥ १९
विना शेषशायी जनां यादवांला नसे देव ते देखती माधवाला; ।
गमे [9]राम तो शेष, [10]हां शेषशायी, स्वपायीं तया दे रस[11] प्रेमदायी. ॥ २०
[12]ईष्टे दैवत अभीष्ट अशेषें दे[13] जनां प्रिय हितेंचि विशेषें; ।
यादवां स्वसुख कल्पतरूचें, प्रेम हें सहज आदिगुरूचें. ॥ २१
इष्ट सर्वहि अभीष्ट असेना कृष्णरूप सचराचरसेना; ।
वामनास सकळात्मकलाहो [14]कीर्तनप्रिय असा कळला, हो! ॥ २२
सेविजे प्रिय मुकुंद उगा हो कीर्तनीं अजि! तयासिच गीं[15], हो! ।
या क्षणी सुख म्हणाल जगा हो हे [16]मृगांबु ठकणार मृगां हो. ॥ २३

उपसंहार.

(शार्दूलविक्रीडित.)

टीका[17]कार जसे क्रमें रस दहा हे बोलिले श्रीधरें,
श्लोकींचे रस त्या क्रमें कथियले हे वामनें सादरें, ।
ये येती कवणेरिती अनुभवा तो भाव यां प्राकृतां-
श्लोकीं आणि पदीं असा अवघिया आधार जो संस्कृता. ॥ २४

---

१. परमसमर्थ ईश्वरास. २. अज्ञजनांनीं. ३. विकारशून्य कृष्णानें. ४. तेजस्वी, ऐश्वर्यसंपन्न. ५. अनुभव. ६. 'ते पाहती शांतरस स्वभूती दावा हरी हा रस शांतरूपी' असाही पाठ आढळतो. ७. 'परि दशम रसाची वर्णिती ते न जाती' असें पाठांतर. ८. आपण त्यांना पाहून. ९. बलराम तोच शेष. १०. हा कृष्ण शेषशायी. ११. 'सर्वदा प्रेमदायी' असा अन्य पाठ. १२. 'ईश दैवत अनिष्ट विशेषें' असाही पाठ आहे. १३. 'देत जो निजजनासि अशेषें' पाठांतर. १४. 'कीर्तनीं प्रिय हरी फळला हो' असा पाठभेद. १५. स्तवा. १६. मृगजळ. १७. भागवतटीकाकार श्रीधरस्वामी. काव्याचा शेवटचा भाग छंदांतरानें रचण्याची रूढि आहे तिला अनुसरून हा चरम श्लोक निराळ्या वृत्तांत लिहिला आहे.

कंसवध. (द्वितीय.)

(घनाक्षरी [कवित्त] वृत्त.)

वज्राहुनी ही अभंग, मल्लां वाटला श्रीरंग, ।
नरां नरनाथ रंग, भूमी येतां वाटला. ॥
वाटे नारींसी मदन, नंदादिकांसी स्वजन, ।
दुष्ट रायांसी शासन, धाकें उर फाटला. ॥
मायबापां तान्हें बाळ, भयें कंसा वाटे काळ, ।
मूढां वाटे फटकाळ, शोकें कंठ दाटला. ॥
स्वात्मयोगियां स्वरूप, यादवांसी विष्णुरूप ।
दृष्टी देखतां अमूप, दुःखसिंधु आटला. ॥ १
संगें गडी बळीराम, रंगा येतां मेघश्याम ।
कुँवलयापीड नाम, द्वारीं गज देखिला. ॥
पीतांबरें कसी कास, शिरीं बांधी अलकास, ।
दावी वीर कौतुकास, वीररसें रेखिला. ॥
कृष्ण उचलूनी हात, म्हणे, 'अरेरे महात ! ।
जाणें रायाचे गृहांत, वाट सोडीं वहिला. ॥
नाहीं तरी, हा वारण, तुजसहीत मरण ।
पावेल हा अजी रणरंगीं जय पहिला.' ॥ २
सोंडेचा सांखळदंड, उचलुनी शुंडादंड ।
कुवलयापीड चंड, वेगें करी लोटला. ॥
शृंखला ते खळखळ, वाजे लोहाचे निःखळ, ।
यमें कवळीला खळ, खुळगासा उठिला. ॥

---

१. या वृत्ताचें लक्षण चिंतामणिकविकृत 'छंदोविचार' ग्रंथांतून देतों:—'सोरह पंद्रह वरनपर होत जहां विश्राम । इकतिस अक्षर अंत गुरु कहत **घनाक्षर** नाम' ॥. भावार्थ:—या छंदाच्या प्रत्येक पादांत एकतीस अक्षरें असतात; पादांतीचें अक्षर गुरु असतें; प्रथम सोळाव्या अक्षरावर व तेथून पंधराव्या अक्षरावर म्हणजे पादाच्या अंतिम अक्षरावर विराम असतो. या घनाक्षरवृत्तास 'कवित्त' असें दुसरें नांव आहे. २. ज्याला भंग (नाश) नाहीं असा. ३. शास्ता. ४. यम. ५. मोठा. ६. आला तेव्हां. ७. हें हत्तीचें नांव. ८. कांस कसी=कंबर बांधी. ९. केंस. १०. तत्काळ. ११. हत्ती. १२. भयंकर. १३. हत्ती. १४. या प्रकरणांत खळखळ, घणघण, खणखण, फरफर इत्यादि अनुकरणवाचक शब्द आहेत. हे ती ती क्रिया घडतांना जो शब्द होतो त्यांचा ध्वनि दाखवितात. असे शब्द महाराष्ट्र भाषेंत जितके आहेत तितके बहुधा अन्य भाषांत नसतील असें दिसतें. १५. रेडा.

घंटा जड मणमण, वाजताती घणघण, ।
मक्षिकांची खणखण, मध्यें जेव्हां धांविला. ॥
ऐसा करी हरी हरी, संहारी हो! हरी हरी! ।
केशरी हो कोण सरी, हरी चा[illegible] पावला. ॥ ३
सोंडेचा सांखळदंड, चुकवूनी भुजदंड ।
हाणे हत्तीसी प्रचंड, निघे चहूं चरणीं. ॥
पुच्छीं धरी गिरीधर[3], मागें ओढी फरफर ।
हत्ती हगे भरभर, चित्रित[4] हे करणी. ॥
पुढें येऊनी अनंत, कुवलयापीडदंत ।
चुकवितात अत्यंत, धांसती हो! धरणी. ॥
ऐसा मारूनी द्विरेद, उपडूनी दोन्ही रैंद.।
शोणितें बरा वरद, रंगला हो! त्या रणीं[9]. ॥ ४

द्वारकाविजय.

'विवाहविजय' नामक सर्ग पहिला.

(श्लोक.)

सोळासहस्रसदनीं यदुराज नांदे, सत्कीर्ति तारक करूनि जगीं जनां दे; ।
वंदोनियां पद शिरीं वरदा तयाचें, वर्णीन तें गुणगणामृत दातयाचें. ॥ १

---

१. सिंह. २. हाणी. (हनू=मारणें, हाणणें.) ३. कृष्ण. ४. चमत्कारिक. ५. हत्ती. ६. दांत. ७. रक्त. ८. वर देणारा (कृष्ण.) ९. या प्रकरणांत अखेरीस कविनामनिर्देश नाहीं यावरून हें त्रुटित आहे असें होतें. १०. हें काव्य दशमस्कंधाच्या ५०-५९ या अध्यायांच्या अनुरोधानें रचिलेलें आहे. यांत द्वारकेच्या विजयाचें (कृष्णवैभवाचें) वर्णन आहे म्हणून याला 'द्वारकाविजय' असें नांव दिलें आहे. याचे पांच सर्ग आहेत आणि यांत श्लोकसंख्या २५० पेक्षां थोडी जास्त आहे. श्रीकृष्णास अष्टनायिका आणि सोळा हजार स्त्रिया कशा प्राप्त झाल्या व त्या प्रत्येक रमणीच्या मंदिरांत कृष्णानें काय काय लीला केल्या, त्यांत केवढी संपत्ति होती व कृष्णानें प्रत्येक स्त्रीसाठीं भिन्न भिन्न रूप घेऊन त्या सर्वांस कसें रंजविलें इत्यादि ज्या गोष्टी नारदानें पाहिल्या त्यांचें यांत वर्णन आहे. याच विषयावर मोरोपंतांची कविता आहे. तेव्हां या दोन कविवर्यांच्या संबंधानें पुढील उतारा वाचण्यालायक आहे.—"भगवान् श्रीकृष्णानें भौमासुराचा वध करून सोळा सहस्र स्त्रिया द्वारकेस आणून वरिल्या, हा चमत्कार पाहण्याकरितां नारदमुनि द्वारकेस आले, व त्यांनीं श्रीकृष्णाची अगाध माया अवलोकन केली. हा कथाभाग वामनपंडितानें 'द्वारकाविजय' नामक प्रकरणांत वर्णन केला असून

तीच कथा मोरोपंतानें 'बृहद्दशमा'च्या ५९ व्या अध्यायांत वर्णिली आहे. हीं उभय कवींचीं वर्णनें श्लोकवृत्तांत आहेत. ह्या वर्णनाच्या संबंधानें पंडित आणि पंत यांची तुलना केली असतां पंडितांची कविता पंतांच्या कवितेपेक्षां सरस आहे असें दिसतें. आपला उपास्य देव भगवान् श्रीकृष्ण यानें एकसमयावच्छेदेंकरून सहस्रावधि रूपें धारण करून सोळासहस्र स्त्रियांबरोबर विवाह केला, इत्यादि अद्भुत लीला मनांत आणून वामनानें त्या मोठ्या प्रेमोल्हासानें गाइल्या आहेत. वर्णनीय विषयांशीं ग्रंथकर्त्याचें तादात्म्य झालें असतां, वर्णनाचा पाक चांगला उतरतो, व वाचकांसही आनंदजनक होतो. त्याप्रमाणें वामनाच्या 'द्वारकाविजयां'तील कवितांचा रसपरिपाक चांगला उतरला आहे. सोपे शब्द, सरळ अर्थ, लहान लहान पदें, मधुरवर्णरचना, या योगानें नेहमीप्रमाणें वामनाचें हें प्रकरणही माधुर्य आणि प्रसाद यांचें सदन झालें आहे. प्रास, यमकें, स्वभावोक्ति इत्यादि अलंकारही यांत चांगले साधले असून ग्रंथसंगतिही मनोहर आहे. हें वामनाचें वर्णन मोरोपंताच्या वर्णनाशीं लावून पाहिलें तर, मोरोपंतानें एका श्लोकांत जी गोष्ट सांगितली आहे, तिचें वर्णन वामनानें एका सर्गांत छप्पन्न श्लोक करून केलें आहे. तेव्हां विस्तारानें वर्णन करण्याचा जो गुण वामनांत आहे तो मोरोपंतापेक्षां स्पष्ट आहे. दुसरें माधुर्य, प्रसाद हे गुण वामनांत मोरोपंतापेक्षां अधिक स्पष्ट असून, वामनाचें अंतःकरण जसें कवितेशीं सुलीनतेनें व भक्तीनें तादात्म्यभाव पावलेलें दिसतें, तसें मोरोपंताच्या कवितेवरून त्याचें अंतःकरण त्याच्या कवितेशीं एकीभाव झालेलें दिसत नाहीं. वामनाच्या ह्या कवितेवरून त्याची भक्ति सोज्वळ व जागृत दिसते, ती खुबी पंतांच्या काव्यांत नाहीं असें आम्हांस वाटतें. क्वचित् च्युतसंस्कृति, असंगति हे दोष वामनाच्या वर्णनांत आहेत, त्या मानानें ते पंतांच्या वर्णनांत नाहींत. तथापि त्याच गोष्टीवरून कवीचा कवितेशीं झालेला तादात्म्यभाव चांगला व्यक्त होतो. प्रेमपुरःसर वर्णन करण्याच्या भरांत व झोंकानें वामनानें क्वचित् स्थलीं व्याकरणाकडे किंवा संगतीकडे दृष्टि दिली नाहीं, यामुळें तो दोषच गुणरूपानें त्याच्या ह्या काव्यास शोभा देत आहे. पंताच्या रचनेवरून त्यानें केवळ कीर्तिसंपादनार्थ काव्य करण्यांत कुशलता खर्च केली आहे. यामुळें ठाकठिकीवर त्याची सूक्ष्म दृष्टि फिरली असावी. केवढाही विद्वान् असो, कसाही कुशल असो, मोठा कवि असो, वर्णनीय विषयाशीं मनानें ऐक्य पावून मिळून जाणार नाहीं तर त्याचा ग्रंथ रसभरित होणार नाहीं. तसा प्रकार वरील वर्णनाच्या संबंधानें पंतांच्या कवितेचा झाला आहे. आतां इतकें मात्र खरें कीं, पंतांच्या कवितेची झोंकदार भाषा, मोठमोठालीं समासपदें, प्रौढीवर्णनाची सुसंगति व एकसारखा प्रवाह, मनास आनंदानें पुष्ट करणारे शब्दालंकार व अर्थालंकार, थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ, सुशोभित इमारतीस कारागिरीनें जोडलेल्या सुंदर चिताऱ्याप्रमाणें केलेली शब्दरचना इत्यादि पंताच्या कवितेचे सर्वसाधारण गुण ह्याही प्रकरणांत तसेच चांगले उतरले आहेत तथापि वर दाखविलेल्या कितीएक कारणांवरून व संस्कृत शब्दांचें मिश्रण फार झाल्यामुळें रुचिभिन्नत्व संबंधानें पंतांचें हें काव्य जितकें लोकमान्य होईल, त्यापेक्षां सुगम व मधुर म्हणून वामनाचें वर्णन अधिक लोकप्रिय होईल यांत संशय नाहीं." (वामनावरील हंस यांचा निबंध.) ११. या पहिल्या दोन श्लोकांत मंगलाचरणपूर्वक वर्ण्य कथाभाग सूचविला आहे. १२. 'जगींच नांदे'—पाठभेद.

[१]भौमासुरा वधुनियां [२]रणसंगतातें [३]स्त्रीवृंद [४]षोडशसहस्र [५]अनंगतातें, ।
द्वारावतीपुरिस देउनि दिव्य [६]यानें त्या धाडिल्या [७]नृपसुता अजि [८]अन्ययानें. ॥ २
एके घडीसचि [९]धरी सकळां करीं तो, आत्माचि जो जडजिवां सकळां करीतो; ।
जो भूमिपुत्र मुरुदैत्य [१०]वरा [११]हरीतो, सोळासहस्र वन्या, नवरा हरी तो. ॥ ३
सोळासहस्र [१२]वरेंही [१३]जळजाक्ष झाला, तें कायसें अजि! अशक्य [१४]अधोक्षजाला? ।
सस्त्रीक षोडशसहस्रचि [१५]देवदेवें केले विवाहसमयीं वसुदेवदेवें. ॥ ४
देवकी [१६]प्रतिगृहीं वरमाय, जो जगांत [१७]नवरा [१८]वरमाय, ।
तोचि हा प्रतिगृहीं नवरा हो, जो मनीं म्हणति मानव राहो. ॥ ५
वरबापही प्रतिगृहीं वसुदेव, प्रतिमंदिरीं सकळरूपहि देव; ।
यदुवीर आप्त अवघे प्रतिगेहीं, हरि दाखवी, इतर लोक उगेही. ॥ ६
जोशी पुरोहितहि तोचि मुकुंद झाला, जे सावधान म्हणताति तया अजाला; ।
एक्याच लग्नसमयीं अवघ्या करीं तो [१९]होतें धरी, जगहि जो [२०]निमिषें [२१]करीतो. ॥ ७
मोजितां [२२]देशशतें द्विअष्टकें मंदिरें सकळ, [२३]मंगळाष्टकें ।

---

१. प्राग्ज्योतिषपुरीचा राजा. याचें नांव नरकासुर. हा भूमीचा पुत्र म्हणून याला भौम (भौमासुर) असें म्हणतात. यानें इंद्राची संपत्ति आणि अदितीचीं कुंडलें हरण केल्यावरून कृष्णानें याच्यावर स्वारी केली. याचा मुरु नामक दैत्य स्नेही होता त्यास कृष्णानें मारलें. या दैत्याचे पांच पुत्र कृष्णावर चालून आले, त्यांचाही कृष्णानें पराभव केला. नंतर नरकासुर स्वतः कृष्णापाशीं युद्ध करण्यास आला, तोही कृष्णहस्तें मरण पावला. याचा पुत्र भगदत्त कृष्णास शरण आला, तेव्हां कृष्णानें त्यास प्राग्ज्योतिषपुरीचा राजा केलें, आणि नरकासुरानें ज्या सोळा हजार राजकन्या बंदींत आणून ठेविल्या होत्या त्यांना मुक्त केलें. त्यांनीं कृष्णास मनेंकरून वरिल्यामुळें, कृष्णानें त्यांस द्वारकेस आणून त्यांच्याशीं विवाह केला. अदितीचीं कुंडलें व इंद्राची संपत्ति कृष्णानें त्यांस परत देऊन संतुष्ट केलें. २. युद्धामध्यें आलेल्यातें. ३. स्त्रीसमूह. ४. सोळा हजार. ५. कृष्णानें. ६. अश्वरथप्रमुख वाहनें. ७. राजकन्या. ८. नाशरहितानें. (कृष्णानें.) ९. लग्न लावी. (करीं धरी=पाणिग्रहण करी.) १०. श्रेष्ठ. ११. हरण करतो. १२. पति, धव. १३. कमलासारिखे नेत्र ज्याचे. (कृष्ण.) १४. अधोक्षज=विष्णु. याचा विग्रहार्थ असा:—(१) 'अधो न क्षीयते जातु यस्मात्तस्मादधोक्षजः', (२) 'द्यौरक्षं पृथ्वी चाधस्तयोर्यस्मादजायत । मध्ये वैराजरूपेण ततोऽधोक्षज इष्यते ॥', (३) 'अक्षात् इंद्रियाज्जायते इति अक्षजम्=प्रत्यक्षज्ञानम्, तदधरं ग्राहकत्वाभावात् हीनं यस्य सः', (४) 'अधःकृतं अक्षजं=इंद्रियज्ञानं येन,' याप्रमाणें या शब्दाचे विग्रह आढळतात. १५. विष्णूनें. १६. प्रत्येक घरीं. १७. 'न रमावर माय' असा अन्य पाठ आहे. १८. श्रेष्ठ माया ज्याची असा. १९. हातें धरी=पाणिग्रहण करी, विवाह करी. २०. क्षणांत. २१. उत्पन्न करतो. २२. सोळा हजार. २३. मंगळाष्टक=वधूवरांचे कल्याणार्थ विवाहप्रसंगीं उपाध्याय जो आशीर्वादपर श्लोक म्हणतो तो. हीं मंगळाष्टकें प्रभुगुणवर्णनाच्या गोड अक्षरांनीं व्यापिलीं—असा अन्वय.

व्यापिलीं प्रभुगुणामृताक्षरीं, व्याप्त जेंवि हरि तो क्षराक्षरीं. ॥ ८
गर्जती द्विजचि ते शुभनादीं, अन्य मौनपर बंदिजनादी, ।
मंगळत्व इतरत्व न साहे मंगळप्रद कथा परिसा हे. ॥ ९
नरक अद्वय पाश जो हॅरी वॅरि तयां युवतींस तो हरी, ।
द्विज तयाच सुमंगळाष्टकीं रमति तेच जगीं अभीष्ट कीं. ॥ १०
दुर्गें सर्व चुरा करी, सहमुरा मर्दूनि भौमासुरा,
निर्दाळी असुरां, सुखी करि सुरां साधूजना भूसुरां, ।
भौमीच्या कुमरा समर्पुनि धेरी जाऊनि त्याच्या घरा,
धाडी स्वात्मपुरा स्त्रिया निजपुरा सोळा सहस्रा वॅरा. ॥ ११
भौमक्ष्माधिपतिस्त्रिया कुळवती सोळा सहस्रा सती,
आणी शौर्यगती हरूनि कुमती तों पावला श्रीपती, ।
युद्धीं दैत्यपती वधूनि, युवती धाडी स्वगेहाप्रती
त्यांतें द्वारवतीमधें हरि अतिप्रेमें वरी येरिती. ॥ १२
श्रीमद्वारवतीस ये खगपतिस्कंधीं वसे श्रीपती,
वामांकीं सुदती अलंकृतवती श्रीसत्यभामा सती; ।
एवं दैत्यपती वधूनि युवती सोळा सहस्रा कृती
आणी हंसगती वरी यदुपती, नामेंचि जो दे गती. ॥ १३
रुक्म्याची अनुजा समुद्रतनुजा दे पत्र रामानुजा,
धाडी गुप्त अजासमीप नृपजा नामें सुदेवा द्विजा; ।

---

१. स्थावरजंगमीं. २. मंगलस्वरीं. ३. भाट इत्यादि. ४. हरण करी. ५. 'युवति त्या वरि तो स्वत: हरी' पाठभेद. ६. स्त्रियांस. ७. पुढच्या मंगळाष्टकरूप अकरा श्लोकांत कृष्णाच्या अनेक विवाहांचें वर्णन आहे. ८. प्रिय. ९. दुर्ग=किल्ला. १०. मुरुदैत्यासह. ११. विप्रां. १२. भौमासुराच्या. १३. भगदत्त. १४. पृथ्वी. (राज्य.) १५. श्रेष्ठा. १६. भौमासुराच्या स्त्रिया. १७. साध्वी. १८. द्वारकेंत. १९. गरुडाच्या खांद्यावर बसून. २०. पत्नीचें बसण्याचें स्थान पतीचा डावा उत्संग (वामांक) होय. २१. सत्यभामेला नरकासुराचे वधास जात असतां श्रीकृष्णानें बरोबर घेतलें होतें तें आतां परत आणलें. २२. कृतकृत्य. २३. हंसासारख्या चालणाऱ्या. २४. सद्गति, मुक्ति. २५. रुक्मिणी ही लक्ष्मीचा अवतार म्हणून तिला येथें समुद्रतनुजा (क्षीरोदतनया—रमा) असें वर्णिलें आहे. २६. श्रीकृष्णा. २७. भीष्मकराजापासून झालेली. (रुक्मिणी.)

तेव्हां श्री[1]गिरिजागृहीं [2]स्वसहजा आणी [3]सुधासिंधुजा,
मर्दी अश्वगजा [4]चमू निज[5]भुजावीर्यें, हरी [6]पद्मजा. ॥ १४
[7]भावाच्या मरणीं मुकुंदकरणी सत्राजितें स्थापुनी
घाली आळ जनीं स्यमंतकमणी नेला म्हणे [8]चोरुनी, ।
[9]ऋक्षाच्या सदनीं वनीं हुडकुनी आणी हरी त्याक्षणीं;
[10]प्रायश्चित्त मनीं करी सहमणी श्रीसत्यभामार्पणीं. ॥ १५
माझा राम धणी [11]यदूत्तमपणीं आला न जाणें [12]घृणी,
झोंबे त्यासि रणीं, [13]कळोनि करणी, पायीं स्वचूडामणी; ।
अर्पी श्रीचरणीं स्यमंतकमणी तो जांबवान् सद्गुणी,
वंदी [14]पायवणीं पदांबुजिं [15]धणी घे ऋक्ष [16]कन्यार्पणीं. ॥ १६
[17]कालिंदी यमुना [18]फणींद्रदमनावांचूनि ते अंगना
अन्यातें वरिना म्हणूनि वचना या बोलिली [19]अर्जुना; ।

---

१. श्रीपार्वतीच्या मंदिरांत. २. आपल्याबरोबर जन्म पावलेली. ३. समुद्रापासून झालेली. लक्ष्मी. (रुक्मिणी.) ४. सैन्य. ५. आपल्या बाहुबळानें कृष्ण पद्मजा (लक्ष्मीला—रुक्मिणीला) हरण करी. (मोरोपंत—बृहद्दशम—अध्याय ८३, गीति ९-९९ पहा.) ६. रमा. (रुक्मिणी.) ७. प्रसेन नामक भावाच्या; कृष्णानें माझा बंधु प्रसेन याला मारून स्यमंतक मणि चोरून नेला अशी आळ कृष्णावर सत्राजितानें घातली होती. सत्राजित् हा सत्यभामेचा पिता. ८. 'मारुनी' पाठभेद. ९. अस्वल जो जांबवान् याच्या. १०. मण्यासह सत्यभामेला कृष्णास अर्पण केलें हेंच आळ घातलेल्या पापाचें प्रायश्चित्त घेतलें असें समजावें. ११. उत्तम यादवरूपानें; रामानें यादव कुळांत अवतार घेतला हें जांबवतानें न जाणून त्यांच्याशीं युद्ध केलें. १२. दयाळू. १३. हा रामच होय असें कळल्यावर. १४. पायांचें तीर्थ. [पायवणीं—'वणीं' हा प्रत्यय नामाला लागून नामप्रदर्शित पदार्थानें मिश्रित पाणी अशा अर्थाचे शब्द होतात. जसें:—चिंचवणीं, मिठवणीं, गुळवणीं. 'वणीं' हा संस्कृत 'पानीय' शब्दाचा अपभ्रंश आहे.] १५. तृप्ति. १६. कन्यादानानें, जांबवत (सत्यभामा) अर्पण करून. (मोरोपंत—बृहद्दशम—अध्याय ८३ गीति १००-१२४.) १७. कालिंदी= ही कृष्णाच्या अष्टनायिकांतील एक. ही कृष्ण पति मिळावा म्हणून यमुनातटाकीं, उग्र तपश्चर्या करीत होती. अशा स्थितींत एकदां चातुर्मास्यांत अर्जुनासह कृष्ण इंद्रप्रस्थीं असतां मृगयेच्या निमित्तानें यमुनातीरीं आला. तेव्हां त्यानें तेथें तपोधर्मपरायण अशा तिला पाहिलें. नंतर उभयतांचें भाषण झाल्यावर, तिचें मनोगत जाणून, तिला समागमें घेऊन कृष्ण इंद्रप्रस्थास आला. तेथें चातुर्मास्य संपेपर्यंत राहून तिच्यासह द्वारकेस येऊन त्यानें तिचें यथाविधि पाणिग्रहण केलें. (भागवत—दशमस्कंध—अध्याय ५९. (मोरोपंत—बृहद्दशम—अध्याय ८३ गीति १२५-१३१.) कृष्णाच्या अष्टनायिकांचीं नांवें—'भिष्मी जांबवती भामा सत्या भद्रा च लक्ष्मणा । कालिंदी मित्रविंदा चेत्यष्टौ पट्टमहास्त्रियः ॥' १८. सर्प श्रेष्ठ जो कालिय त्याला मर्दिणाऱ्या कृष्णावांचून. १९. पांडुपुत्रास.

आली कृष्णमना गजेंद्रगमना[1], आप्ननि चंद्रानना[2]
पाहोनी सुदिना[3] वरी सुनयना, आनंद सर्वा जना. ॥ १७
आतेचा[4] पति[5] जो अवंति नृपती, तत्कन्यका श्रीपती
जाणोनि स्वरती[6] स्वयंवर गती श्रीमित्रविंदा[7] सती, ।
आणी द्वारवतीप्रति, क्षितिपती जिंकोनि जे वर्जिती,
भाऊ दुष्टमती तिचे परतती दुर्योधनाचे प्रंती. ॥ १८
'वज्राचे[8] दिसती बईल असती बांधे, तया हे सती,
कन्या नाग्नजिती[9]' म्हणे क्षितीपती 'देईन' ऐशा व्रतीं ।
बांधे विश्वंपती[10] म्हणोनि सुमती अर्पी सुता त्याप्रती,
आणी द्वारवती प्रियेस नृपती जिंकोनि मार्गीं किती[11]. ॥ १९
आतेची[12] दुहिता[13] तिच्या निजहिता जाणोनि माता पिता
भाऊ त्याच मता धरूनि विहिता मार्गींच ते सुस्मिता[14], ।

---

१. गजगामिनी. २. सुधाकरसदृशवदना. ३. शुभ दिवस. ४. वसुदेवभगिनी—राजाधिदेवी तिचा. ५. अवंत्यराजा जयसेन. ६. आपणाठायीं प्रीतियुक्त. ७. मित्रविंदा ही जयसेन राजाची मुलगी. हिचे दोघे भाऊ विंद आणि अनुविंद हे दुर्योधनमित्र होते म्हणून त्यांनीं आपल्या भगिनीला कृष्णाशीं विवाह करूं दिला नाहीं. तथापि नंतर हिचें स्वयंवर होत असतां, जमलेल्या राजांच्या समक्ष कृष्णानें हिचें हरण करून हिशीं विवाह केला. ही कृष्णाची पांचवी नायिका होय. (मोरोपंत—बृहद्दशम—अध्याय ८३ गीति १३२-१४४ पहा.) ८. अयोध्येचा राजा नग्नजित् यानें आपली कन्या सत्या हिच्या स्वयंवरप्रसंगीं अशी प्रतिज्ञा केली होती कीं जो कोणी राजा वज्रासारख्या दिसणाऱ्या दुर्धर्ष आणि वीरगंधासह ह्या सात श्रेष्ठ वृषभांला एकदम बांधील त्यास ही कन्या देईन. ९. कोसलदेशाधिपति नग्नजित् नामक राजाची सत्या नामक कन्या. हिच्या स्वयंवराची प्रतिज्ञा ऐकून कृष्ण स्वसैन्यासह कोसलपुरास आला. तेथें कृष्णाला पाहून सत्येचें मन कृष्णावर बसलें. इकडे स्वयंवरास आलेल्या राजांपैकीं वृषभांला बांधण्यास कोणीही समर्थ नव्हता. नग्नजिताचेही मनांत कृष्णाला कन्यादान करावें असें होतें. पण कन्यावरपरीक्षणपण व्यर्थ गेला असें न व्हावें या हेतूनें श्रीकृष्णानें स्वलीलेनें सात देह धारण करून सात वृषभांला दांव्यांनीं बांधून ओढून आणिलें तेव्हां राजपत्नीप्रमुख सर्वजनांस आनंद झाला. नंतर कृष्णाचा तिच्याशीं विवाह झाला. नंतर राजानें कृष्णाला आणि मुलीला गोहयरथादि संपत्ति देऊन संतुष्ट केलें. वाटेंत प्रतिस्पर्धी राजांनीं कृष्णाला अडविलें तेव्हां त्यांचा पराभव अर्जुनानें केला. (दशमस्कंध—अध्याय ५९ श्लोक ३२-५५, मोरोपंत—बृहद्दशम—अध्याय ८३ गीति १४५-१६१ पहा.) १०. कृष्ण. ११. अनेक राजे जिंकून. १२. श्रुतिकीर्ति नामक आतेची. १३. भद्रानामक कन्या. १४. चारुहासा.

देती कीं चरिता स्मरोनि [1]जनिता पावे गती तत्वता,
तो हा [2]विश्वपिता [3]वरू निजसुता [4]भद्रावती सुव्रता. ॥ २०
कोणी एक करीं धनुष्यचि धरी जें सज्ज कोणी करी,
एवं भूप वरी न राजकुमरी जो विंधिला यापरी; ।
त्या चापेंचि हरी स्वयंवर वरी लक्षूनि [5]नीरीं वरी
[6]विंधी मत्स्य, वरी तयास नवरी [7]श्रीलक्ष्मणा सुंदरी. ॥ २१
त्याच्याचि वैवाहिकमंगळाष्टकें, गाती विवाहीं द्विज मंगळाष्टकें, ।
हें आयके माधव देव [8]सुद्विजां सोळासहस्त्रां वरि, दे [9]वसु द्विजां. ॥ २२
ज्या मंगळें मंगळ या जनाचें, चरित्र तें रम्य [10]निरंजनाचें, ।
भावें अशा वर्णिति मंगळाला, सुखें जयाच्या रस हा गळाला. ॥ २३
सावधान हरि संतरक्षणीं, त्यांसि दे न कधिं अंतर क्षणीं, ।
सावधान म्हणती [11]द्विजन्म ते, या निमित्त असि बुद्धि जन्मते. ॥ २४
[12]अंतिंचें घडिस अंबुजेक्षणीं अंतरीं बुडवि [13]अंबु जे क्षणीं, ।
कामिनी बुडविती मनास त्या मानिती सफळ कामना [14]सत्या. ॥ २५
जडत्व भ्रांतीचें कपट सरलें अंत्रपट तो,
दिसे सच्चित्तंतू प्रगट नयनीं [15]निष्कपट तो; ।
सहस्त्रें सोळाही [16]प्रकृति वरिती सत्पति सत्या
अनन्या [17]चिच्छक्ती वरिति सगुणा श्रीपतिस त्या. ॥ २६
मायिका कपटअंत्रपटातें, वारिती युवति निष्कपटातें, ।
आत्मतंतु शतधाच पहाती, [18]अक्षता मणिमयांकित हातीं. ॥ २७

---

१. बाप. २. कृष्ण. ३. वर, पति. ४. भद्रावती (भद्रा)=ही केकयदेशराजकन्या. ही वसुदेवाच्या भगिनीची (श्रुतकीर्तीची) मुलगी. (मोरोपंत–बृहद्दशम–अध्याय ८३ गीति १६२-१७०.) ५. उदकांत. ६. भेद करी. ७. श्रीलक्ष्मणा=ही मद्राधिप बृहत्सेनाची कन्या आणि कृष्णाची अष्टम भार्या. (मोरोपंत–बृहद्दशम–अध्याय ८३ गीति ७०-९७) हिचा पति कृष्ण होईल असें नारदानें सांगितलें होतें. पुढें बापानें मत्स्यभेद पण केला तेव्हां स्वयंवरासाठीं अनेक राजे आले. पण मत्स्यभेद करण्यास कोणीच धजेना. मग कृष्णानें चाप घेऊन मत्स्याचा भेद केला. तेव्हां जयजयकार होऊन लक्ष्मणेनें कृष्णाच्या गळ्यांत माळ घातली—अशी कथा आहे. ८. सुंदर दंत ज्यांचे अशा सोळा हजार स्त्रियांस. ९. द्रव्य, दक्षिणा. १०. अज्ञानरहित जो कृष्ण त्याचें. ११. ब्राह्मण. १२. 'अंतिची सुघडी' असा अन्य पाठ. १३. उदक. १४. साध्वी. १५. कपटरहित. १६. सोळा हजार स्त्रिया याच सगुण प्रकृति. १७. चलनवलनादिक व्यापार जिच्या योगानें चालतात ती जीवनकला, जी सर्व प्राण्यांमध्यें राहून जीवनव्यापार करविते ती=चिच्छक्ति. १८. कुंकुमयुक्त तांदूळ.

भ्रांति अंतरपटा विरहातें वारितां मग परस्पर हातें, ।
[1]अक्षताच शिरिं [2]अक्षतमोतें, अर्पिताति नवला न [3]गैमो तें. ॥ २८
जईं त्या [4]चतुर्वक्त्रअष्टाक्षतातें स्त्रियांच्या शिरीं अर्पिलें अक्षतांतें, ।
तईं ऊठती नाद वाद्यांत नाना, [5]द्विजीं मंत्र गंधर्ववृंदीं तनाना. ॥ २९
मृदंगादि नाना ध्वनी गायनाचे, [6]सुरस्त्रीनटीवृंदही गाय नाचे, ।
दिशा व्यापिल्या सर्वही [7]अंबराच्या असा नाद लग्नांत [8]पीतांबराच्या. ॥ ३०
मुक्ताफळातें द्विज [9]अक्षतांतें श्रीकुंकुमें रंगुनि [10]अक्षतांतें, ।
करूनियां अर्पिति [11]वेदवादी ते पाहती कौतुक यादवादी. ॥ ३१
लाधल्या नवरिया हरिला [12]त्यां, होमिती सकळ सुंदरि [13]लाजा; ।
[14]हस्त हस्तकमळीं युवतींचे श्रीपती धरि [15]नितंबवतींचे. ॥ ३२
[16]दाकार दे [17]धनद बैसुनि दक्षणातें, संतोषवी नवरियां कमलेक्षणातें; ।
दातृत्व देउनि दरिद्रपणास त्याला [18]धाडी दिगंत वरितो हरि त्या सत्यांला.॥ ३३
कामें करी [19]दशशताक्ष हरी समोर, देखूनि नृत्य करि जेंवि [20]घनास मोर; ।
[21]सर्वांगलोचन मयूर सुरेंद्र साचा घे लाभ मेघतनुकृष्णकृपारसाचा. ॥ ३४
जे ते गृहीं [22]मणिमयांकविवाहवेदी, जो तो अहेर सुर देववरा निवेदी; ।
गाती मुकुंदगुण गायक सामवेदी [23]कीजे तसें स्तवन मूर्ति धरोनि [24]वेदी.॥३५
सोळासहस्रसदनीं हरि भोजनातें अन्नें [25]सुधामय [26]चतुर्विध दे जनांतें ।

---

१. कुंकुमयुक्त तांदूळ. २. अविंध्य मोत्यें. ३. 'निगमातें' पाठभेद. ४. चार मुखें व आठ नेत्र ज्याला अशा ब्रह्मदेवाच्या बापानें (श्रीकृष्णें). चतुर्वक्त्र अष्टाक्षतातें–हा समास चिंतनीय होय. ५. ब्राह्मण मंत्र म्हणूं लागले व गंधर्व आनंदानें गायन करूं लागले–असा भावार्थ. ६. देवांगना (अप्सरा) आणि नटी यांचा समुदाय गाऊं नाचूं लागला. ७. आकाशाचा. ८. कृष्णाच्या. ९. साम अक्षतें. १०. तंडुलांतें. ११. वेदघोष करणारे विप्र. १२. ज्या. (कवितेंत 'ज्या' स्थानीं 'त्या' यमक साधण्यासाठीं कवि योजितात.) १३. लाह्या. (विवाहप्रसंगीं लाजाहोमविधि करावा लागतो हें सुप्रसिद्ध आहे. हा अश्मारोहणसमयीं होतो. याजविषयीं विशेष माहिती नारायणभट्टी प्रयोगांत इष्ट असल्यास पहावी.) १४. 'त्यांत' पाठभेद. १५. स्त्रियांचें. १६. दानयाचें जें द्रव्यादि तें, दक्षिणा. १७. 'सधन' पाठभेद. कुबेर. १८. 'दावी' पाठभेद. १९. इंद्र. (सहस्रनयन.) २०. मेघास. २१. ज्याच्या सर्व आंगभर लोचन (नयन) आहेत असा सुरेंद्र (इंद्र) किंवा मोर. [इंद्राला सहस्रनेत्र आहेत व मोराला त्याच्या पिच्छावर डोळे (लोचन) आहेत. या डोळ्यांना 'मेचक' असें म्हणतात.] २२. रत्नखचित चौरंगें. २३. करतात. [कीजे हें येथें स्वार्थी वर्तमानकाळीं क्रियापद आहे.] २४. पंडित. २५. अमृतमय. २६. लेह्य, पेय, चोष्य आणि खाद्य असें चार प्रकारचें अन्न.

स्त्रीरूप[1] हे धरणि घेउनि अन्नपूर्णा[2], सर्वांस वाढित असे अजि अन्न पूर्णा[3]. ॥ ३६

भाज्या साठि[4] भरी, तयांतहि परी रांधूनि शाकंबरी[5],
पात्रें तेचि करीं धरी तदुपरी वाढी स्वशाकंबरी[6]; ।
वामांकीं[8] नवरी धराप्रति हरी दिव्यासनाऊपरी
त्यातें हें अमरी[7] असे सुखकरी वाढूनि कोशिंबिरी. ॥ ३७

पात्रें सुवर्णमणिनिर्मित विश्वकर्मा मांडूनि दाखवि तया निजशिल्पिकर्मा; ।
बैसावया जडित पाट पुढें चवाया[9], ताटातळीं इतर बैसुनि आंचवाया[10]. ॥ ३८

गंगा स्वयें मूर्तिमती जनाला दे वारि[11] जैं बैसति भोजनाला, ।
स्नानें जिच्या मुक्ति अजी वदावी, ते नीर दे हें यदुवीर दावी. ॥ ३९

संतोष हो हरिच्चिया पदें[12]सारसातें भावें अशा वरुण घेउनि सौ[13] रसांतें ।
वाढी जिभेसि रुचि दे बरवी जनाच्या ऐशा गती रसपती[14] करि भोजनाच्या. ॥ ४०

संधपक्क[15] रस जे गिरिजा[16] ते आणि[17] हे धरणि[18] वाढित जाते, ।
शर्करादिक दलाम्ररसाचा दाखवी[19] वरुण आदर साचा. ॥ ४१

श्रीकामधेनु पुरवी जनहो! रसातें, स्त्रीमूर्ति होउनि घृतादिकगोरसातें; ।
दुग्धादि[20] तें जडित पात्र करूनि घाली वाढावया भुवनसुंदरि ते निघाली. ॥ ४२

साय आणिक दह्यां दुधताका, वाढिते मकर[21]केतुपताका ।
दे स्वरूप[22]रस जे रसिकां जी, जीपुढें रति[23]हि ते जशि कांजी. ॥ ४३

जें शक्र[24]दुर्लभ तसें निज तक्र[25] वाढी, नासूनि जें अरुचि दे सुरुचीस वृद्धि[26]; ।
पंक्तीतया घमघमी ठिकरी[27] तयाची वाढी विभूति[28] असि हे यदुराजयाची. ॥ ४४

---

१. 'स्त्रीरुप हें धरुनि, आणि स्वअन्नपूर्णा, सर्वांस वांटुनिहि वाढित अन्नपूर्णा.' असा अन्य पाठ आहे. २. अन्न पुरविणारी देवी. ३. पुरणाचें अन्न. ४. साठ. ५. अनेकजातीय भाज्या. ६. प्रत्यक्ष देवी. ७. देवी. ८. कौशल्या. ९. चवरंग. १०. आंचवणें=(चमू=खाणें) आचमन करणें=यथाविधि उदक मुखांत घेणें असा अर्थ असून नंतर भोजनोत्तर तोंड धुण्यासाठीं मुखांत पाणी घेणें, भोजनोत्तर तोंड धुणें, असा अर्थ झाला. ११. उदक. १२. चरणकमलातें. १३. सहा रसांतें. [कटु, अम्ल, मधुर, लवण, तिक्त आणि कषाय असे सहा रस आहेत.] १४. वरुण. १५. सांप्रत पाचित केलेले. १६. नदी गंगा. १७. 'अन्न हें धरणि वांटित आहे' पाठभेद. १८. पृथ्वी. १९. 'तृप्ति दे रसिक आम्ररसाचा' असा अन्य पाठ. २०. 'दुग्धादि पात्र भरुनी परिपूर्ण घाली' असा पाठभेद आहे. २१. मकरकेतु (मदन.) त्याची पताका=स्त्रीरूप कामधेनु. २२. लावण्यरस. २३. मदनभार्या. २४. इंद्राला अप्राप्य. २५. ताक. २६. वृद्धि. २७. फोडणी. २८. शक्ति, ऐश्वर्यदेवता.

ब्राह्मणा मुखिं ध्वनी मिटक्यांची, दक्षिणा अमित [1]सोनैटक्यांची ।
[2]तारका गणिति भूमि दिसेना, मो[3]हरीहि उदरांत धसेना. ॥ ४५
नद्या अग्नि ही घेउनी उष्ण पाणी मनुष्याकृतीनें अहोरात्र पाणी, ।
जयां देति सर्वस्वही आंचवाया बसायासि देऊनि तेथें [4]चवाया. ॥ ४६
जसी मेघचक्रांत [5]सौदामिनीची, असी कृष्णरूपीं प्रभा कामिनीची ।
हरी श्याम, गोऱ्या स्त्रिया त्या [6]सुवर्णा [7]विवर्णत्व देती स्ववर्णें सुवर्णा. ॥ ४७
तैलंगकर्नाटकगुर्जरांतें कऱ्हाडकोल्हापुरनिर्जरांतें[8] ।
आनंद गोदातटिंच्या द्विजां[9]ला, वधूवरां देखुनि पूर्ण जाला. ॥ ४८
तांबूल दे पति [10]शशांक [11]वनस्पतींचा जो कां स्वयेंचि [12]मनें सर्वजगत्पतींचा, ।
सर्वत्र दोंदिल गणाधिप [13]वेत्रहस्ती, कामें करी नरतनू सुख जेंवि हस्ती. ॥ ४९
निरोप दे त्यांस [14]चतुर्थहोमीं म्हणे हरी कीं 'तुमचा अहो! मी' ।
श्रीमूर्ति ही हे पुरुषोत्तमातें तसी न विप्र प्रिय जेंवि मातें ॥ ५०
दे द्विजां हरि निरोप जेक्षणीं [15]प्रेमअंबु भरिं [16]अंबुजेक्षणीं, ।
वंदितां पद जगद्गुरू निघे जो किरीटहि न सांवरूनि घे. ॥ ५१
प्रेमविव्हळ [17]पदांबुरुहातें मस्तकीं धरि [18]जगद्गुरु हातें, ।
[19]ब्रह्मभक्ति [20]सुगुणार्णव दावी, प्रीति ते किति म्हणूनि वदावी? ॥ ५२
विवाह लोकांत अलोकरीती करीतसे लोक जसे करीती, ।
जें वामन ध्यानपथेंचि पाहे वर्णी तयाचीच अजी! कृपा हे. ॥ ५३
एवं यथायोग्यचि सर्वलोका दावूनियां लेश [21]कृपावलोका, ।
निरोप गोविंद तया जनां दे सोळासहस्त्रीं यदुराज नांदे. ॥ ५४

---

१. एक नाणें त्याची. २. तारका गणिति म्ह० ब्राह्मण बहुत जेवल्यामुळें त्यांच्यानें मान खालीं करवली नाहीं म्हणून ते आकाशाकडे पाहात नक्षत्रें मोजीत होते—असा अर्थ. ३. ते इतके जेवले कीं त्यांच्या पोटांत मोहरीसही मावण्यास वाव नव्हता. ४. चवरंग. ५. विजेची. ६. उत्तम वर्ण ज्यांचा अशा. ७. फिकेपणा. ८. विप्रांतें. ९. झाला. १०. चंद्र. ११. वनस्पतींचा पति=चंद्र, औषधिनाथ. [भगवद्गीता-अध्याय १५ श्लोक १३ 'पुष्णामि चौषधीः सर्वाः'.] १२. चंद्र हा जगत्पतीच्या मनापासून झाला आहे. ['चंद्रमा मनसो जातः' असें श्रुतिवचन आहे.] १३. वेतकाठी धारण करणारा—भालदार. १४. पाणिग्रहणानंतर वधूवरांनीं तीन दिवस व्रतस्थ राहून चवथ्या दिवशीं रात्रीं चतुर्थीकर्म करावें—असा एक आपस्तंबपद्धतींत विधि आहे. या विधीनें वधूवरांचा संगम होऊन तीं सर्वस्वी एकजीव होतात. १५. प्रेमाश्रु. १६. कमलनेत्रांगनेें. १७. चरणकमळांतें. १८. कृष्ण. १९. विप्रभक्ति. २०. गुणसागर. (कृष्ण.) २१. दयायुक्त अवलोकनाला.

सोळासहस्रसदनीं निज[1]देह केले ज्याच्या कथामृतरसा जन हे भुकेले, ।
हा '[2]द्वारकाविजय' नामकही हरी तो, दिव्य [3]प्रबंध करितो, [4]भव जो हरीतो.॥९९
'द्वारकाविजय' काव्य जयांत, स्वामिचे विजय त्या विजयांत, ।
हा 'विवाहविजय' प्रभुला हो अर्पिला हरिकथामृतलाहो. ॥ ९६

'[5]हरिमंदिरविजय' नामक सर्ग दुसरा.

(श्लोक.)

सोळासहस्र [6]युवती घटिकेचिमाजी रूपें धरूनि तितुकीं तितुक्यां समाजीं, ।
श्रीकृष्णजी वरुनि त्यांत अनादि शांत स्वामी वसे म्हणुनि कीर्ति दहादिशांत.॥१
हे कीर्ति गातां [7]सुरगायकांनीं, श्री[8]नारदें आयिकिली स्वकानीं, ।
ये द्वारके विस्मितचित्त झाला, 'पाहूं' म्हणे 'त्या पुरुषा [9]अजाला'.॥२
सोळासहस्रयुवतींसहि एकला हो! एके घडीस वरि, हें हरि केंवि लाहो? ।
नांदे कसा तितुकिया सदनीं सदा हा, पाहों दिशा सकळ वर्णिति ज्यास दाहा.॥३
परम कौतुक मानुनि ये [10]मुनी प्रतिगृहीं हरिदर्शन नेमुनी, ।
गगनपंथ धरूनिच धांवला, त्वरित [11]मुक्तिपुरीप्रति पावला. ॥ ४

---

१. सोळा हजार रूपें धारण केलीं–असा भाव. २. हें या काव्याचें नांव होय; हें काव्य हरीच करतो असें येथें पंडितांनीं दर्शविलें आहे. ३. प्रकरण, काव्य. ४. संसार. ५. या सर्गाला 'कौशल्यविजय' असेंही नांव जुनाट हस्तलिखित पोथींत आढळतें. ६. तरुणी. ७. गंधर्वांनीं. ८. नारद. [ब्रह्मदेवाच्या शरीरापासून–मांडीपासून–झालेला नारद. नार=पाणी, द=देणारा. जो पितरांना पाणी (नार) देतो तो नारद. 'नारं पानीयमित्युक्तं तत्पितृभ्यः सदा भवान् । ददाति तेन ते नाम नारदेति भविष्यति ॥' **हरिवंश** नामक ग्रंथांत या देवर्षीचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहेः—याची अंगकांति प्रज्वलिताग्नीप्रमाणें देदीप्यमान आहे, नेत्राची चकाकी बालार्कसदृश आहे, मस्तकावर जटाभार उन्नमित करून बांधला आहे. याचें शरीर सुवर्णालंकारानें भूषित केलेलें आहे. सखीप्रमाणें यानें आपल्या कक्षपुटांत एक मोठी वीणा बाळगली आहे. चंद्ररश्मीप्रमाणें शुभ्रांबर धारण केलें आहे, कृष्णमृगचर्मनिर्मित उत्तरीयवस्त्रानें आपली काया आच्छादन केली आहे, दंडकमंडलु घेतलें आहे व हा कोणी साक्षात् दुसरा इंद्र आहे असा भास होत आहे, हा जगांतील गुप्त कलहांचा जाणणारा आहे, स्कंदासारिखा ब्रह्मचारी आहे, या महर्षीस कलहप्रिय देखील म्हणत असतात, हा विद्वान् आहे व तसाच गायनकलेंत निष्णात आहे, हा ब्रह्मसूनु आहे व जणूं काय अन्यकलीच आहे, देव व गंधर्व लोकांचा आदिवक्ता व मुनिश्रेष्ठ आहे, हा चारी वेद पठण करणारा आहे व मुख्य मुख्य याज्ञिकांकडून गाइला जाणारा आहे. या ब्रह्मर्षीस नारद म्हणत असतात, हा चिरंजीव आहे व याचा ब्रह्मलोकांत संचार आहे.] ९. जन्मरहिताला. (कृष्णाला–विष्णूला.) १०. नारद. ११. द्वारकेला. 'कृष्णपुरीप्रति' असा अन्य पाठ.

जटा मस्तकीं, वाजवी ब्रह्मवीणा, हरीचे गुणीं मिश्र [1]वाणी प्रवीणा, ।
प्रभूची मुखीं गाउनी [2]कीर्त नाचे, नवे नित्य घे सोहळे कीर्तनाचे. ॥ ५
तो नारद द्वारवतीस पाहे, कीं स्वर्गशोभेस करी [3]त्रपा हे, ।
समृद्ध देखे जनसंपदांसी घरोघरींही [4]अणिमादि दासी. ॥ ६
द्वारकेंत अति रम्य [5]मळे हो [6]श्री जयांतिल कधीं न मळे हो! ।
[7]पुष्पितें उपवनें मुनि लक्षी, मोजितां न धरिवे [8]शत लक्षीं. ॥ ७
[9]विहंग ज्यांत [10]उदंड अखंड जी मधुरता वरिजे जिहिं [11]अंडजीं, ।
कुसुमित [12]द्रुमें सुंदर साजती, फळभरेंच लवोन [13]विराजती. ॥ ८
सरोवरें निर्मळ नीर ज्यांचें, कीं ज्यांमधें [14]कानन [15]नीरजांचें, ।
तयां अजी! वर्णिल कोण [16]पद्मा? जेथें असे [17]सद्म करूनि [18]पद्मा. ॥ ९
[19]परागं नीरीं [20]नवपंकजांचे कस्तूरि धिक्कारिति [21]पंक ज्यांचे, ।
देखोनि त्या [22]मुक्तिपुरीं जळाला संसारसंताप असे [23]जळाला. ॥ १०
अन्य सर्व उपमा श्रम राहो, पंकजें [24]मुनिमनभ्रमरा हो! ।
द्वारकापतिपदें दिसती हो! जीं स्तनीं धरि [25]अनादि सती हो. ॥ ११
[26]हरिपदोपमपद्म सरोवरीं [27]परमहंस मुनींद्र सरोवरीं, ।
दिसति हंसहि सात्विक साजिरे वसति लाभ दुज्यां न असा [28]जिरे. ॥ १२

१. प्रवीणा वाणी=कुशल वाचा. २. यश, कीर्ति. ३. लज्जा. ४. अणिमादि अष्टसिद्धि. (पृष्ठ २०२ टीप ११ पहा.) ५. बागा. ६. लक्ष्मी, शोभा. ७. फुललेलीं उद्यानें. ८. शंभर लक्ष. ९. पक्षी. १०. पुष्कळ. ११. पक्ष्यांनीं. १२. वृक्ष. १३. शोभतात. १४. अरण्य, वन. १५. कमळांचें. १६. कमळांस. १७. घर. १८. लक्ष्मी. १९. पुष्परज, पुष्पधूलि. २०. नूतन कमळांचे. (पंकज=चिखलांत झालेलें; कमल चिखलांत होतें म्हणून 'पंकज' हा शब्द 'कमल' या अर्थी योगरूढ जाणावा.) २१. चिखल. २२. द्वारकेंतील उदकास पाहून. २३. दग्ध झाला, नष्ट झाला. २४. नारदाचें मन हेंच भ्रमर, त्याला द्वारकापतीचीं (कृष्णाचीं) पदें कमलें (पंकजें) अशीं दिसतीं. २५. लक्ष्मी. २६. हरीच्या (कृष्णाच्या) पदाची (चरणाची) उपमा (सदृशता) ज्याला आहे असें पद्म (कमळ) ज्यांत आहे तें (सरोवर). [ज्याप्रमाणें परमहंस (संन्यासी—योगी) द्वारकेंत वास करतात त्याप्रमाणें हे सात्विक हंस सरोवरांत वसति करतात.] २७. परमहंस=तपाकरितां ज्यानें इंद्रियदमन केलें असा संन्यासी; कुटीचक, बहूदक, हंस आणि परमहंस असे भिक्षुजनांचे चार प्रकार आहेत. एकापेक्षां दुसरा, दुसऱ्यापेक्षां तिसरा श्रेष्ठ, असा यांच्या माहात्म्याचा अनुक्रम आहे. ['चतुर्विधा भिक्षवस्ते कुटीचकबहूदकौ । हंसः परमहंसश्च यो यः पश्चात् स उत्तमः ॥.'] २८. पचणार नाहीं.

हरिपदाकृतिनें असि सारसीं[1] प्रभुपुरींत[2] तया जळसारसीं, ।
त्यजुनि आवडि लौकिकसारसीं[3] वसति मांडियली द्विजसारसीं[4][5]. ॥ १३
सांडिला कुसुमसंभ्रम[6] रानीं द्वारकाजळरुहीं[7] भ्रमरांनीं, ।
जेरिती मुनिमनोमधुपांनीं[8] कृष्णपादकमळीं मधुपानीं[9]. ॥ १४
कृष्णपादकमळीं न रसाचा स्वाद घेत नरवानर[10] साचा, ।
वानरादिकहि राघव तारी, हा तरे न कवणे अवतारीं? ॥ १५
निर्माण[11] ज्याणें विधि[12] शंभु[13] केले, त्याकारणें लोचन हे भुकेले; ।
त्याचीं पदाब्जेंचि[14] पहावयाला त्वरा दुजा न प्रियें[15] भाव याला. ॥ १६
असे सर्वठायीं जरी हीं[16] उदास प्रभूची पुरी रम्य त्या नारदास. ।
गमे कीं हरीची तनू त्यास वाटे, पहातां उठे प्रेम उल्हासवाटे. ॥ १७
द्वारकाविभव[17] जो मुनि लक्षी, माडियांसि गणना नवलक्षीं[18], ।
उच्च शुभ्ररजता[19] स्फटिकाच्या चांदण्या[20] रजनिच्या[21] घटिकाऱ्या. ॥ १८
चांदण्यांत सितें[22] वस्तु विराजे, वर्णिती निपुण जे कविराजे; ।

---

१. रसभरित. २. द्वारकेंत. ३. सहा रसांतील. [गोड, खारट, कडु, तुरट, आंबट आणि तिखट असे सहा रस आहेत. 'रसो बहुविधः प्रोक्त ऋषिभिः प्रथितात्मभिः । मधुरो लवणस्तिक्तः कषायोऽम्लः कटुस्तथा ॥.'] ४. पक्षी (ब्राह्मण). ५. सारस नामक पक्ष्यांनीं. सारसपक्षी हे बहुधा जलाशयाचा आश्रय धरून राहतात, यामुळें यांच्या शब्दावरून जलार्थी पथिकांस जलाशय समीप अथवा दूर आहे हें समजतें. हे पक्षी उत्तर हिंदुस्थानांत पुष्कळ ठिकाणीं आढळतात असें समजतें. [मालविकाग्निमित्र—अंक ३ श्लोक ६.] ६. फुलांसाठीं भ्रमण करणें. ७. द्वारकारूप कमळीं. ८. ऋषींच्या चित्तरूप भ्रमरांनीं. मुनींचीं मनें हे मधुप (भ्रमर) होत. मधुप हे कमलरसलोलुप असतात हें तर सुप्रसिद्ध आहे. या मुनिमनोरूप मधुपांनीं कृष्णचरणकमळाचा रसास्वाद ग्रहण केल्यामुळें त्यांनीं इतर स्थळें वर्ज केलीं. त्याचप्रमाणें भ्रमरांनीं सरोवरांतील कमळांस भुलून इतरत्र पुष्पांसाठीं भ्रमण करणें सोडून दिलें. [मधुप=भुंगा, फुलांतील मध (मधु) पिणारा. या शब्दाचा दुसरा अर्थ मद्य पिणारा, मद्यपी, असा आहे.] ९. पुष्परसपान, मधुसेवन. १०. वानराप्रमाणें विवेकशून्य मनुष्य. जो अविचारी प्राणी कृष्णपादसरोजाचा रसास्वाद सेवन करीत नाहीं त्यास तरणोपाय नाहीं, त्याचा उद्धार व्हावयाचा नाहीं, तो तरणार नाहीं. ११. 'रूपें सुखी ज्या विधि शंभु केले' असाही पाठ आहे. १२. ब्रह्मदेव. १३. शंकर. १४. पद+अब्जें=चरण+कमळें. [अब्ज=अप्+ज=उदक+झालेलें=उदकांत झालेलें तें=अब्ज=कमळ.] १५. 'प्रति' असा अन्य पाठभेद आहे. १६. हा नारद मुनि. हा सकळ वस्तुजाताविषयीं उदासीन होता; हा कोणाच्याही वस्तुविषयीं अनुरक्त नव्हता. १७. ऐश्वर्य, वैभव. १८. नवलक्ष माड्यांचीं गृहें होतीं. १९. रुप्याच्या, रुपेरी. २०. चांदवे. २१. रात्रीच्या. २२. शुभ्र, पांढरी.

मौक्तिकासहित चांदवियांची[1] दीप्ति तृप्ति करि यादवियांची[2]. ॥ १९
भूमि त्या नगरिं रत्नमणींची कोंदणें जडित [3]इंद्रमणींचीं, ।
वाट ते गजरथाश्वनृपांची, हेम दिव्य वरि सुंदर पाची[4]. ॥ २०
रत्नहेमखचिता पडशाळा, सत्सभा बहु अशाचि विशाळा; ।
पंक्ति रत्नमय हाटवट्याची[5] दीप्ति रातिस दिसे दिवट्यांची[6]. ॥ २१
देखे असींच नवलें मुनि फार वाटे[7] देखोनि कृष्ण गृहसौख्य अपार वाटे[8], ।
द्वारीं उभे सकळही सुर[9] लोकपाळ[10] श्रीकांत ज्यांत असतो भुवनैकपाळ. ॥ २२
देखिलें हरिचिया भुवनाशी[11] दर्शनें करुनि जें भव[12] नाशी, ।
त्यांत षोडशसहस्र सतींचीं मंदिरें हरिचिये वसतीचीं. ॥ २३
कौशल्य तें परम कीं भवबंध नाशी, कौशल्य तें न अजि जें करि बंधनाशी[13], ।
कौशल्य वांछित असें नरराजयाला, कौशल्य अर्पुनि भजो यदुराजयाला. ॥ २४
काव्यांत ज्या कुनर[14] आणि अपूतनारी[15] वर्णूनि वर्णिति जयांत न पूतनारी[16], ।
तें काकतीर्थचि, कदापि न मानसाच्या[17] हंसाचिया रमति हो! [18]गति मानसाच्या ॥
स्वकौशल्य तें विश्वकर्मा विशेषें हरीचे गृहीं दाखवी हो! [19]अशेषें, ।
गृहें त्यांत सोळासहस्त्रें समानें अशाही पुरीमाजि जे [20]भासमानें. ॥ २६
सहस्त्रें जीं सोळा यदुपतिगृहें, त्यांतहि मुनी
निघे एक्या गेहीं, हरिपदरजांलागिं नमुनी, ।

---

१. छताची, (मोत्यांच्या झालरीसहित चांदव्याची.) २. यादवांची. ३. 'रत्नमणीची' असा अन्य पाठभेद आहे. ४. पाच. ५. बाजारची ओळ. ६. मशालींची कांति. ७. मार्गी. ८. भासे. ९. देव. १०. अष्ट लोकपाल=अष्टदिक्पाल=आठ दिशांस पालन करणारे आठ प्रभु—यम, वरुण, इंद्र, कुबेर, वायु इत्यादि. ११. घराला. १२. संसार. १३. संसारबंधन. १४. कुत्सित पुरुष. १५. जारिणी स्त्रिया. १६. कृष्ण. (पूतनेचा अरि–शत्रु.) १७. मानस सरोवराच्या. [मानस=हें सरोवर कैलासशिखरावर ब्रह्मदेवानें आपल्या मनानें निर्मित केलें, म्हणून याला मानस असें म्हणतात. हें हंसांचें प्रिय वसतिस्थान होय. गर्भधारणसमयीं हंस हे येथें वाहेरून येऊन वर्षाकाळ घालवितात असें वर्णन आहे.] १८. हंसाच्या मानसाच्या (मनाच्या) गति अहो! त्या काकतीर्थांत कदापि सुख (रति) पावणार नाहींत. [काकतीर्थ=ज्या जलाशयांत कावळ्याला स्नान करण्यापुरतें उदक असतें तें. हंस=हे पक्षी हिमालय पर्वताच्या कैलासशिखरावरील मानससरोवराकडे वर्षाकाळाच्या आरंभीं मोठ्या प्रेमानें गर्भधारणसमय आला असें जाणून राहण्यासाठीं जातात; हें सरोवर यांच्या प्रेमाचें स्थान आहे आणि यांना नीरक्षीरविवेक करण्याचें नैसर्गिक सामर्थ्य आहे, असें या पक्ष्याविषयीं प्राचीन कवींच्या ग्रंथांत वर्णन दृष्टीस पडतें. वरची टीप पहा.] १९. संपूर्ण. २०. शोभमानें.

निघाला वैकुंठीं म्हणुनि मुनिला वाटत असे,
विलास श्रीकांत क्षितिवरिहि दावी अजि! असे. ॥ २७

स्वयंभ[1] स्तंभ[2] श्री[3]मरकतमणीचेच वरते,
फळाच्याही रूपें खचित मणि वैडुर्य वर ते, ।
न रात्रींही जेथें किमपि तम[4] कीं उत्तम मणी,
प्रकाशीतो[5] जाणों उदित तितुकेही दिनमणी[6]. ॥ २८

शशीची प्रभा पांढरी चांदव्याला[7] गमे विश्वकर्माब्धि[8] तो चांद व्याला[9], ।
जया भोंवतें वृंद मुक्ताद्विजांचें[10] जिहीं मोहिलें नेत्र मुक्ताद्विजांचें[11]. ॥ २९

चांदव्या करुनि त्याचि अपारा तृप्ति मानिति चकोर[12] दुपारां, ।
कृष्णपादनखचंद्रसुधा ते देखतां विहंगबुद्धिहि[13] धाते[14]. ॥ ३०

गृहांतील कृष्णागराचा[15] निघे तो, नभीं धूम्रही मेघ मानूनि घे तो, ।
सुखें नाचती देखती त्यास[16] मोर स्त्रिया हांसती ज्या उभ्या त्या समोर. ॥ ३१

ज्या कांकण्या[17] वक्र गृहाग्रभागीं रत्नांकिता त्यांत यथाविभागीं, ।
चकोर पारावत[18] हंस पक्षी मयूरही नेत्रें[19] जयांसि पक्षीं. ॥ ३२

---

१. स्वयंभू. २. स्तंभ=खांब. ('स्तंभ' शब्दांतील 'स्त'ला 'ख' असा आदेश होऊन 'खांब' शब्द उत्पन्न झाला.) ३. पाचेचे. ४. अंधकार. ५. यांत उत्प्रेक्षा आहे. ६. सूर्य. ते मणि इतके तेजस्वी कीं इतके सूर्यच उगवले असें भासे. ७. छताला. ८. विश्वकर्मारूप समुद्र. ९. जन्म दिला. सागरांतून जसा चंद्र उत्पन्न झाला तसा चांद (चांदवा) विश्वकर्मरूप सागरांतून जन्मला. १०. मुक्ताफळें आणि चंद्र यांचें. ११. मुक्त विप्रांचें. १२. चकोर=चंद्रिकापान करून तृप्ति पावणारे पक्षी. पुढें कविसमय दिले आहेत ते पहा. १३. पक्ष्यांची मति. १४. तृप्त होते. १५. कृष्णागरु नामक चंदनाचा. या चंदनाचा धूम्र (धूर) घराबाहेर आकाशांत इतका निघे कीं मोरांस मेघागमाचा भास होऊन ते नृत्य करूं लागत. [धूर हा मेघांचा एक घटक अवयव होय अशी प्राचीन कवींची समजूत आहे व तिला अनुसरून मेघदूतादिक काव्यांत तदनुरूप वर्णनही आढळतें. उदक, वायु, विद्युत आणि धूम्र हीं एकवटून मेघ झाला आहे असें वर्णन मेघदूतांत आहे.] १६. वर्षाकाळांत मोर मेघाला पाहून आनंदानें नाचूं लागतात असा कविसमय आहे. १७. घराचे छाकारास आधारभूत जें वासा, कडणी, थाटा इत्यादि लांकूड तें. यालाच संस्कृतांत वडभि, वलभि, असें म्हणतात, हें वक्राकृति असतें. यांत अनेक पक्षी राहत होते. १८. पारवे. १९. ज्यांच्या पिसाऱ्यावर नेत्र आहेत असे मोर. मयूराच्या पिच्छकलापावर डोळ्यासारखी वाटोळी जी आकृति असते तिलाच नेत्र असें म्हणतात. यालाच संस्कृतांत 'मेचक' अशी संज्ञा आहे. मेचक=मोराच्या पिसाऱ्याचा डोळा.

त्या अंडजांमाजि चकोरजाती दे चांदव्यालागिं गृहांत जाती, ।
बाहेर ये [3]वृंद तया घनाचें विलासमानी शिखिवृंद नाचे. ॥ ३३
इत्यादि या कुशलता करि विश्वकर्मा, दावी म्हणे, 'जडसचेतनविश्वकर्मा ।
संतुष्ट हो किमपि मानुनि हे स्वसेवा' भावें अशा कुशळ हो! तुम्हि कां न सेवा? ३४
कौशल्य जें ज्यांस असेल लोकीं, तें श्रीहरीच्याच कृपावलोकीं, ।
देणें हरीचेंच तया हरीतें न अर्पितां काळ वृथा हरी तें. ॥ ३५
पेरूनि लाभ अधिकाधिक घे पिकाचा, तो एक पक्क म्हणवे न कदापि कांचा, ।
दे भूमितें करुनि अन्न न पाणि खातो, पेरी न तींत तरि पात्र न आंणिखा तो.॥ ३६
उष्टीं धुतां अन्न न काय सांचे? गर्तीजळीं त्या मग वायसांचे ।
समूह धांती, न कदापि जाती त्या काकतीर्थाप्रति [12]हंसजाती. ॥ ३७
उच्छिष्ट ताटांतिल अन्न सांचे, धुतां जळीं त्या मग वायसांचे ।
समूह तें घेउनि तृप्त जाती, न पाहती ते शुकहंसजाती. ॥ ३८
धनाकारणें जे पराधीन वाणी, कवी नाचवीती वृथा दीनवाणी, ।
अहो! त्यांत अन्योन्य उच्छिष्ट सारें कवित्वें जना वाटती तींच सारें.॥ ३९
हरिगुणअमृतें जीं वाढिलीं व्यासदेवें
शुकसम जनवृंदें तींच घेती सदेवें, ।
विविध मग असे ते ग्रंथ उद्गार सांचे
सहज निघति त्यांच्या तत्पदांच्या रसाचे. ॥ ४०
यालागिं जे कुशळता करि विश्वकर्मा संतुष्ट हो मज म्हणे प्रभु विश्वकर्मा, ।
ऐवं असेल कुशलत्व नरा जयाला तो तें समर्पण करू यदुराजयाला. ॥ ४१
मुकुंदाच्या पायीं कुशळ न समर्पी कुशळता,
करी आयुष्याचा व्यय कुशळता ते विषलता, ।

---

१. अंडज=पक्षी. [जरायुज, स्वेदज, अंडज आणि उद्भिज्ज अशा चार कोटी (वर्ग) आहेत.] २. चांदणें असें समजून ३. 'धूम' असा अन्य पाठभेद आहे. ४. 'वृंद' शब्द नपुंसकलिंगी आहे म्हणून 'घनाचें' असें रूप योजिलें आहे. ५. मोरांचा समुदाय. ६. सचेतन आणि जड (अचेतन) पदार्थांनीं युक्त असें जग उत्पन्नकर्ता परमेश्वर माझी सेवा पाहून संतुष्ट होवो या भावानें विश्वकर्म्यानें आपलें संपूर्ण रचनाकौशल्य दाखविलें. द्वारका एका रात्रींत केली असा येथें अर्थसंदर्भ आहे. ७. चतुर लोक हो! ८. हरण करतें. ९. कच्चा. १०. आणिका. ११. खळग्यांतील पाण्यांत. १२. कावळ्यांचे समूह मात्र गर्ताजळांत तृप्त होतात, अन्य पक्षी होत नाहींत. १३. हंससमूह. १४. पोपट, हंस इत्यादि श्रेष्ठ जातींचे पक्षी. १५. सगळें. १६. श्रेष्ठ. १७. शुकासारखे. १८. सदैवें, उत्तम दैवानें. १९. सांठा. २०. विश्वकर्ता. २१. असें.

पहा तो कौशल्यें यदुपतिकृतें वामन मनीं
तरी त्यातें अर्पी न जरि तरि विश्राम न मनीं. ॥ ४२
हरीच्या या लीला नवरससुधासार सकळा,
हरीती ज्या गातां कुरसभवरोगादिसकळा, ।
असो ते हे सांडी रसिक जन हे साक्षि हरि तो
अजी! जे या ग्रंथीं त्रिगुण तरि नामेंच हरितो. ॥ ४३
न जाणें कौशल्यें किमपि परि पोटीं नियम कीं,
हरीच्या या लीला हरिच रचितो चित्रयमकीं, ।
तरी सर्वा ग्रंथीं प्रतिपदहि अर्पूनि हरिला
अहंकर्तृत्वाचा अनुसृतहि संस्कार हरिला. ॥ ४४

'नारदातिथ्यविजय' नामक सर्ग तिसरा.

(श्लोक.)

यानंतरें नारद त्या अजाला देखून कैसा कृतकार्य झाला ? ।
त्या आयका श्रीहरिच्या कथा रे! तरेच येथें जरि चित्त थांरे. ॥ १
सोळासहस्रांतहि पट्टराणी श्रीरुक्मिणी आदिरमा पुराणी, ।
आठां स्त्रियांमाजिहि मुख्य दारा, जे कां न सोडि क्षण त्या उदारा.॥२
आधीं तिच्या नारद ये गृहातें, तों घेउनी चौंमर दिव्य हातें ।
सेवा करी श्रीयदुनायकाची जी भोंवती दाटणि बायकांची. ॥ ३

---

१. विश्रांति, विसांवा. २. शृंगारादि नवरसरूप अमृतानें परिपूर्ण. ३. सत्वरजस्तमोगुण. ४. मनांत. ५. हें काव्य आपण रचीत नाहीं, तर हरीच रचतो, असे उद्गार वामनाच्या काव्यांत वारंवार आढळतात. ६. नानविध यमकांनीं युक्त. ७. मी कर्ता आहें असा गर्व (अहंकार). ८. हरण केला. या सर्गाचें नांव कवीनें येथें सांगितलें नाहीं, यावरून या सर्गाचे अखेरीचे आणखी एक दोन श्लोक असावे असें वाटतें. ९. या सर्गाला 'गृहधर्मविजय' असेंही नांव जुनाट हस्तलिखित पोथींत आढळतें. १०. स्थिर होईल. ११. जांबवती, सत्या, भद्रा, लक्ष्मणा, कालिंदी, मित्रविंदा इत्यादि अष्टनायिकांत. १२. चंवरी. [चमर जातीच्या हरिणाच्या शेंपटास गोंडे असतात त्यांची चंवरी करतात.] १३. गर्दी. १४. 'बायको' या शब्दाची उत्पत्ति चमत्कारिक दिसते. 'बाला' आणि त्यापासून झालेला 'बालिका' शब्द, यांचा अर्थ कन्या किंवा तरुण स्त्री. या 'बालिका' शब्दाचा अपभ्रंश 'बाइका.' हा मूळचा एकवचनी शब्द. याचें बहुवचन 'बाइकाओ.' याचेंच 'बाइको,' 'बायको' असें रूपांतर झालें. अर्थात् हा मूळचा बहुवचनीं योजावयाचा शब्द. सत्कारपूर्वक बो-लायाचें असवां. एका स्त्रीच्या अर्थीही, 'बायका बाहेर गेल्या आहेत, आतां येतील' असें जसें

तीसमान सखिया नॅग मोतें लेइल्या नवल कीं न गमो तें, ।
हे विलास सकळां सदनाचे देखतां सुरसभासद नाचे. ॥ ४
रूपें गुणें वेष वयें समाना सख्या सहस्रावधि भासमाना, ।
दासीं तया श्रीहरिची विभूती समात्मता सन्मति जेंवि मूर्ती. ॥ ५
सदनिं त्या मुनि लंघुनि उंबरा निघतसे अजि! तों कनकांबरा ।
स्वजनदर्शनउत्सव पावला, लगबगें उडि टाकुनि धांवला. ॥ ६

सध्यां बोलतात, तसेंच पूर्वी एका स्त्रीच्या अर्थीही 'बायको' या शब्दाची योजना सत्कारास्तव होऊं लागली, आणि कालांतरानें अर्थाकडे दुर्लक्ष होऊन हाच शब्द एकवचनीं चालूं लागला, आणि इतर स्त्रीलिंग शब्दांच्या धोरणानें याचें पुन: 'बायका' असें आकारान्त बहुवचन झालें. सारांश 'बायका' हें मूळचें एकवचन आणि 'बायको' हें बहुवचन असून, सध्यां त्यांचा अर्थ अशा रीतीनें उलट झाला आहे, असें दिसतें. 'बालिका' याचाच दुसरा अपभ्रंश 'बाइआ' आणि याचें बहुवचन 'बाइआओ' अथवा 'बायो.' परंतु हाही शब्द आतां एकवचनीं चालतो. 'ताटका' नांवाची मोठी धिप्पाड राक्षसी होती; यावरून, तशीच कोणी धिप्पाड आणि अस्ताव्यस्त अमर्याद बायको असली, तर तिलाही 'ताटका' शब्द लावितात. 'ताटका' हा शब्द तर मूळचा निर्विवाद एकवचनीं चालणारा; आणि अजून तो तसा चालतो. परंतु त्याचेंच रूपांतर असा 'ताटको' हा जो दुसरा एक शब्द, त्याचें पुन: बहुवचन 'ताटका' हेंच आहे. यावरून एथेंही असें दिसतें कीं 'बायको' शब्दाप्रमाणें 'ताटको' हें जुनें बहुवचनरूप आहे. इतकाच भेद कीं 'बायको' या शब्दामध्यें जो सत्कारसूचक अर्थ दिसतो, त्याच्या स्थानीं एथें ढमालपणाचा अर्थ आहे. तथापि दोहों शब्दांच्या उत्पत्तीचा म्हणून जो प्रकार, त्यामध्यें कांहीं भेद दिसत नाहीं. 'ढंबो' शब्दामध्येंही तोच प्रकार दिसतो. जुन्या प्राकृत भाषेमध्यें बहुतेक शब्दांपुढें बहुवचनीं, 'ओ' प्रत्यय लागत असे. जसें, रमा–रमाओ. अद्यापि गुजराथी भाषेमध्यें तसेंच आहे. जसें, विद्या–विद्याओ. गोमंतकी, मालवणी, इत्यादि कोंकणी भाषांतही तोच प्रकार आहे. जसें, बाईल–बाइलो. आणि यावरून असें वाटतें कीं 'बाइलो,' 'बाइकाओ' अथवा 'बाइको' हे शब्द मूळचे एकच. या सर्व गोष्टी लक्षांत आणितां, पूर्वोक्त तर्काला तितकी बळकटी येते. 'बायकूं' असें कुत्सितार्थक रूप आधीं असून त्यापासून मग 'बायको' असा शब्द झाला असावा, असा तर्क कित्येकांनीं केला आहे, त्याला कांहीं आधार दिसत नाहीं. आतां शंका काढणाराला एक स्थळ आहे. तें असें कीं 'बालक' हा जो पुंलिंग शब्द, त्याचें प्राकृत भाषेंत 'बालको' आणि 'बालका' किंवा 'बायको' आणि 'बायका' अशीं क्रमश: एकवचनीं आणि बहुवचनीं रूपें होण्याचा संभव आहे. परंतु स्त्रियांना पुंलिंगनामें चालू झालीं, अशी राठस कल्पना करणें, किंवा वर दाखविल्याप्रमाणें 'बायकूं' शब्दापासून 'बायको' शब्द निघाला असें मानण्यापेक्षां आपल्या लोकांच्या सभ्य चालीस अनुसरून स्त्रीला सत्कारबोधक 'बायको' हें मूळचें बहुवचनी नाम चालू झालें, असें मानणें विशेष संभाव्य व प्रशस्त दिसतें. (विविधज्ञानविस्तार–पु० २२ अं० १–२.)

१. दागिने. २. नारद. ३. प्रकाशमाना. ४. प्राण्याच्या ठायीं. ५. उंबरा हा देशी शब्द आहे. ६. सुवर्णासारिखा पिवळा पीतांबर धारण करणारा. (कृष्ण.)

उडी टाकिली श्रीपलंगावरूनि त्वरें उत्तरीयांबरा सांवरूनी, ।
किरीटांकितें मस्तकें विप्रपायीं[3] नमी वंदिजे जो सुरेंद्रें उपायीं. ॥ ७
जया वंदिजे ज्या विरिंच्यादि दासीं जया वंदिजे भक्तवृंदीं उदासीं, ।
न साध्यांश ज्या सिद्धिमुक्ति प्रदासीपरी वंदितो देव तो नारदासी. ॥ ८
रमाकांत सोळासहस्रांगनाचा पती लाभ दे त्यासि आलिंगनाचा, ।
धरूनि स्वहस्तद्वयें भक्तपाणी पलंगावरी बैसवी चक्रपाणी. ॥ ९
पाँदोदकें जो त्रिजगास तारी अनंतकल्याणगुणावतारी ।
स्वमस्तकीं क्षाळुनि देव तो या श्रीनारदाच्या धरि पाँदतोया. ॥ १०
पूजी यथाविधि म्हणे मग पूर्णकाम[11], 'स्वामी! वदा किमपि जें मज योग्य काम.'।
बोले मुनी, 'नवल जी! मज हो न वाटे कीं आविसी जन समस्तहि याच वांटे. ११
देणार मागितलिया परमा गतीतें नेघें तिला म्हणसिही जरि माग तीतें, ।
मागेन पाय अवलोकुनियां स्मृतीतें आलों असें धरुनि निश्चय या मतीतें.॥ १२
पद तुझे हृदयीं हरि! रेखिले, असति ते अजि! दृष्टिस देखिले, ।
स्मृति असीच असो हृदयांबुजीं सरस हें घननीळ दयांबु जी!' ॥ १३
तेथूनि गेला दुसऱ्या गृहातें तों कृष्ण फांसे उचलोनि हातें, ।
गृहेश्वरीशीं निजउद्धवासीं खेळे हृदंभोरुहशुद्धवासी. ॥ १४
पूजा यथापूर्वचि नारदाची करूनि त्या भक्तिविशारदाची ।
म्हणे अपूर्णासहि पूर्णकाम 'स्वामी! वदा जी! मज योग्य काम.' ॥ १५
हरि असा जरि मानहि दे वदे, तरि न उत्तर तो क्षितिदेव[22] दे, ।
प्रतिगृहीं करि जो, नव लक्षणें दिसति तीं नवमानवलक्षणें. ॥ १६
'आलेत केव्हां' पुसतां द्विजाला तत्पूर्वपूजा गरुडध्वजाला, ।
जाणों नसे ठाउक त्या अजाला, तेव्हां ऋषी विस्मितचित्त जाला. ॥ १७

१. खांद्यावरील वस्त्रास. २. मुकटमंडित मस्तकानें. ३. 'त्वरें टाकिता मस्तका विप्रपायीं' असा अन्य पाठ आहे. ४. इंद्रें. ५. प्रयत्नानें. ६. ब्रह्मदेवादिक दासांनीं. ७. भक्त जो नारद त्याचा हात. ८. कृष्ण. (पृष्ठ ३१७ टीप ३ पहा.) ९. पादतीर्थानें. १०. पायांचें तीर्थ. ११. ज्यानें काम (सकळ जनांचे मनोरथ) पूर्ण (सफळ) केले आहेत तो. १२. मागाला. १३. मुक्तीतें, सद्गतीतें. १४. हृदयकमळांत. १५. दयारूप अंबु (उदक). १६. घरधणीण, स्त्री. 'गृहेश्वरीशीं अणि उद्धवासीं' असा अन्य पाठ आहे. १७. आपल्या उत्साहानें. १८. शुद्ध हृदयकमळीं राहणारा. १९. भक्तिनिपुणाची. २०. नारदाला. २१. कृष्ण. २२. भूदेव. (नारद.) २३. पाहणें. २४. नूतन मनुष्याचीं लक्षणें. २५. त्याची अगोदर केलेली पूजा. २६. कृष्णाला. २७. झाला.

घरोघरीं नूतन भाव दावी माया हरीची किति ते वदावी ? ।
एवंच ये आणिखिया गृहातें धरूनि वीणा मुनिवर्य हातें. ॥ १८
तों लेंकुरें खेळवितो हरी तो, जो मोह माया स्मरणें हरीतो, ।
त्या बाळका लाडवि लोकरीती क्रीडा करी, लोक जसे करीती. ॥ १९
बोबडी करुनि दाटुनि वाणी बोलतो परमकौतुकवाणी, ।
बाळ बोलति तसेंच हरी तो बोलतो गृहिणिचित्त हरीतो. ॥ २०
उंचचि नौबदसाकल खोबलें खैज़ुल देउनि गाय बलें [6]बलें ।
बसुनियां मग तूं गैंलुलावली भेजपुलें उंलवीं बलिं वोंवली. ॥ २१
चौलोलिया देइन गोलें[12] गोला गोलांबिया[13] देइन फौलफाला, ।
मी ईंहुनी आवलतों खलें कीं ऐसा हेंली खेलवि लेंकलें कीं. ॥२२
हरि मुलांसह [17]कंदुक खेळतो परि न लौकिक केवळ खेळ तो, ।
स्वकरिं घेउनि कंदुक सीकवी गति पहा वदताति कसी कवी ? ॥ २३
[1]मुनिमानस वृंदचि कंदुकसे यदुनंदन कंदुक तेचि कसे, ।
करिं घेउनि [19]नंदन खेळवि तो प्रभु तो मनिं चिज्जंडखेळ वितो. ॥२४
मनकंदुक ते करिंचे पडती विषय क्षितितें न तरी जेंडती, ।
पडतांचि [22]चिदंबरिं जे उडती हरितें अजि! ते बहु आवडती. ॥२५

---

१. स्त्रीचें मन हरण करतो. २. उंसचि. ३. खडीसाखर. ४. खोबरें. ५. खजुर. ६. बरें. ७. गरुडावरी. ८. मजपुढें. ९. वरी बावडी उडव. १०. बावडी. ११. चारोळ्या. १२. गोड. १३. गोडंब्या. १४. फार. १५. हरी. १६. लेकरें. मोरोपंतांची ही बोबड्या शब्दांची कविता एक दोन ठिकाणीं आढळते:—कृष्णास शकटासुर मारावयास आला त्या प्रसंगींची उक्ति—'गोपशिशु म्हणति, पलिसा ललतां हलिनेंचि झालिला पाय । गाला उलोनि पलला, सल्व खलें, नवल कलितसां काय ? ॥'; बकराक्षसवधप्रसंगीं विप्रपुत्राची मातापितरांस उक्ति अशी आहे:—'समजावुनि त्यांसि म्हणे, ऐसें लालिंचलासि मालीन । का ललतां आललतां पलतां मी सागलांत ताळीन ॥.' येथें पंडितांनीं आणि पंतांनीं समर्पक शब्दयोजना केली आहे म्हणून हें शब्दचमत्काराचें उत्तम उदाहरण होय. इतकेंच नव्हे तर शब्द आणि अर्थ हे परस्परानुरूप आहेत. १७. चेंडू. १८. या व पुढच्या सहा श्लोकांचें वृत्त तोटक आहे. याचें लक्षण:—'सकारैरन्वितं वृत्तं चतुर्भिर्युगपत्स्थितैः । उदितं तोटकं नाम वृत्तज्ञैर्द्वादशाक्षरम् ॥' [श्रीक्षेमेंद्रकृत सुवृत्ततिलक—१।२५]; 'द्रुततालल्यैरेव व्यक्तं रूक्षाक्षरैः पदैः । प्रनर्तयेति यच्चित्तं तत्तोटकमभीप्सितम् ॥.' [सुवृत्ततिलक २।१६] १९. मुलगा. २०. चैतन्य आणि माया यांचा खेळ. २१. वर उसळतो. ज्यांचा मनोरूप कंदुक विषयरूप क्षितीवर ठरत नाहीं. २२. चैतन्यरूप आकाशांत.

मनकंदुक ते [1]कृतकर्मफळें, विषयक्षिति [2]आफलि दैवबळें; ।
अधिकाधिक [3]चिद्गगनीं कुशळें उडती मनकंदुक इंदुकळे. ॥ २६
विषय क्षितिऊपरि त्याचि पडे, मन [4]मृन्मयपिंड न तों उपडे; ।
निपटूनि तथासहि बाळ करीं, धरिती परि आदर हा न करीं. ॥ २७
[5]प्रतिबिंबचिदंशक बाळक ते, निजमानसइंद्रियचाळक ते, ।
चिखलासमही मन खेळविती, विषयप्रिय बंधक खेळ [6]विती. ॥ २८
परि कंदुकखेळचि बिंब हरी, [7]सिकवि प्रभु जो भवबंध [8]हरी; ।
[9]मनकर्दमखेळ न तो सिकवी म्हणताति जगद्गुरु ज्यासि कवी. ॥ २९
मुनि कौतुक दूरुनि पाहतसे, स्वमनांत पहा तुम्हि सर्व तसे, ।
विषयक्षितिहूनि तई उडती [10]सुमनें प्रभुला मग आवडती. ॥ ३०
इत्यादि लौकिकरसांत अलोक रीती दावी चरित्र हरि लोक जसें करीती, ।
ऐसा [11]लंपोनि हरि दूरुनि देखिला, हो ! तैसाचि तो मुनिवरें मनिं रेखिला हो. ३१
तेथूनिही अन्यगृहास जावें, त्याही गृहीं येचि रितीं भजावें; ।
म्हणूनि ये [12]मेघतनू समोर, पाहे तया, जेंवि घनास [13]मोरें. ॥ ३२

---

१. केलेल्या कर्मांच्या फळानें. २. आपटतो. मुनींचीं मनें भाग्यप्रभावानें विषयरूप भूमीवर आलीं तरी तीं तेथें आसक्त होत नाहींत. ३. चित्+गगन=चैतन्य+आकाश. ४. मातीचा पिंड. [मृन्मय=मृद् (मृत्तिका—माती)+मय=प्रचुर, युक्त. 'मय'प्रत्यय नामांस लागून 'केलेला, विकृत' आणि 'प्रचुर, विपुल' या अर्थी विशेषणें होतात; जसें—पिष्टमय (पिठाचा केलेला), काष्ठमय (लांकडी), मृन्मय (मातीचा केलेला), घृतमय (घृतानें प्रचुर, भरलेला), मोदकमय (मोदकांनीं भरलेला.)] असाधुजनांचीं मनें विषयभूमीस मातीच्या पिंडाप्रमाणें चिकटून असतात. ५. हरीचें प्रतिबिंब. ६. प्रसविती. ७. संसारपाश हरण करणारा प्रभु (ईश्वर) कंदुककेलि शिकवितो; कंदुकाप्रमाणें विषयभूमीस सोडून वर या,—मृन्मय पिंडाप्रमाणें विषयभूमीस चिकटून राहूं नका—असें शिकवितो. ८. हरण करी. ९. कर्दम=चिखल. ज्याला कवि (पंडितजन) जगद्गुरु (जगताचा गुरु—नायक) असें म्हणतात तो मनाला चिखलाची क्रीडा (चिखलाप्रमाणें विषयांस चिकटून राहणें) शिकवीत नाहीं. १०. चांगलीं मनें. (सुजनचित्तें.) ११. 'पळोनि' असाही पाठ आहे. १२. मेघश्याम कृष्ण. १३. मोर मेघास जसा उत्कंठेनें पाहतो तसा नारदमुनि कृष्णास पाहूं लागला. मेघास पाहून मोर सानंद नाचतात असा कविसंकेत आहे. हे कविसंकेत अनेक आहेत, त्यांतून मुख्य मुख्य येथें देतों:—आकाश व पाप यांचा रंग काळा असतो; हास व कीर्ति यांचा वर्ण धवल (शुभ्र); प्रीति व क्रोध यांचा वर्ण तांबडा (रक्त); नदी आणि समुद्र यांत यथाक्रम पंकजें आणि इंदीवरें उद्भवतात; हंस व मराल पक्षी जलाशयांत संचार करतात; चकोर पक्षी चंद्रकिरणाचें पान करून राहतो. वर्षाकालीं हंस मानससरोवराप्रत राहण्यासाठीं जातात; स्त्रियांच्या पादाघातानें अशोक वृक्षास पालवी फुटते; बकुल वृक्षाला स्त्रीनें तोंडांतील मद्याची गुळणी त्याच्यावर टाकली म्हणजे फुलें येतात; तरुणांचे अंगावरील

करीं घेउनी वाजवी ब्रह्मवीणा, तया देखतां [1]भक्तियोगप्रवीणा, ।
पुढें धांवणें पूजनें पूर्व रीती, करी आपणा देव जैसें करीती. ॥ ३३
त्याहीं गृहीं प्रश्न नवाच केला त्या कौतुकाचाच ऋषी मुकेला ।
'आलेति केव्हां?' पुसतो मुनीला, जाणो नसे ठाउक मेघनीळा. ॥३४
त्यास उत्तर न देत मुनी तो, जाय अन्यसदना नमुनी तो; ।
[2]दाखवी खरसमा नवला, हो! दाखवी स्मरनिं मानवला हो. ॥ ३५
कोणें गृहीं स्नान करी हरी तो, नामें मनाचे मैळ जो हरीतो, ।
कोणे गृहीं अग्नि यथोक्त [4]होमी, कीं हे करीतों [5]गृहधर्म हो! मी. ॥३६

'लीलाविनोदविजय' नामक सर्ग चवथा.

(श्लोक.)

यानंतरें स्वचरितामृत [1]नारदासी दावी, तया स्मर जना [6]सुखनीरदासी; ।
वंदूनि त्या हरिचिया [7]पदसारसातें वर्णीन भागवतदिव्यकथारसातें. ॥ १

हार आणि हृदयें हीं विरहसंतापानें फुटतात; मदनाचे बाण पुष्परूप, त्याचें चाप कुसुममय आणि त्याच्या चापाची दोरी भ्रमरमाला असते; मदनाच्या बाणानें आणि स्त्रीकटाक्षानें तरुणजनांचें हृदय फुटतें; सूर्याच्या योगें पद्मांचा आणि चंद्राच्या योगें कुमुदांचा दिवसास आणि रात्रीस यथानुक्रम विकास होतो; मेघध्वनि ऐकून मयूर पक्षी नृत्य करतात, अशोक वृक्षाला फळें येत नसतात; वसंतकाळीं जाईला फुलें येत नाहींत; चंदन वृक्षाला पुष्पें फळें नसतात; तिलकाला (तिळव्याला) स्त्रियांचे सप्रेम अवलोकनानें आणि कुरवकाला (कोरांटीला) स्त्रियांच्या आलिंगनानें फळें व पुष्पें येतात; प्रियंगूला (वाघांटीला) स्त्रीस्पर्शानें, मंदार वृक्षाला त्यांच्या भाषणानें (नर्मवाक्यानें) चंपकाला (चांफ्याला) मधुर हसितानें, आंब्याला तोंडाचा फुंकर घालण्यानें (मुखवातानें), सुरंगीच्या वृक्षाला (नमेरुवृक्षाला) मधुर गायनानें, पांगाऱ्याच्या वृक्षाला (कर्णिकाराला) स्त्रियांच्या नर्तनानें यथाक्रम दोहद होऊन फळें व पुष्पें येतात; गजाच्या गंडस्थळीं आणि सापाच्या मस्तकीं यथानुक्रम मोत्यें आणि मणि असतात; चक्रवाकपक्षिमिथुनाचा सूर्योदयीं संयोग आणि सूर्यास्तीं वियोग होतो; याप्रमाणें साहित्यशास्त्रकारांनीं सत्कविप्रबंधांत कविसंकेत अथवा कविसंप्रदाय आढळतात असें वर्णन केलें आहे.

१. हें नारदाचें विशेषण. २. 'ऐश्वर्याच परि या नवला दो, देखतांच कपि मानवला हो' असा अन्य पाठ. ३. पाप. ४. हवन करी. ५. गृहधर्म=गृहस्थाश्रमाचे पंचमहायज्ञादि धर्म. हा तिसरा सर्ग अपुरा असावा असें दिसतें. याच्या अखेरीस सर्गाचें नांव नाहीं आणि कवीचाही नामनिर्देश नाहीं. कोणापाशीं ह्या अखेरच्या कविता असल्यास त्या त्यांनीं आमच्याकडे पाठवाव्या म्हणजे त्यांचा उपयोग परिशिष्टांत करूं. ६. सुखरूप मेघाला. ७. पदकमळाते.

सुना [1]माहेरासीं विविध वि[2]भवें पाठवितसे;
स्वमाहेरीं ज्या ज्या यदुविर तयां आठवितसे, ।
[4]दुळें धाडी त्यांला तदितरगृहीं [5]इंदुवदना
सुना आल्या देखे [6]ऋषिवर रमाकांतसदना. ॥ २
सदनिं पाहतसे मुनि दूसऱ्या प्रभु स्वयें स्वसुता निजसासऱ्या; ।
[7]सजळलोचन पाठवि तो हरी [8]प्रकृतिमोहक जो स्मरणें हरी. ॥ ३
मुली कोठें आल्या [9]श्वशुरसदनींहूनि सदना
[10]मुंल्हाऱ्यासांगातें कुमुदनयना इंदुवदना ।
दिलीं [11]क्षेमें त्यातें सजळजळजाक्षें [12]हरि [13]हरी
[14]अविद्यामोहातें स्मरण करितां जो हरि हरि. ॥ ४
करी लेंकराच्या महाउत्सवासीं, जगत्तात जो द्वारकादुर्गवासी, ।
मुलांचीं मुलींचीं स्वयें लोकरीती, करी कौतुकें लोक जैसे करीती. ॥ ५
उठोनि एके सदनीं प्रभातें हरी करी स्नान मुनी [15]प्रभा तें ।
देखे पुढें कौतुक काय पाहे, लीला हरीची हृदयीं जपा हे. ॥ ६
घटीं जेंवि माती जगीं वासुदेव स्वयें तोचि तें ज्ञान दे देवदेव; ।
असी चिज्जडीं [16]संधि संध्या वदावी असा तो [17]खसंध्या अनुष्ठान दावी. ॥ ७
[18]जगद्ब्रह्मसंधींत संध्या करीती न कां कर्मसंध्या तया लोकरीती? ।
स्वयें जो जगद्ब्रह्म संध्या हरी तो, करी कर्म जो कर्मबंधा हरीतो. ॥ ८
करावें कदा कर्म हें शीकवीतो, कथेची वदे रीति ऐसी कवी तो, ।
जपे त्यांपुढें वेद[19]माता हरी तो स्वबोधेंचि जो भेदमत्ता हरीतो. ॥ ९
जया देवांची हो निगम जननी गर्भपरमा
त्रिलोकीं सूर्याहीहुनि वर दिसे तेज चरमा; ।
प्रकाशीं प्रेरी हा सकळजनबुद्धीअधिप तो
स्वयें गायत्रीतें निजमय जगद्धाम जपतो. ॥ १०

---

१. माहेर हा 'मातृगृह' या शब्दाचा अपभ्रंश होय. २. वैभव बरोबर देऊन. ३. बोलावणें. ४. त्यांच्याहून अन्य गृहीं, ज्या गृहांतून सुना माहेरीं पाठविल्या त्यांशिवाय इतर गृहीं. ५. चंद्रानना अशा स्नुषा. ६. नारद. ७. डोळ्यांस पाणी आणून ८. स्वभाविक मनोहर. ९. सासऱ्याहून. (श्वशुरसदन=सासरें.) १०. बोलाविणेंकरी. ११. कुशल प्रश्न. (आलिंगनें.) १२. कृष्ण. १३. हरण करी (अविद्येस, मोहास). १४. अज्ञानरूप भ्रमातें. १५. शोभा. १६. जोडणारा. १७. आन्हिक कर्म. १८. जगत् आणि ब्रह्म यांच्या संयोगांत. १९. गायत्री.

दर्भ घालुनि मुकुंद [1]करीं तो, [2]पंचयज्ञहि बसोन करीतो, ।
[3]हां जना सुपथ माधव दावी, सज्जनीं गति असीच वदावी. ॥ ११
धेनु भूमि तिल [4]रौप्य सुवर्णें [5]अंबरें अतिविचित्र [6]सुवर्णें, ।
ब्राह्मणांसि हरि पूजुनि दानें देतसे इतर [7]पुण्यनिदानें ॥ १२
कोणके सदनीं [8]शशांकवदनी [9]पंकेरुहामोदिनी
ध्या अन्नें इतिवादिनी अनुदिनीं जे [10]ब्राह्मणाल्हादिनी ।
विप्रप्रेम मनीं [11]गजेंद्रगमनी वाढी गृहस्वामिनी,
क्लेशातें न मनीं जनार्तिशमनी अन्नें [12]दिवायामिनी. ॥ १३
[13]भोजनानुगुण विप्रदक्षिणा देउनी, नमुनियां प्रदक्षिणा ।
श्रीहरी करुनि, शेष[14] जेवितो सद्गृहस्त करि अन्य जेंवि तो. ॥ १४
कोठें विचार निगमागमशास्त्ररीती शास्त्रज्ञ आणिक बहु [15]श्रुतेही करीती, ।
धर्मार्थकाम निवडी हरि वेगळाले, निर्दोष ज्यामधिल दोष अहो! गळाले.॥ १५
वदे तया श्रीहरि तो सुजाणा कीं धर्म कृष्णार्पण धर्म जाणा, ।
मिळे स्वधर्में धन अर्थ साचा, द्यावा सुपात्रीं नकरूनि [16]सांचा. ॥ १६
जो स्वस्त्रियांसीं ऋतुहेतुकाम, तो काम सांगे प्रभु पूर्णकाम, ।
जडांत आत्मा पटतंतुरूपें सदा स्फुरे मुक्ति अशा स्वरूपें. ॥ १७
[17]स्वप्रवृत्तिच अनादि [18]पुराणी गाति जे [19]द्विनवसंख्यपुराणीं ।
त्याचिया करि हरि श्रवणातें जो पवित्र करितो [20]श्रवणातें. ॥ १८
पापें जनाचीं श्रवणें गळालीं, असीं पुराणें प्रभु वेगळालीं, ।
जगद्गुरू आयिकतो हरी तो, नामेंचि जो पापकुळें हरीतो. ॥ १९
बोलती [21]परमहंसजनादी वेद [22]पंचम जुनाट अनादी, ।
कोणिये सदनिं तो [23]इतिहास, कोणिये घरिं करी [24]अतिहास, ॥ २०

---

१. हातांत. २. देवयज्ञ, भूतयज्ञ, पितृयज्ञ, ब्रह्मयज्ञ आणि मनुष्ययज्ञ हे पांच यज्ञ. जो अग्नीत होम करणें तो **देवयज्ञ**; बळी देणें तो **भूतयज्ञ**; आणि पितरांना देणें तो **पितृयज्ञ**; हे तीन यज्ञ वैश्वदेवांत आहेत. बाकी वेदाध्ययन करणें तो **ब्रह्मयज्ञ** आणि मनुष्यांना भिक्षादिक देणें तो **मनुष्ययज्ञ** होय. अशीं पंचमहायज्ञांचीं कर्में झालीं. ३. 'हा बराच पथ माधव दावी' असा अन्य पाठ. ४. रुपें. ५. वस्त्रें. ६. चांगल्या वर्णांचीं. ७. पुण्यसंग्रहास कारण अशीं दानें. ८. चंद्रवदना. ९. कमळासारिखा सुवास जीचा अशी. १०. ब्राह्मणास आनंद देणारी. ११. गजगामिनी. १२. अहोरात्र. १३. भोजनास अनुरूप अशी. १४. अवशिष्ट अन्न. १५. ज्यानें पुष्कळ ऐकिलें आहे असे ज्ञानी पुरुष. १६. संचयाला. १७. स्वचरित. १८. जुनीं. १९. अष्टादश पुराणीं. २०. कानातें. २१. संन्यासी, योगी. २२. भारत हा पांचवा वेद. २३. भारत. २४. मोठ्यानें हंसणें.

हास्यदायकविनोदरसाचा दाखवी हरिहि आदर साचा, ।
प्रीतिपंकज जगीं उकलो कीं आयके हरिहि कौतुक लोकीं ॥ २१
भेदवादमत कौतुकरीती एक गात उपहास करीती; ।
एक वर्णिति विचित्र कळीतें हांसतां हृदय जे उकलीते ॥ २२
'मी अनीश मज ईश्वर दावा' तोचि भेद परतोनि वदावा; ।
'तूं अनीशचि न ईश्वर पाहें' हाचि गुह्य उपदेश कृपा हे. ॥ २३
जसें पावणें विष्णुसर्वोत्तमातें तसें पावणें जाण अंधंतमातें, ।
घडे भोग दोहीं स्थळीं लिंगदेहा, न देवेश दोघां पुन्हा अंग देहा ॥ २४
'वैकुंठअंधंतमलोकवासी न लिंग न स्थूळ जयीं जिवासी, ।
तेव्हां निराकारपणें असावें, कीं रूपठायीं तरि जी स्फुरावें?' ॥ २५
म्हणे गुरू, 'रूप असें जिवासीं, रूपें तया तो उभयत्रवासी,' ।
चराचराकार जगीं जसा रे! चिद्रूपही जीव तसेचि सारे. ॥ २६
वर्णाविणें रूपठसा पडेना, वर्णत्व चिद्वस्तुस सांपडेना; ।
श्रुत्यर्थ कांहींतरि वर्ण दावी, हे कल्पना त्या पुरुषें वदावी. ॥ २७
लोहितादिरजआदि गुणातें वेद वर्णिति, न जीवगणातें, ।
वर्णरूप असतें जरि साच, श्रौतें[११] शब्द असताच तसाच. ॥ २८
फळे मूढविश्वास [१२]अंधंतमांत, स्वरूपेंच वैकुंठलोकांत मात, ।
जया मुक्तितें कावळेश्वानजाती, असें बोलतां लोक हांसोनि जाती. ॥ २९
असें वेदशास्त्रांत कोठेंचि नाहीं, न वाटे अजी गोडसी कल्पना ही ।
जयां मुक्ति वैकुंठलोकीं अहो! ते मनुष्यत्व टाकूनियां श्वान होते. ॥ ३०
मुक्त होतिल तथापि कावळे, जीभ त्यांसि न जसी पिकीं वळे, ।
कीर्तनीं करिल कावकाव ते, [१५]वैखरी निजगुणीं उगावते. ॥ ३१

---

१. द्वैतमतवाद. २. एक पुरुष या मताचा स्तव करतो आणि एकजण उपहास (थट्टा) करतो. ३. कळ, कळा, युक्ति, किल्ली. ४. फाटतें. ५. असमर्थ. [मी जीव असमर्थ आहें, तेव्हां मला ईश्वर दाखवा हा पूर्वपक्ष; तूं अनीश (असमर्थ) नाहींस, ईश्वर आहेस हा उत्तर पक्ष. येथें उत्तर पक्ष हा भेददर्शक आहे.] ६. सूर्यप्रकाशहीन तमोमय लोकाांत. ७. लिंगदेह=सूक्ष्म देह. ८. वैकुंठलोक. ९. जीवाला स्थूल देह आणि लिंगदेह वैकुंठलोकांत आणि अंधंतम लोकांत नाहींत. १०. आकार. ११. श्रुतिग्रथांतील, श्रुतिप्रयुक्त. १२. 'स्वरूपें अशा विष्णु लोकोत्तमांत' असा अन्य पाठ आहे. १३. कुत्रा. १४. कोकिळेस. १५. वाणी आपल्या गुणानें उदय पावते (प्रकट होते.)

श्वानरूपहि न मुक्ति जी भली भुंकणारचि तथापि जीभली, ।
जेधवां करिल कीर्तनास ते मुक्तिची सहज कीर्ति नासते. ॥ ३२
जया देह मुक्तीमध्यें गाढवाचा, तयाची उठे जेधवां गाढ वांचा, ।
बहू फार आनंद मुक्ती जनां दे स्वयें ज्यांत तो श्रीमहाराज नांदे. ॥ ३३
हें मत श्रुतिविरुद्ध अहाहा! मोक्ष काय वदतील महा हा; ।
भेद जो विदित तोचि कळावा, यांत काय उपदेश फळावा. ॥ ३४
तुम्ही बोलतां अर्थ जे जे श्रुतीचे, मला वाटती सर्वही अश्रु तीचे, ।
दिसे बंदिशाळेंत ते वेदवाचा रडे आठऊनि प्रभू यादवांचा.' ॥ ३५
विनोद हा दाखवितां अजाला जो कां गुरूराजविनोद झाला, ।
शिष्यास तो होउनि तप्त दापी कीं 'रे! नव्हे मुक्ति तुतें कदापी.' ॥ ३६
'शिष्यत्व जो रायविनोद दावी, म्हणे असी मुक्तिहि जी वदावी, ।
ते मुक्ति त्याच्याच असो अदृष्टीं दिसो न त्याचें मुखही स्वदृष्टी. ॥ ३७
तो तन्मयस्थ जन राजविनोद सारे, ते बोलती वदसि शब्द असा कसा रे; ।
बापा! झणी धरिसि अन्यमताभिमाना, जे जीव ते धरिति याचि मताभिमाना.'॥
तो म्हणे, 'निगमसंमत जे जें पक्ष त्यास तुम्हि मानुनि जे जे, ।
बोलतां श्रुतिविरुद्धचि वाणी, वाटते मज अमंगळवाणी. ॥ ३९
बौद्धावतारीं हरी लोकलीळा करी, तई दे बळ या कळीला, ।
जे द्वापरीं धर्म सहाय होते झाले प्रधानांग कळीस हो! ते. ॥ ४०
कळी धार्तराष्ट्र स्वपापें मराया हरी आणि भीमादि जे धर्मराया, ।
सहाय स्वयें तेचि या हो! कळीला, हरी बुद्धरूपें करी लोकलीला. ॥ ४१
नव्हे बुद्धरूपें हरी सेव्य लोकीं, जसें पाप हें बौद्धलोकावलोकीं; ।
मतें या रिती दुष्टकाळांत नाना करीती अतत्वार्थवादी तनाना. ॥ ४२
जसें स्वामिनें वेद मिथ्या म्हणावे, तसे सेवकीं अर्थ मिथ्या गणावे, ।
वधी स्वामि तो मुख्य लंकापतीतें करी मारुती जाळुनी ताप तीतें. ॥ ४३

---

१. चांगली. श्वानरूपानें मुक्ति पावणें चांगलें नाहीं. २. जीभ. [जीभली—'ली'प्रत्यय अल्पत्वबोधक आहे—सूप-सुपली, दिवा-दिवली]. ३. जो प्राणी गाढवाचा देह धरून मुक्त होऊन वैकुंठलोकीं जातो. ४. वैकुंठांत जेव्हां तो ओरडतो. ५. विष्णु. ६. वेदाचे. ७. ते श्रुतीचे अर्थ नसून अश्रु (नेत्रोदक) होत. ८. दटावी, दटावून म्हणे. ९. दैवीं, नशीबांत. १०. वेदमान्य. ११. मुख्य मदतनीस. १२. 'अभिमान दीजे हरी धर्मराजा' असाही पाठ आहे. १३. वामन पंडितांच्या मताप्रमाणे बुद्धानुयायी लोकांची गणना नास्तिकांत होते, कारण ते वेदग्रंथ प्रमाण मानीत नाहीत.

प्रधानांग त्या मारुतीभीमसेना करूनी कळीची महाभीम सेना. ।
जसी मर्दिली दाविली लोकलीला करी पुष्ट तद्वैपरीत्यें कलीला. ॥ ४४
स्वयें अप्रमाणत्व आणूनि वेदीं निषेधूनियां धर्म, दैत्या निवेदी ।
करी श्रीहरी जेधवां पक्ष ज्याचा करी भीमही दास पादांबुजाचा. ॥ ४५
जईं घेतला धर्म कृष्णें कडे हो! स्वयें भीम झाला तईं त्याकडे हो! ।
कळीकारणें वेदनिंदा वदावी प्रधानांगना भीमही त्यांत दावी. ॥ ४६
द्रोणपुत्र अजि शंकर होतो, शंकरार्य कलिभीतरि होतो, ।
तो उभा निगमवृक्ष करीतो भीम मागुति मुळ्या उकरीतो. ॥ ४७
द्वापरीं कळिकडे शिव होतो या कलींत विपरीत अहो! तो ।
वेदपाळक म्हणोनि म्हणावा भीम बुद्ध परि बौद्ध गणावा. ॥ ४८
जसा बंधु होऊनि दुर्योधनाचा करी यत्न तन्मृत्युच्या साधनाचा ।
तसा वेददायाद होऊनि वेदीं विरुद्धार्थ बोलोनि भेदीं निवेदी. ॥ ४९
वधी द्वापरीं भीम दुर्योधनासी, कलीमाजि सद्धर्मसद्बोध नासी, ।
अहो! सारख्या कृष्णभीमप्रवृत्ती तईं क्षात्र, आतां करी विप्रवृत्ती. ॥ ५०
दीसतें मत बरें कळिमाजी आपल्या स्वमतलोकसमाजीं, ।
काजवे झळकती तमरातीं वेदसूर्यचि तुम्हांस अरातीं. ॥ ५१
हे प्रवृत्तिच अनादि पुराणीं वर्णिती कुमति रीति पुराणीं ।
कीं असेंच कळिमाजि घडावें तेधवां श्रुतिपथें विघडावें. ॥ ५२
म्हणुनि सत्यवतीसुत बोलतो तुम्हिहि जाणतसालचि बोल तो, ।
निगमवृक्ष फळें दशमींच या वदतसे कलिपातकसंचया. ॥ ५३
म्हणे व्यास मेघांत पर्जन्यकाळीं तमें रात्रि जे जों घनीं होय काळी, ।
जईं झांकती चंद्रशुक्रादि हो! ते प्रभा काजव्याची तईं फार होते. ॥ ५४
पापमेघपडळीं कळिकाळीं मोहरात्रि अतिदारुण काळी, ।
झांकतां निगमबोधक रीती स्वप्रकाश कुमतेंचि करीती. ॥ ५५
पाखंड खद्योतचि दुष्टकाळीं प्रकाशती दुर्मतिरात्रिकाळीं ।
वाखाणिती भेदचि लोकरीती सेवा हरीची कपटें करीती. ॥ ५६

१. फार भयंकर. २. कथी, सांगे. ३. भीमरूपी बुद्ध. ४. वेदवृक्ष. ५. उलट. ६. ज्ञाता. ७. बुद्धमतानुसारी नास्तिक. ८. वेदाचा दायाद (शत्रु). ९. आतां (कलियुगांत) विप्रवृत्तीनें नाश करतात. १०. अंधाऱ्या रात्रीं. ११. शत्रु. १२. जुनाट. १३. व्यास. १४. दशमस्कंधींच. १५. अंधकारानें. (वेदज्ञानलोपमूलक पाखंड मताच्या प्रसारानें.) १६. सेवांनीं. १७. वेदार्थसूचक. १८. काजवा.

आवडे परम शंभु जंगमा[1], चंदन प्रिय जसा भुजंगमा[2]; ।
सेव्य विष्णुहि तुम्हांत तसा हो, विष्णु निंद्य कुमतांत असा हो. ॥ ५७
बोल जो त्रिविध जीव बोलतो, निंदितो स्फुट हरीस बोल तो, ।
मुक्तिदायक तई नव्हे हरी, सर्वजीवभव जो न संहरी. ॥ ५८
जो मुक्तियोग्यचि तयासचि मोक्ष झाला, मुक्तिप्रदत्व मग काय अधोक्षजाला[3]? ।
त्या योग्यतेसहि नदे म्हणतां हरी तो, संसारबंध तरि काय हरी हरीतो[4]?॥५९
जो स्वयें धनिक त्यासिच वाणी दे कणीक इतरां करि वाणी, ।
दे कणीकहि न दे कनका हीं सेविल्या धणमणीकनकांहीं[8]. ॥ ६०
नदे अयोग्या हरि जेंवि वाणी, हे बोलताहे तुमचीच वाणी, ।
तच्छक्ति तेव्हां अतिदीनवाणी कीं मुक्ति तद्योगपणास वाणी. ॥ ६१
जो योग्य त्या शैत[illegible]ह कोणीच तया वदेना, ।
न शक्त तेव्हां असम[illegible]दितां! हो गरुडध्वजाला? ॥ ६२
अशक्त कीं निर्दय त्यास बो[illegible] मनासींच धरा अबोला, ।
जें बोलणें यावरतें असारें, एवं प[illegible] मत दुष्ट सारें. ॥ ६३
नामेंच तुष्ट हरि होउनि बोधरीती, दे मोक्षसंमत नव्हे कुमतें धरीती; ।
ध्यानेंकरूनिहि न मुक्तिपथास दावी, धिक्कार त्यास जिहिं गोष्टि असी वदावी.॥ ६४
अयोग्या नव्हे ध्यान कां हो? म्हणावें, भयें ध्यान कंसादिकाचें गणावें, ।
भयें ध्यान अत्यंत झालेंचि ज्याला, तुम्हीं मानितां मुक्ति जीवा दुज्याला. ६५
सर्वा जरी मोक्ष न देव देतो, दे योग्यतामार्ग जना वदे तो; ।
मागीतलें कल्पतरू[14] जना दे, साम्यें असा हो! सुरराज[15] नादे. ॥ ६६
[16]एवं तुम्हीं निंदितसां हरी तो कीं सर्वबंधा न हरी [17]हरी तो, ।
देऊनि अंधंतमही कृपा हा, करी असाही म्हणतांच पाहा. ॥ ६७

१. जंगमपंथाचे लोक. हे शिवोपासक म्हणजे शैव असून लिंगाची पूजा करतात. शैवांचे जे सहा प्रकार आहेत त्यांतील तिसऱ्या प्रकारच्या शैवांत यांची गणना आहे. शंकराचार्यांनी यांस वादांत जिंत करून शुद्धद्वैतमतानुसारी केलें. यांचा भाणा हृदयावर त्रिशूल आणि मस्तकीं शिवप्रतिमा बाळगणें हा होय. २. सापाला. ३. कृष्ण. पृष्ठ ५१८ टीप १० पहा. ४. सवपाला. ५. तोडतो, संहारतो. ६. वैश्य. ७. कमताई. ८. 'गणमणी चण कांहीं' असा अन्य पाठ आहे. ९. सरस्वती. १०. वर्णी. ११. समर्थ. १२. विष्णूला. १३. व्यर्थ, फोल. १४. ज्या खालीं उभे राहिलें असतां, जें जें इष्ट फल मनांत येतें तें तें जो देतो तो कल्पतरु. १५. देवांचा राजा. १६. या प्रकारें. १७. हरण करी, तोडी, संहारी.

म्हणे तयांला सुख तेंचि वाटे, तेव्हां वृथा चालति मुक्तिवाटे, ।
न मागती जन्म न दुःख पाहे, अंधंतमीं मुक्तिसमा कृपा हे. ॥ ६८
वाईट अंधंतम कां म्हणावें? कां मुक्तियोग्या बरवें गणावें? ।
वैराग्यकष्टाविण ही तमातें, जाती विरागें पुरुषोत्तमातें. ॥ ६९
सुखें तई दुःखतमांत नाहीं न गर्भवासादिक यातनाहीं, ।
संसारिकांहूनि बरें म्हणावें, कां दैत्य सर्वाधम ते गणावे? ॥ ७०
अभक्तां सुभक्तां तईं तुल्य माना, वृथा बोलतां भक्तपक्षाभिमाना, ।
असे साम्य मोक्षास अंधंतमाचें, असें सिद्ध कर्तृत्व सर्वोत्तमाचें. ॥ ७१
असी कल्पना ही प्रमाणानुसारी, दिसेना वृथा गोष्टि वाईट सारी, ।
नव्हे मानितां निर्दयत्वाभिमाना, वृथा वाहतां या स्वशास्त्राभिमाना. ॥ ७२
मतें हीं कलीचीं महापापसंगें भविष्यें पुढें तीं विनोदप्रसंगें, ।
विनोदीं जनीं वर्णितां गाढकांनीं [illegible] त्काय कानीं. ॥ ७३
वेदार्थदूषकनवश्रुतिकल्पकांची इत्यादि [illegible] मति रीति कांची, ।
कीं भेदं लौकिकचि तो निगमीं असेना, [illegible] तरि नव्या कलिदुष्टसेना. ॥ ७४
जे द्वासुपर्णा श्रुति दोन पक्षी बो[illegible]. तया मानिति भेदपक्षी, ।
परस्परें भेद तयां वदेना, तो वेद भेदात्मक भाव देना. ॥ ७५
असे द्वाविमौ श्लोक गीतेंत दोन्ही वदे भेद त्याला न ऐसें वदोनी, ।
जसे द्वासुपर्णी तसे एथ जाणा, कसा बोलवे भेद कृष्णा! सुजाणा. ॥७६
श्रुत्यर्थ ऐसाच महापुराणीं, प्रवृत्ति हे नित्य असी पुराणी, ।
कीं हे[14] उपाधीस्तव वेगळाले भेद स्वरूपीं अवघे गळाले. ॥ ७७
भेदीं प्रमाण तरि एक तुम्हां दिसेना, मोडीतसां सकळ अद्वयभेदसेना; ।
ऐसें पुसे विरळ त्या सुमहामतीतें सत्यं भिदा[16] म्हणुनि दावितसे श्रुती तें.॥७८

---

१. भासे. २. वैराग्यें, विरक्तीनें. ३. पुरुषोत्तमाचें. ४. विश्वरूपधारी. ५. वेदाच्या अर्थाला दोष लावणारी अशी नूतन श्रुति करणारे त्यांची. ६. कच्ची. ७. द्वैत. ८. वेदांत द्वैत नाहीं. ९. कलीच्या दुष्ट सेना (नूतन श्रुति). १०. दोन पक्षी. (श्रुतिकथित जीव आणि ईश्वर दोन पक्षी होत.) ११. मतभेदी, द्वैतवादी. १२. 'द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥' [गीता अध्याय १५ श्लोक १६]. याचा भावार्थ:—'या लोकीं क्षर म्हणजे नाशवंत, आणि अक्षर म्हणजे अविनाशी, हे दोन पुरुष आहेत. सर्व चराचर जें जड आहे तो क्षर आणि त्यामध्यें जें पर्वताच्या शिखरासारखें चैतन्यमय आहे, त्याला अक्षर म्हणतात.' १३. जुनी. १४. जीव व ईश्वर. १५. भेद. १६. द्वैत.

जगीं पाठ ज्या कां श्रुती वि[1]प्रसिद्धा, तया वेगळ्या या श्रुती अप्रसिद्धा, ।
कुतर्कें कुयुक्ती अशा लाख वीतां प्रमाणें तसीं कल्पिते दाखवीतां. ॥ ७९
यतीलागिंही ज्या मतीं हे[2]मैलाहो मतस्थापना वाटते हे मला हो!' ।
घडे ज्या मिषें लाभ ऐसा धनाचा, नये लोभ रे! कृत्रिमा साधनाचा.॥८०
न दे जो मतस्थाविणें बिंदु तोया, तुम्हां होतसे हो! मनीं वेद्य तो या. ।
कळीनें प्रतिष्ठा दिल्ही या मतातें, असी बुद्धिरूप स्वयें [3]कामतातें. ॥ ८१
हि[4]डिंबा वेंधू द्वापरीं भीमसेना, तिची पुत्रपौत्रादि जे [5]भीम सेना ।
तुम्हीं [6]भीमशिष्य स्वयें तेचि सारे, जळाचा जनां बिंदु देतां कसा रे!॥८२
दयाहीनता वृत्ति हे राक्षसाची, तुम्हांमाजि रे! दीसती स्पष्ट साची, ।
मतस्थाविणें जे न पाजा [7]जळाला, स्वभाव स्वयें राक्षसाचा [8]जळाला. ॥८३
बुद्धें तुम्हां मोहन कामतातें केलें न हें जाणत या मतातें, ।
द्रव्यप्रतिष्ठार्थ धरूनि सारे, विचार नेणा तुम्हि हा असा रे! ॥ ८४
कंटाळलों मी तुमच्या मतातें, देखोनि सर्वत्र [9]असंमतातें, ।
पाहेन मी माधव [10]सर्वभूतीं, अद्वैतविद्या हरिची वि[11]भूती. ॥ ८५
विनोद वेदश्रुतिदुर्मतांचे करूनि इत्यादि असंमतांचे, ।
खेळोनि हे राक्षस विप्रवृत्ती निवेदिली हो! कळिची प्रवृत्ती. ॥ ८६
वेदामधें व्याकरणानुसार भेदार्थ वाखाणिति जे असार, ।
ते वर्णिले वैष्णव बोध रीती, न [12]बांद जे वेदमतीं धरीती. ॥ ८७
असे जगीं वैष्णव नाम यांला, महात्मता जेंवि महात्मयांना, ।
गीतेसि तेही धरिती प्रमाण, नेणोनियां व्याकरणप्रमाण. ॥ ८८
महात्मा असा शब्द गीतेंत नाना, तया वाचितां ते करीती तनाना; ।
प्रमाणा जयालागिं ओव्या मराठ्या धरीती करीं काठिया ऊफराट्या. ॥ ८९
[13]अधःशाख काठी तिचें ऊर्ध्व मूळ प्रमाणास गीता जया ऊर्ध्वमूळ, ।
असा वर्णितां धर्मही [14]जंगमाचा, करी हास्य तेव्हां स्थि[15]रौजंगमाचा. ॥९०

---

१. ब्राह्मणांस पाठ अशा. २. सुवर्णाची प्राप्ति. ३. मदनाचा पिता कृष्ण त्यानें. ४. स्त्री. ५. भयंकर. ६. राक्षस. ७. उदकाला. ८. दग्ध झाला. ९. असमान्यातें. १०. सकल प्राण्यांमध्यें. ११. ऐश्वर्य. १२. 'तयास जे वेदमतीं धरीती' असाही पाठ आहे. १३. येथें भगवद्गीता अध्याय १५ श्लोक १ याचा उल्लेख कवीनें केला आहे:–'ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् । छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥' याचा भावार्थ:–प्रपंचरूप अश्वत्थवृक्षाचें मूळ जें पुराणपुरुष तें वर आहे, त्याचा विस्तार खांद्या याखालीं लोंबत आहेत, वेद हीं पानें, या अश्वत्थाला म्हणजे अशाश्वत पदार्थाला कोणी शाश्वत पदार्थ समजतात, पण याला जो वास्तविकपणें जाणतो तोच वेदवेत्ता होय. १४. जंगम लोकांचा. १५. स्थावरजंगमाचा.

अन्यही कुमत कुत्सक रीती वेष दाउनि पुढें उतरीती, ।
तो मनांत हरि हांसत राहे, दुर्मती त्यजुनि सर्व तऱ्हा हे. ॥ ९१
'लीलाविनोद' करितां [२]मुनि त्या [३]अंबाला देखे असा 'विजय' यांत [४]चतुर्थ जाला, ।
'लीलाविनोदविजयी' प्रभु नाम याचें ठेवी दरिद्र हरणार सुदामयाचें ॥. ९२

'मुक्तिप्रदविजय' नामक सर्ग पांचवा.

(श्लोक.)

मुनीलागि सोळासहस्रा [५]पदांतें हरी दाखवी सुंदरां संपदांतें, ।
वदावें किती ? व्यास हो! पार नाहीं, न तर्कास ये जें [७]सरोजासनाही.॥१
कोणी त्या [८]शयनीं विचित्रसुमनीं कृष्णप्रिया कामिनी
कामासक्त मनीं सदा निशिदिनीं मेघांत [१०]सौदामिनी, ।
कोणी [११]सेव्यमुनीपदाब्ज नमुनी, स्वामी गृहस्वामिनी
सेवीती [१२]सदनीं [१३]मृगांकवदनी प्रेमें [१४]दिवायामिनी. ॥ २
स्वजनकाम मृगादिक पारधी, करुनि ये परतोनि [१५]अपारधी, ।
सकळ यादववीर समागमीं गुणगणीं स्तविजे [१६]निगमागमीं. ॥ ३
कोठें करीतो हरि राजकारणें जो चाळितो तत्व समाजकारणें, ।
विचार माना विधि बोल तो हरी संसारबंधासही बोलतो [१७]हरी. ॥ ४
कोणास दे अभय बोलत उद्धवादी, कोणी [१८]जरासुतमुखांस विरुद्धवादी; ।
कोणावरी म्हणति धाडुनि [१९]उग्र सेना तें द्रव्य द्या म्हणति आणुनि उग्रसेना.॥५
जे भिऊनि भजती चरणातें, दे तयां अभयही शरणातें; ।
ऐसियांत [२०]मुरभौमरिपू [२१]जी! देखतां मुनिस सादर पूजी. ॥ ६
घरीं एके पाहें यदुपति सुतायोग्य नवरी,
जयाच्या पुत्रातें चतुर नवरी कोण न वरी ? ।

---

१. सहज क्रीडा. २. नारद. ३. विष्णूला. ४. 'लीलाविनोदविजय' नामक चतुर्थ सर्ग येथें समाप्त झाला. ५. झाला. ६. स्थानातें. ७. ब्रह्मदेवालाही. ८. पुष्पशय्या. ९. अनेक प्रकारचीं सुमनें (पुष्पें) ज्यावर आहेत अशा (शयनीं). १०. विद्युल्लता. ११. येथें छंदोभंग न व्हावा ह्मणून 'नी' दीर्घ केली आहे. १२. या श्लोकांत 'नी'ची आवृत्ति वारंवार झाली आहे म्हणून हा अनुप्रासालंकार होय. १३. चंद्रमुखी. १४. रात्रंदिवस. १५. अपार बुद्धि ज्याची असा. १६. निगमांत (वेदांत) आणि आगमांत (शास्त्रांत). १७. संहारी. १८. जरासंधादिकांस. १९. भयंकर. २०. मुर नामक दैत्य आणि भौमासुर यांचा वैरी. २१. अजि.

स्वयें पाहे कोठें उचित निजकन्येस नवरा
मुनी देखे ऐशा विविध गति शेषासनवरा[1]. ॥ ७

सरोवरें जीं सदनाचमाजी, जळांत त्या कृष्ण वधूसमाजीं[2], ।
क्रीडे स्त्रियांसीं पडतांचि पाणी, शिंपी तयांहीवरि चक्रपाणी. ॥ ८

एके घरीं श्रीहरि आंगणांत अश्वावरी त्या अबळागणांत, ।
जो लोटितां वेग उणे मनाचे, करी असा हो! अभिराम[3] नाचे. ॥ ९

कोठें हरी धांवडितो गजातें मनीं स्त्रियांच्या करि अंगजातें[4]; ।
सर्वत्र त्या दिव्य मनोभिरामा देखोनि त्या पावति मोद[5] रामा[6]. ॥ १०

वैळखि[7] दे न असा यदुराज तो, दुरुनि वेषहि गुप्त विराजतो[8], ।
कवण वृत्त कसेरितिचें वरी, विवरि लक्षितसे खगृहांतरीं. ॥ ११

लपोनि स्वयें सर्वसंसारसाक्षी[9] पहातो कशा वर्तती सारसाक्षी[10], ।
करी कर्म तो अन्य जैसे करीती अशा नारदा दाखवी लोकरीती. ॥ १२

प्रधान जे लौकिक कारभारी लपोनि त्यांमाजिहि कैटभारी[11], ।
पाहे बऱ्या वाइट लक्षणातें, लक्षी मुनी[12] त्या कमळेक्षणातें[13]. ॥ १३

मुनीलागिं इत्यादि जें देव दावी, नसे अंत, वार्ता किती ते वदावी?।
ऋषी भागला देखतां लोकलीला, जगीं नाशिते कीर्तनें जे कलीला[14]. ॥ १४

एके घरीं आपण आणि राम, विचारितो भक्तमनोभिराम, ।
कीं संतकल्याण अशा उपायें करूं जया उद्धरणें स्वपायें[15]. ॥ १५

हांसोनि तो नारद माधवासी बोले पहा! काय रमाधवासी, ।
म्हणे, 'तुझ्या या चरितात्रलोकीं न शक्त योगींद्र न देवलोकीं. ॥ १६

सलगि करुनि तूझी पाहतों स्वैरें[15] माया,
क्षितिवरि धरिसी जे लोकदृष्टी रमाया, ।
भयरहित कृपेनें पादसेवाप्रतापें
इतर नर जळे हें पाहतां क्षिप्र तापें. ॥ १७

अशा तुझी होउनि योगमाया कांहीं म्हणे दृष्टिस [16]यो गमाया, ।
हेरूनि[17] वत्सें मग ते न मोजी, जे[18] देखिली आणि म्हणे 'नमो जी.' ॥ १८

---

१. शेषशायी अशा श्रेष्ठाला. २. स्त्रीमंडळांत. ३. सुंदर. ४. मदनातें. ५ आनंद. ६. स्त्रिया. ७. ओळख. ८. शोभतो. ९. सर्व पाहणारा. १०. कमला(सारसा)सारिखे नेत्र (अक्ष) ज्यांचे अशा. ११. कृष्ण. १२. नारद. १३. कृष्णातें. १४. पापाला. १५. स्वच्छंदपणानें. १६. येवो, अनुभवास येवो. १७. ब्रह्मदेवानें वांसरें चोरुन नेलीं तेव्हां कृष्णानें जीं नवीन उत्पन्न केलीं–या कथेचा उल्लेख येथें आहे. १८. जे योगमाया.

पाहों म्हणे अर्जुन विश्वकाया न शक्त कोणी जिस आयकाया, ।
तो मोहिला देखुनियां बरा हो! हा दास तैसा क्षणि घाबरा हो. ॥ १९
क्षणी हे करू मोह माया विभूतीं, हरी दीसताहेस तूं जेंवि भूतीं, ।
तुझी कीर्ति सर्वत्र कानीं पडावी तुझ्या प्रीतिची ते कळा सांपडावी. ॥ २०
दे दास्य या नारदरूपदेहा, जाईल येथूनि निरोप दे हा, ।
प्रपंच पाहेल फिरोन सारा तुझा कथामार्ग फिरो न सारा. ॥ २१
तुझ्या यशें व्याप्त जगत्त्रयातें पाहून मी होउनि पात्र यातें ।
गाईन इत्यादिक लोकलीला निर्दाळिती या श्रवणें कलीला.' ॥ २२
म्हणे हरी, 'बोलसि सर्व साच, प्रभाव रायेस असे असाच; ।
पाहों तिला ज्या पुरुषें म्हणावें, तो मोहिला निश्चित हें गणावें. ॥ २३
भजावेंचि मातें तुम्हीं सर्वथा रे! स्वरूपीं तई चित्त सर्वत्र थारे, ।
पहातांचि मायेस कां सांपडावें, पाहावेंचि कीं आणि फांसां रडावें. ॥ २४
तरी नको खेद करूं उगा रे! माया न हे तूजवरी उगारे, ।
मी ईमधें मग्न असेंचि वाटे, तेव्हांचि ते बुद्धि चुके सुवाटे. ॥ २५
हे धर्म लोकां हरि शीकवीतो धरील जो बुद्धि असी कवी तो, ।
तो मोहपाशीं जन सांपडेना, हा मोह तूतें सहसा पडेना. ॥ २६
करी ते जरी मोह माया सुरां रे! तरी खिन्न होऊं नको वांसुरा! रे! ।
करीना तुतें मोह हा स्वैर माया, जिला आजि अंगीकरीतों रमाया. ॥ २७
अशा देखतां लौकिका संभ्रमातें मला सक्त मानूनि पावे श्रमातें; ।
तसा भ्रांत पुत्रा! अरे! होसिना तूं, म्हणूनीच माझा खरा होसि नातू.' ॥ २८
ये रिती [11]सरसिजासनतातें [12]नातुवासि निजपादरतातें ।
दाविल्या [13]गृहगृहीं निज [14]जाया, दे निरोपहि [15]गदाग्रज जाया. ॥ २९
सोळासहस्र सदनीं हरि एकला हो! देखूनि घे मुनि विचित्र अनेक लाहो; ।
तो ध्यान तैं करित जाय [16]पदांबुजांचें माथां धरी अधिप शंभु [18]पदांबु ज्याचें. ॥ ३०

१. विश्वरूपाला. (भगवद्गीता—अध्याय ११ पहा.) २. सगळा. ३. श्रेष्ठ, सारभूत. ४. पातकाला. ५. स्थिर होतें. ६. भासतें, वाटतें. ७. विद्वान्. ८. विद्वान् मोहपाशांत पडत नाहीं. ९. देवांला. १०. वत्सा! ११. ब्रह्मदेवाच्या पित्यानें. १२. नातू जो नारद त्याला. [नातू=नप्ता=मुलाचा किंवा मुलीचा मूल. या शब्दाचीं इतर रूपें:—नातवंड, नावंड, नातुंड, नातोंड.] १३. घरोघर. १४. स्त्रिया. १५. कृष्ण. १६. गमन कराया. १७. चरणकमळांचें. १८. पायांचें तीर्थ.

जरि मना! [1]यदुराजकथारसीं परम मानुन कौतुक धारसी, ।
जितचि मुक्तिरसास सदा पिसी, न गणितां मग मृत्युस [2]दीपिसी. ॥ ३१
निजकथारस हा बरवा मनीं कथितसे [3]कनकांबर वामनीं, ।
सकळ मोक्ष फिके मज लागती, हरिकथाच गमे मजला गती. ॥ ३२
या 'द्वारकाविजय' नाम [4]सुधारसाची ब्रह्मांड भेदुनि [5]अलौकिक धार सांची; ।
आणूनि उद्धरि जना पद [6]वामनाचा तो [7]वामनीं स्वरस नित्य नवा मनाचा. ॥ ३३
ग्रंथ हा स्वसुखरूप उपायीं अर्पितां त्रिभुवनेश्वरपायीं, ।
मुक्तिमाजिहि न [8]जें मन पावे तें अपार सुख [9]वामन पावे. ॥ ३४

---

[10]रुक्मिणीपत्रिका.

(श्लोक.)

[11]तींपत्रयां हरिति [12]श्रोत्रमनीं [13]रिघोनी, [14]त्रैलोक्यसुंदर! तुझे गुण आयकोनी, ।
रूपा तुझ्या मदनमोहन सांवळ्यातें निर्लज्ज मन्मन हरी! तुजला वरीतें. ॥ १
[15]श्रोत्यांचिया [16]श्रवणरंध्रिं रिघोनि चित्तीं [17]तूंझे गुण त्रिविध ताप हरी! हरीती; ।
ऐकोनियां भुवनसुंदर या गुणातें निर्लज्ज चित्त हरि! हें तुजला [18]वरीतें. ॥ २
विद्या वय [19]द्रविण रूप इहीं करोनी, हा [20]आत्मतुल्य पति हेंचि मनीं धरोनी, ।
जे [21]सर्वलक्षणविचक्षण सत्कुलीना [22]कोणीं नृसिंह! नवरी तुजला वरीना. ॥ ३

---

१. श्रीकृष्णकथारसांत जर स्थिर असशील तर जीवन्मुक्ति प्राप्त होईल. २. दटावशील. ३. सुवर्णावर व्यास आहे तो. (कृष्ण.) ४. अमृतरसाची. ५. खरी. ६. विष्णूचा पांचवा अवतार त्याचा. ७. वामनपंडितांत. ८. जें सुख. ९. वामनपंडित. १०. हें प्रकरण दशमस्कंधाच्या ५२ व्या अध्यायाच्या आधारें रचिलें आहे. रुक्मिणीनें 'श्रुत्वा गुणान्भुवनसुंदर' इत्यादि सप्तश्लोकी लिहून ती सुदेव नामक एका चतुर विप्राच्या हस्तें श्रीकृष्णाकडे पाठवून आपला मनोगतार्थ त्यास कळविला, आणि तो साध्य न झाला असतां आपला प्राणार्पण करण्याचा दृढ निश्चय त्यास जाणविला, असें वर्णन या काव्यांत आहे, म्हणून याला 'रुक्मिणीपत्रिका' म्हणजे 'रुक्मिणीनें श्रीकृष्णास धाडलेली पत्रिका' असें नांव दिलें आहे. मूळ संस्कृत सात श्लोकांतील प्रत्येकावर वामन पंडितांचे दोन दोन श्लोक आहेत, तेव्हां पंडितांनीं दोन प्रकारची टीका केली असें दिसतें. याच विषयाचें वर्णन पंतांनीं केलें आहे तें अवलोकनार्ह आहे. (मोरोपंतकृत—बृहद्दशम—अध्याय ५२ आर्यागीति ३४-४० पहा.) ११. त्रिविध ताप. (मागें पृष्ठ १७८ टीप ५ पहा.) १२. कानांत व मनांत. १३. शिरून. १४. हे त्रिलोकांत मनोहर अशा कृष्णा. १५. ऐकणारांच्या. १६. कर्णरंध्रांत. १७. येथें छंदःसुखार्थ 'तू' दीर्घ केला आहे. १८. 'श्रुत्वा गुणान्' इत्यादि श्लोक पहा. (दशमस्कंध अध्याय ५२.) १९. धन. २०. मजला योग्य. २१. सर्व शुभ लक्षणांनीं संपन्न. २२. 'ते कां नृसिंह' असा अन्य पाठ.

जे सर्वलक्षणविचक्षण आणि धीरा[1] तेही तुझे गुण असे जगदेकवीरा ! ।
ऐकोन कोण नवरी न वरील तूतें ? निर्लज्ज यास्तव झणी म्हणसील मातें[2]. ॥ ४
देहार्पणा करुनि तूं पति म्यां वरीला, जाया[3] करीं हरि ! तुं नेउनि शीघ्र माला[4], ।
सिंहांगनेसि[5] मज नेइल, अंबुजाक्षा[6] ! जंबूक चैद्य[7] जरि तूं करिसी उपेक्षा. ॥ ५
म्यां तूज निश्चित मनें वरिलें अनंता ! येऊनियां करिं धरूनि करीं स्वकांता; ।
सिंहांगनेसि मज जंबुक अंबुजाक्षा ! नेईल चैद्य, जरि तूं करिसी उपेक्षा[8]. ॥ ६
आराधिला जरि गदाग्रज[11] म्यां[10] अगण्यें[12] पूर्तेष्टदत्तनियमादि[13] बहूत पुण्यें, ।
येऊनियां करिं धरी मज चक्रपाणी ! चैद्यादि[14] दुष्ट हरि हे ! न धरूत पाणी[15], ॥ ७
सर्वेश्वरार्पणविधी करुनी अगण्यें केलीं जरी असति कीं बहुजन्म पुण्यें, ।
येऊनियां मज करीं धरि चक्रपाणी ! हे नातळोत[16] दमघोषसुतादि[17] [18]कोणी. ॥ ८
त्वां गुप्त उद्वहनपूर्वदिनींच[19] यावें, होऊनियां मग स्वसैन्यसमेत रहावें[20]; ।
चैद्यादिकां मथुनि पौरुषशुल्क[21] द्यावें, मातें निशाचरविधी[22] करुनीच न्यावें. ॥ ९

---

१. शहाणी. २. 'का त्वं मुकुंद' इत्यादि श्लोक पहा. ३. स्त्री. ४. मला. ५. सिंहाच्या स्त्रियेला. ६. हे कमलनेत्रा ! (कृष्णा !) ७. जंबुका(कोल्ह्या)सारखा चेदिदेशाधिपति शिशुपाल. ८. अनास्था, हयगय. ९. हातीं. १०. 'तन्मे भवान्' इत्यादि श्लोक पहा. ११. गद+अग्रज=वसुदेवपुत्र (गदनामक) वडील भाऊ=कृष्ण. १२. अगणित. १३. पूर्त+इष्ट+दत्त+नियम+आदि=लोकोपयोगार्थ धर्मशाळा बांधणें, विहिरी खणणें+यजन करणें+दान करणें+नियम पाळणें+इत्यादि (पुण्य कर्मानें). १४. शिशुपाल वगैरे राजे. १५. हात. १६. न स्पर्शोत, न शिवोत. १७. दमघोष=शिशुपालाचा पिता. १८. 'पूर्तेष्टदत्तनियम' इत्यादि श्लोक पहा. १९. लग्नाच्या पूर्वदिनींच. २०. रहावें. २१. पराक्रमरूप मोल. २२. राक्षसविधि=राक्षसविवाह. विवाहाचे आठ प्रकार आहेत:—(१) विद्या व सदाचार यांनीं युक्त असून, कन्येची याचना न करणारा अशा वराला सत्कारपूर्वक बोलावून आणि वस्त्रालंकारांनीं पूजन कन्यादान करणें हा 'ब्राह्मविवाह.' (२) ज्योतिष्टोमादि यज्ञ होत असतां, यथाविधि कर्म करणाऱ्या ऋत्विजाला अलंकारयुक्त कन्यादान करणें हा 'दैवविवाह.' (३) वरापासून धर्मार्थ म्हणजे यागादि सिद्धीसाठीं किंवा कन्येला देण्यासाठीं एक गोमिथुन (एक गाय व बैल), अथवा दोन गोमिथुनें घेऊन त्याला यथाशास्त्र कन्यादान करणें हा 'आर्षविवाह.' (४) 'तुम्ही उभयतां मिळून धर्माचरण करावें' असा कन्यादानकालीं पूर्वी नियम करवून पूजा करून कन्यादान करणें हा 'प्राजापत्यविवाह.' (५) कन्येच्या पित्रादि ज्ञातींना आणि कन्येला यथाशक्ति स्वेच्छेनें धन देऊन कन्येचा स्वीकार करणें हा 'आसुरविवाह.' (६) कन्या आणि वर यांच्या अन्योन्यानुरागानें आलिंगनादिरूप परस्पर वधूवरांचा संयोग हा 'गांधर्वविवाह.' (७) कन्यापक्षीय लोकांचा नाश करून अथवा त्यांचे शरीराला जखमा करून व प्राकारादि फोडून, रोदन करणारी आणि पित्याला व भ्रात्यांला आक्रोशपूर्वक हाका मारणारी अशी कन्या गृहांतून बलात्कारानें आणणें हा 'राक्षसविवाह.' (८) निजलेली मद्यमदविव्हळ अथवा शीलसंरक्षणविरहित अशा स्त्रियेशीं एकांतीं मैथुनधर्मी प्रवृत्त होणें हा 'पैशाचविवाह.' (मनुस्मृति—अध्याय ३ श्लोक २७-३४.)

लग्नाचिया पहिलिया दिवसांत यावें, संगीं समग्र बळ यादवसैन्य घ्यावें; ।
या चैद्य[1]मागधबळां[2]बुधितें मथावें, मातें निशाचरविधीकरुनी [3]हरावें. ॥ १०
बंधू तुझे न वधितां, [4]गृहमध्यगा तूं नेऊं कसी? असि जरी पुससील [5]मातू ; ।
आहेच पूर्वदिवसीं [6]गिरिजेसि यावें, त्वां येउनी हरि! मला हरुनीच न्यावें.॥ ११
अंतःपुरांतुनि तुझे न वधूनि बंधू न्यावें कसें? म्हणसि तूं जरि सौ[7]ख्यसिंधू! ।
यांचे कुळीं हरि! असे कुळदेवियात्रा, तेथूनि[8] तूं मजसि ने [9]शतपत्रनेत्रा! ॥ १२
रुद्रासि ज्या [10]पदरजस्नपनाचि इच्छा, तैसीच संत करितील जयाचि वांच्छा, ।
याचा प्रसाद [11]न पवें जरि जन्मिं हेची, प्राण त्यजूनि [12]शतवार वरीन तोची. ॥ १३
[13]शर्वादि सर्व तुझि इच्छिति पायधूळी, तूझा प्रसाद नव्हतां मज याच काळीं, ।
जन्मा शतांत स्मरणें मरणें मुकुंदा! अंतीं तुझ्याच वरणें [14]चरणारविंदा.' ॥ १४

उपसंहार.

(श्लोक.)

हरि[15]चरणसरोजीं रुक्मिणीची [16]शिराणी
वि[17]शद लिखितरूपें बोलिली जे [18]पुराणीं; ।
[19]मनुजतनुज जैसा भूतळीं चक्रपाणी
[20]जगदघहरि [21]भाषारूप हे व्यासवाणी. ॥ १५
अशि वि[22]दर्भमहीपतिपुत्रिका लिहि हरिप्रति संस्कृत पत्रिका, ।
लिखितें[23]भाव तिचा बरवा मनें, [24]उकलिला हृदयांतुनि वामनें. ॥ १६

---

१. शिशुपाल व जरासंध यांच्या सैन्यरूप सागरास. २. 'बळा हरुनी मथावें' आणि 'बळ हरुनी स्वभावें' असे अन्य पाठ. ३. 'श्वो भाविनि' इत्यादि श्लोक पहा. ४. अंतःपुराच्या मध्यभागीं असलेली तूं, त्या तुला. ५. गोष्ट, युक्ति. ६. अंबिकापूजनासाठीं यावयाचें आहेच. ७. सुखसागर असा तूं. ८. 'तेथें हरुनि मज ने शतपत्रनेत्रा' असाही पाठ आहे. ९. कमलाक्षा (कृष्णा). 'अंतःपुरांतरचरीम्' इत्यादि श्लोक पहा. १०. चरणधूलीच्या स्नानाची. ११. जर प्रसाद न पावेन तर. १२. शतवार जन्म घेऊन, शतवार प्राण देईन. १३. महादेवादि. १४. चरणकमळाला. [अरविंद=महोत्पल, मोठें कमळ.] १५. चरणकमळाच्या ठायीं. १६. कौतुक, आवड. १७. शुद्ध. १८. श्रीमद्भागवतादिक पुराणग्रंथांत. १९. मनुष्याचा मुलगा. २०. जगताचें पाप हरणारी. २१. भाषांतररूप, टीकारूप. २२. विदर्भ देशाचा राजा भीमक त्याची मुलगी. २३. त्या लिहिलेल्या पत्राचा अभिप्राय. २४. प्रकाशित केला.

रुक्मिणीविलास.[1]

(श्लोक.)

करुनि नमन देवा रुक्मिणीनायकातें,
निजपद[2] हरि दे जो कीर्तिच्या गायकातें, ।
स्मरत पद तयाचें त्याचिया लोकलीला[3]
कथिन, हरिति गातां वर्णितां ज्या कलीला. ॥ १

चिच्छक्तिला[5] सतत चिन्मय[6] जेंवि योग, श्रीरुक्मिणीस न कधीं हरिसीं वियोग, ।
मी यास्तव प्रियतमा परमा[7] रमा[8] ते मानी अहंकृति शिवे असि मारमाते.[9] ॥ २

कुनारीसि कीं प्रीति अज्ञा[10] नरा हे, अहंकार हा ज्यांत अज्ञान राहे, ।
न जें पाहिजे निर्गुणा आपणातें, म्हणे कृष्ण 'कां हें शिवे मीपणातें[11]?'॥३

म्हणउनि खिजवीतो[12] रुक्मिणीतें हरी तो,
परमकरुण तीच्या मीपणाला हरीतो[13]; ।
कथिन चरित तें जें वर्णिलें श्रीशुकानें,
मनिं धरुनि पहावें सज्जनीं हें सुकानें.[14] ॥ ४

बोल खोल बहु भागवताचे[15] श्रीशुका परमभागवताचे[16], ।
पापतापहर या रसमात्रा[17] त्याचिया कथिन मी[18] रसमात्रा.[19] ॥ ५

श्रीरुक्मिणीची बहु गोड वाणी[20], ग्रंथास तेथें न करीन वाणी[21]; ।
कीं कृष्ण जे शब्द अगाध[22] वाचे वदेल ते वर्णिन माधवाचे.[23] ॥ ६

हा प्रेमसंवाद सुखी सुजाणा[24] करीतसे, नामहि तेंचि जाणा. ।
आतां शुकाचार्य परीक्षितीतें सांगे कथा धन्य करी क्षितीतें[25]. ॥ ७

---

१. हें प्रकरण दशमस्कंधांतील ६० व्या अध्यायाच्या आधारें रचिलें आहे. या काव्यांत कृष्णानें रुक्मिणीशीं जो विलास केला त्याचें वर्णन आहे, म्हणून याला **'रुक्मिणीविलास'** असें नांव दिलें आहे. २. मुक्ति. ३. त्या हरीच्या लौकिकलीला वर्णीन, ज्या गातां आणि वर्णितां कलीला (पापाला) हरिति. या पद्यांत मंगलाचरणपूर्वक वर्ण्यविषयनिर्देश कवीनें केला आहे. ४. अधर्मप्रवृत्तीला. ५. ज्ञानशक्तीला. ६. ज्ञानस्वरूप जें ब्रह्म त्याशीं. ७. मोठी. ८. लक्ष्मी. ९. मदनमातेला (रुक्मिणीला) असा गर्व झाला. (मार=मदन.) १० मूढा. ११. अहंपणातें, अहंकारास. १२. फार राग येई असें बोलतो, चिडवितो. १३. नष्ट करतो. १४. हा या काव्यांतील कथेचा मंगलाचरणपूर्वक प्रस्ताव समजला पाहिजे. १५. भागवतग्रंथाचे. १६. मोठ्या भगवद्भक्ताचे. १७. पापरूप तापाला घालविणारी ही रसायन मात्रा. १८. वामनपंडित कवि. १९. केवळ रसास, सर्व रसातें. २०. भाषण. २१. कमताई. २२. खोल. २३. लक्ष्मीपतीचे. २४. ज्ञात्यास, सुज्ञास सुखी करतो. २५. पृथ्वीतें.

पलंगावरी[1] रुक्मिणीच्या सुसेजे[2] बसे कृष्ण, [3]ते त्यास सेवीतसे जे, ।
उभी सुंदरी ढाळिते[4] चामरातें[5], मनीं[6] जे शिवे मीपणापामरातें. ॥ ८

कर[7] मुद्रावलयांसह चाळितां, चवर माधवजीवरि[9] ढाळितां; ।
ध्वनि[10] उठे चरणीं[11] मृदुभूषणीं[12], हृदय लग्न जिचें यदुभूषणीं[13]. ॥ ९

हरिवरि चवरेसीं जेधवां हस्त नाचे,
दिसति सभरवस्त्रीं कंप कांहीं स्तनाचे[14]; ।
चळति कुचयुगाच्या कुंकुमें रत्नहार,
स्फुरतिच पदराही आड त्यांचे विहार[15]. ॥ १०

बरी साजते मेखळा[16] तीस माजी[17] ध्वनी ऊठती क्षुद्रघंटा[18]समाजी; ।

---

१. रुक्मिणीच्या मंचकावरील. २. सुंदर शय्येवर. ३. ते=ती रुक्मिणी. ४. फिरविते. ५. चवरीतें. ६. ती आपल्या मनांत अहंकाररुप पामराला (खळाला) स्पर्श करती झाली; मीच काय ती कृष्णाची अत्यंत आवडती स्त्री असा स्वत:विषयीं नीच गर्व तिच्या मनांत उत्पन्न झाला. "नीच जनाचा स्पर्श फक्त मनालाच झाला असतांही त्याचा परिणाम इतका वाईट होतो, मग प्रत्यक्ष शरीराला घडला असतां किती वाईट होईल? असें दाखविण्याकरितां 'मनीं' हा शब्द योजिला आहे." (विविधज्ञानविस्तार—पुस्तक ५ पृष्ठ १२२.) ७. आंगठ्या आणि कंकणासह हात हालवीत असतां, ती हात फिरवीत असतां, हातांतील कंकणें आणि मुद्रा ती हालवूं लागली असतां. ८. हीं पद्यें स्वभावोक्तीचीं उत्तम उदाहरणें आहेत. "स्वभावोक्तीवर पंडिताची फार प्रीति होती, व तिची भट्टी उतरण्याची हतोटीही त्यास चांगली साधली होती. भामाविलासांत उत्तम शृंगार आणि रुक्मिणीविलासांत तिच्या भाषणांत विषयविडंबन आणि ब्रह्मज्ञानकथन असें कां? तर याचें कारण असें वाटतें कीं, सत्यभामा ही भगवान् श्रीकृष्णास पुरुषविशेष मानून सेवन करीत होती, यामुळें विषयविलास व तत्संबंधी चेष्टा मात्र पंडितांनीं तिच्या स्वभावांत दाखविल्या आहेत. रुक्मिणीचें तसें नाहीं. ती आदिमाया, भगवान् श्रीकृष्ण ह्यास पूर्णब्रह्म सनातन मानून भजत होती, यामुळें विलासांतही तिच्या भाषणांत विषयादि तुच्छ मानिलेले दाखविले आहेत. रुक्मिणीविलासांत रुक्मिणीच्या भाषणांत विषयविडंबनादि विस्तारानें वर्णन केलें आहे, तरी आरंभास शृंगाराचा व स्वभावोक्तीचा मासला उत्तमच आहे." [हंसकृत वामनावरील निबंध—पृष्ठ ६१-६४.] ९।१०।१२।१५।२०।२३।२८।२९।३२।३३।३४।४१ हीं या प्रकरणांतील पद्यें पाहावीं म्हणजे हंस यांचें म्हणण्याचा खरेपणा कळेल. ९. लक्ष्मीपतीवर 'माधवजीवरी' यांतील 'जी' हा शब्द 'आर्य'शब्दापासून झालेला आहे. १०. अलंकारांचा मृदु ध्वनि (कोमलनाद) उठूं लागला. ११. पायांतील अलंकारांपासून मृदुध्वनि उठूं लागला. १२. 'मृदु भाषणीं' असा अन्यपाठ आहे. १३. यादवांचें भूषण म्हणजे जो श्रीकृष्ण त्याचे ठायीं. 'यदुभाषणीं' असाही पाठ आहे. १४. दोन स्तनांच्या. १५. क्रीडा. १६. कमरपटा. [मेखला=सोन्याची आठ पदरी सांखळी. (देशी हुन्नर पृष्ठ ५.) कमरेचे इतर दागिने—कांची, रसना, कलाप आणि कांचीदाम हे होत.] १७. मध्यें. १८. मेखलेस लावलेल्या बारीक घुंगरांमधून.

असी सेविते सन्निद्ध श्रीपतीतें पहातो स्मराचा स्वयें बाप तीतें. ॥ ११

चहुंकडूनिहि आनन[2] शोभलें, पदक[3] खालुनि शोभतसे भलें; ।
श्रवणिंचे नग[4] शोभति[5] दोंकडे[6], वरुनि चांचर[7] केशहि वांकुडे. ॥ १२

गळसरी[8] दुसरी ने धरी गळां[9], प्रतिभवीं[10] न पती हरिवेगळा[11]; ।
अवतरे[12] अवतीर्ण जयीं पती स्वअनुरूप[13] परस्पर दंपती[14]. ॥ १३

कसि असीस अहंमति[15] वाटते नरकजन्ममृतीसहि[16] वाट ते; ।
म्हणउनी खिजवूनि तितें हरी निपुण[17] कृष्ण[18] अहंकृतितें[19] हरी. ॥ १४

'वरावे[20] ते राजे[21] निजसम[22] तुवां राजतनये !
नये आम्हा ऐसा कंचिदपि[23] वरूं, वो ! सुविनये[24] ! ।
दिल्हे[25] बापें[26] भावें[27] त्यजुनि[28] बरवे[29] ते क्षितिपती[30],
पती केला ज्याचे कुळपति[31] समुद्रांत लपती[32]. ॥ १५

---

१. कृष्ण. २. मुख. ३. जडावाच्या किंवा सोन्याच्या ताइत्यांची व पेट्यांची सोन्याच्या तारेनें बांधलेली माळा. [प्रालंबिका, वर्णसर, सारिका, उरस्सूत्रिका, गुच्छ, गोस्तन, अर्धहार, माणवक, एकावली, नक्षत्रमालिका इत्यादि गळ्यांतील अन्य अलंकार होत.] ४. भूषणें. (दागिने.) [मुक्ता-कंटक, द्विराजिक, त्रिराजिक, स्वर्णमध्य, वज्रगर्भ, भूरिमंडळ, कुंडल, कर्णपूर, कर्णिका, शृंखल, कर्णेंदु, ललाटिका—अशीं कानांतील दागिन्यांचीं नांवें आहेत. 'देशी हुन्नर' पृष्ठ ४५-४६ पहा.] ५. 'हालति' असा अन्य पाठ आहे. ६. दोहों बाजूला. ७. चंचल. हें पद्य शुद्ध शृंगाराचें उत्तम उदाहरण होय. ८. मंगळसूत्र. विष्णूनें बांधलेल्या गळसरीशिवाय दुसरी गळसरी (मंगळसूत्र) जी गळ्यांत ठेवीत नाहीं. ९. 'न शिवे गळां' असा अन्यपाठ आहे. १०. प्रति अवतारीं, प्रत्येक जन्मीं. ११. हरीशिवाय दुसरा पति नाहीं. १२. जेव्हां जेव्हां पति (विष्णु) अवतार घेतो तेव्हां तेव्हां जी अवतार घेते. १३. योग्य. येथें नियमाप्रमाणें पाहिलें असतां 'स्वानुरूप' असें रूप असावें, पण वृत्तसुखार्थ संधिनियमाकडे दुर्लक्ष केलें आहे. १४. विष्णु आणि लक्ष्मी (कृष्ण आणि रुक्मिणी) हें दंपती (स्त्रीपुरुषांचें जोडपें) योग्य होय. [दंपती=जंपती—जम् (जाया) आणि पति (नवरा)=दंपती. हा द्वंद्वसमास द्विवचन होय.] १५. अहंकारबुद्धि, अहंपणा. १६. कारण ती अहंमति नरक, पुनर्जन्म आणि मरण यांस पोंचविणारी वाट आहे. अहंकार हें सर्व पातकाचें बीज व त्यामुळें जीवास जन्ममरणाचे फेरे प्राप्त होतात अशी समजूत आहे. १७. चतुर. १८. पापाचें हरण करणारा. (कृष्ण.) १९. गर्वातें हरण करिता झाला. २०. नवरे करावे. २१. नृपति. येथें हा शब्द मुद्दाम उपहासबुद्धीनें बहुवचनीं योजिला आहे, असें समजलें पाहिजे. २२. आपणासारखे. २३. आम्हासारखा मनुष्य तुवां कधींहीं वरूं नये (नवरा करूं नये). २४. हे सुशीलवति ! २५. बापानें आणि भावानें दिलेले (शिशुपालादिक नृप). २६. भीमकराजानें. २७. रुक्मीबंधूनें. २८. 'असुनि' असा अन्य पाठ आहे. २९. चांगले. ३०. राजे. [रुक्मीचा विचार रुक्मिणीला शिशुपाल यास देण्याचा होता, परंतु तिनें कृष्णाला गुप्त पत्र पाठवून आणविलें आणि पुढें स्वयं-

घालिती नृपति येउनि [1]धाले, [2]यानिमित्त जलधींत निघाले; ।
शत्रु ज्यास नृप दानव, [3]रीती ऐसियास नवऱ्या न वरीती. ॥ १६
त्यजियलें अजिहि [4]खनृपासना, करिल त्यांचिहि कोण [5]उपासना ? ।
प्रगट [6]गोष्टिहि हे जनिं हो ! कसी ? कळत तूं ठकलीस अहा ! कसी ? ॥ १७
ज्याचा मनांतिल अगम्यचि पंथ [7]वांटे, जे लौकिकासम न चालति लोकवाटे; ।
ऐशाचिया [8]कुळसुता बसतील पाटीं, [9]दुःखाचिया निघति दाटुनि त्या कपाटीं. १८
आम्ही [10]अकिंचनचि हे तरि गोष्टि साची, आम्हासि आवड बहू जन तो तसाची;
आम्ही स्वयें प्रियहि त्याचि अकिंचनातें, [11]आढ्यासि आमसि न [12]सेव्यकसेव्यनातें. १९
[13]ऐश्वर्यवंत [14]वय आकृति हीं समान, [15]स्वार्थार्थ होतिल परस्पर त्यांस मान; ।
[16]मैत्रीविवाह न घडे [17]अधमोत्तमातें, तूं [18]भोळलीस [19]नृपनंदिनि ! काय मातें ? ॥ २०
येथें [20]सुजाणपण [21]जोण तुझें बुडालें, कीं [22]दीर्घदृष्टिपण तें अवघें उडालें, ।
ज्याला न लेश [23]गुण तो पति काय केला ? ज्या कारणें जन [24]अकिंचन वो ! [25]भुकेला.

वराच्या रीतीनें त्याला माळ घातली–अशी कथा आहे.] ३१. जरासंधाच्या भयानें द्वारका नगरी समुद्रांत बांधून तेथें कृष्णानें आपल्या कुळांतील मुख्य वसुदेवादिक आप्तांस ठेविलें, अशी कथा आहे, तीस अनुलक्षून हें वर्णन आहे. ३२. लपून राहिलेले असतात.

१. या श्लोकाचें वृत्त 'स्वागता' आहे. २. जरासंधादिक राजे हल्ला करतात या कारणास्तव भयानें द्वारकेंत वास केला. ३. अशी रीती (चाल) आहे कीं ज्याला नृप दानव शत्रु आहेत त्याला कोणी नवरा करीत नाहीं. ४. "ययातिराजाच्या आज्ञेनें यदुवंशाला राज्याधिकार नव्हता, त्यास उद्देशून हें म्हटलें आहे." [नवनीत–पृष्ठ १०२ पहा.] ५. पूजा. ६. लोकांत ही गोष्ट प्रसिद्ध असतांही. ७. भासे. ८. कुलवती मुली अशांच्या पाटीं बसतील (त्यांच्या मागें धांव घेतील) तर त्यांस मोठें दुःख होईल. ९. 'दाटूनियां निघति दुःखमहाकपाटीं' असा अन्य पाठ आहे. १०. दरिद्री. ११. धनाढ्याशीं. १२. 'नसे अतिप्रीतिनातें' आणि 'आढ्यासि आमचि नसे अतिप्रीति मातें' असे अन्य पाठ आहेत. १३. 'ऐश्वर्य वित्त' असा अन्य पाठ आहे. १४. वयानें आणि स्वरूपानें सारखे. १५. एकमेकांच्या हिताकरितां एकमेकांकडून मान (मोठेपणा) मिळेल. १६. 'मैत्री-विना' असा अन्य पाठ. १७. नीच आणि उत्तम यांमध्यें मैत्री किंवा विवाहकार्य घडत नाहीं. १८. भोळेपणानें मला भुललीस. १९. हे राजकन्ये ! २०. शहाणपण. या तुझ्या कृत्यामध्यें तुझें चतुरपण व्यर्थ गेलें. २१. नीट लक्षांत आण. २२. दूरवरचा विचार नाहींसा झाला. 'दूर दृष्टिगत तेज अहो ! उडालें' असा अन्य पाठ आहे. २३. ऐश्वर्यादि शौर्यादि व सौजन्यादि गुण ज्यास लवमात्र नाहीं असा; (पक्षीं) जो निर्गुण, सत्वरजस्तम या तीन गुणांपासून जो अलिप्त तो, जो निर्गुण परब्रह्मस्वरूप तो. निर्गुण=मूर्ख. २४. दरिद्री, भिकारी, अल्प धनही ज्याजवळ नाहीं तो, अकिंचन; (पक्षीं) सर्व ऐश्वर्याचा त्याग करून जो विरक्त झाला तो. २५. उत्कंठित होतात.

अटन[1] करित भिक्षा भक्षणें ज्या[2] समाजीं गगन[3] वसन, वारा[4] सूत्रही त्यास माजीं, ।
अगुणपण[5] जयाचें[6] ऐसिया स्वादु[7] लागे, तुज नृपतिसुते ! तो कायसा[8] दादुला गे?
आतां[9] तरी क्षत्रिय[10] तूं भला गे ! वरीं, जयाचा तुज लोभ लागे; ।
जेणें तुला साधिति लोक दोनी[11], आम्ही वृथा काय बहू वदोनी ? ॥ २३
आम्हीं न आणूं जरि तूजला गे ! हें दाविता आनन[12] लाज लागे; ।
चैद्यादिरायां तव अग्रजाला[13] म्यां जिंकितीं[14] पौरुष उग्र जाला. ॥ २४
तरी उदासीनपणीं न कामी, न हो कधीं स्त्रीधनपुत्रकामीं, ।
पूर्ण स्वलाभे असतो उगे ही, देहीं जगींही जसि ज्योति [15]गेहीं.' ॥ २५
हें यानिमित्त वदणें गदपूर्वजाला[16] कीं 'मी प्रिया पतिस' हा तिस गर्व जाला[17]; ।
नाहीं वियोग म्हणवूनि अशी अहंता राहे उगा हरुनि ते भवभावहंता[18]. ॥ २६
झाली असें परिसतांच अनाथवाणी[19], ठावी नसे जिस कधीं असि नाथवाणी[20]; ।
त्रैलोक्य[21]नाथ पति हा प्रिय आपणातें त्यागावया तिस गमे करितो पणातें[22].॥ २७
शुक म्हणे, 'स्रवली[23] नयनांबुजीं, धुकधुकी मनिं कंप हृदंबुजीं[24]; ।
स्वपवनें[25] निजबिंबफळाधरा[26] करुनि शुष्क, [27]पदें उकरी धरा[28]. ॥ २८
कुच सुकुंकुम[29]चर्चित चांगले, नयनबिंदु पडों वरि लागले; ।
गिरियुगीं अतसीकळिका[30] जळें स्तनतटीं तसि वाहति काजळें. ॥ २९

---

१. भ्रमण. २. ज्या विरक्ताला लोकसमाजांत भ्रमण करुन भिक्षा मागून पोट भरावें लागतें, ज्यास भिक्षान्न खावें लागतें त्याला. ३. ज्याला माजीं (कमरेला गुंडाळण्याला–मध्यभागीं) आकाश हेंच वस्त्र आहे त्याला. ४. ज्याला वायु हेंच सूत्र (कडदोरा) आहे, जो नग्न दिगंबर आहे त्याला. ५. गुणराहित्य, निर्गुणत्व (मूर्खपणा–पक्षीं–सत्वादिगुणाचें राहित्य.) ६. ज्या कृष्णाचें. ७. गोड लागतें. ८. तो मी दादला (नवरा) तुला काय कामाचा ?. ९. अजून तरी. १०. जो तुला आवडेल असा चांगला पराक्रमी राजा पाहून त्याशीं लग्न कर. ११. इहलोकीं आणि परलोकीं सुख होईल. १२. मुख. १३. वडीलबंधूला, रुक्मीयाला. १४. 'मारितां' असा अन्य पाठ आहे. १५. घरांत. १६. कृष्णाला. १७. झाला. १८. संसाराचा नाशकर्ता. १९. अनाथासारखी, दीनासारखी. २०. पतीची वाणी (भाषण). २१. स्वर्ग मृत्यु पाताल या तीन्ही लोकांचा स्वामी. २२. निश्चय करतो असें वाटे. २३. नेत्रकमळांत पाणी आलें. २४. हृदयकमळ कंपित झालें. २५. आपल्या श्वासोच्छ्वासानें. २६. आपल्या तोंडल्याप्रमाणें आरक्तवर्ण अधराला (ओष्टाला). २७. पायांनीं जमीन उकरूं लागली. २८. पृथ्वी. २९. उत्तम केशराची उटी लावलेले. [स्त्रियांच्या कुचांवर पत्रावली काढण्याची चाल फार प्राचीन काळीं प्रचलित असावी असें 'प्रियाकुचतटीं जिहां न बहुवार पत्रावळी' अशासारख्या अनेक उल्लेखांवरून दिसून येतें. ३०. अतसी पुष्पाची (अळसाची) कळी जलानें (जलप्रवाहानें) पर्वतावरून जशी वाहत जाते त्याप्रमाणें दोन्ही डोळ्यांतील काजळ बाष्पप्रवाहानें उभयस्तनांवरून वाहूं लागलें.

नयनिं होउनि [1]शोकपयोधरा स्रवति लक्षुनि [2]अद्रिपयोधरा; ।
चपळ वीज गमेच मनासि कीं, मुख सकंप चळे [3]मणि नासिकीं.' ॥ ३०
[4]हसितबाष्प तिच्या मिरवे गळां, नर न ज्यास शिवे हरिवेगळा, ।
शुक म्हणे [5]असुखास न अंत रे! उपजतां [6]स्वतनुविस्मृति अंतरे. ॥ ३१
दाटूनि कंठ पडली वदनास [7]मुद्रा, शोकें भरे जग जसें भरितें [8]समुद्रा; ।
[9]घेऊनि [10]चामर [11]चुडासह [12]मुद्रिकांहीं भूई पडे, [13]उरि उरे [14]तनुमाजि कांहीं. ॥ ३२
पडे केळि जैसी [15]महाचंडवातें, असें देखतां ये कृपा [16]माधवातें; ।
उडी शीघ्र टाकी पलंगावरूनी धरी [17]उत्तरीयांबरा सावरूनी. ॥ ३३
[18]उचलिलि चहुंहस्तीं **श्री** स्वयें **श्री**धरानें,
पुसि नयनजळातें त्यांत एक्या करानें; ।
कुचयुगुलिं हरीचे गुंतले दोन्हि [19]पाणी,
सदृढ धरि [20]चतुर्थें पोटिसीं चक्रपाणी. ॥ ३४
[21]उदासीन [22]कौळत्रयीं त्या [23]सतीचें करी [24]बंधन प्रेम तें त्यास तीचें; ।
समाधान आतां [25]हृषीकेश [26]वाचे करी आयका शब्द ते केशवाचे. ॥ ३५
म्हणे हरी रुक्मिणिला, 'अहाहा! अनर्थ कां मांडियला महा हा? ।
निर्दोष आम्ही परि ठेविला गे! हा दोष आम्हांवरि जेंवि[27] लागे. ॥ ३६
मजविण न सुखाचा तूज तो हेतु कांहीं,
समजत तुझिया या पाहतों कौतुकांहीं; ।

---

१. शोकरूप मेघ. २. स्तनरूपी पर्वतावर वृष्टी करतात. ३. नासिकमणि=नथ. जेव्हां नथ हाले तेव्हां विजेसारखी चमके. ४. या श्लोकाचा अन्य पाठ आढळतो तो:—'सलिल बाष्प तिच्या मिरवे गळां, वर न ज्यास शिवे हरिवेगळा । शुक म्हणे स्वसुखास न अंतरे, तिचिच विस्मृति तीसचि अंतरे ॥.' ५. असुखास अंत नाहीं=असुख (दुःख) अपार आहे. ६. स्वदेहाचें विस्मरण. ७. बोलवेनासें झालें, तोंडास खीळ बसली. ८. ज्याप्रमाणें समुद्रास भरती येते त्याप्रमाणें ती दुःखानें व्याप्त होऊन गेली, तिला शोकाची भरती आली. ९. 'गळोनि चामरचुडा आणि कंकणाहीं' असा अन्य पाठ आहे. १०. चौरी. ११. कंकण. १२. आंगठ्या, चौरी आणि कंकणें यांसह पृथ्वीवर पडली. १३. बाकी, अवशेष. १४. तिच्या देहांत चैतन्याचा अवशेष राहिला नाहीं. १५. मोठा भयंकर वायूच्या योगानें. १६. कृष्णाला. १७. पांघरलेल्या शेल्याला नीट सांवरून तिला धरिता झाला. १८. 'उचलुनि चहुंहस्तीं श्रीकरें श्रीधरानें' असा अन्य पाठ आहे. १९. हात. २०. चवथ्या हातानें. २१. शत्रुमित्रभावापासून अलिप्त. २२. वर्तमानभूतभविष्यकाळीं. २३. पतिव्रतेचें. २४. प्रेम बंधन करी=प्रीति मोह पाडती झाली. २५. सर्व इंद्रियांना स्वामी. २६. आपल्या भाषणानें. २७. 'केंवि लागे' असा अन्य पाठ आहे.

निजवचन वि[1]नोदें बोलिलों तूजला गे!
न कळत गति [2]याची, खेद हा तूज लागे. ॥ ३७
जसें [3]नीर सेतास नेती तयाचें, तुवां योग्य अर्थानुसंधान याचें, ।
वदावें असें शब्दही बोलिलों कीं, तुझी होय विख्यात टीका त्रिलोकीं.॥ ३८
वदें मी तुझे बोल ते आयकाया, तुवां टाकिली हे मृतप्राय [4]काया, ।
वि[5]नोदार्थ तो-साच चित्तांत भारी तुवां मानिला वो!' म्हणे [6]कैटभारी.॥ ३९
तुवां या विनोदार्थ रीती खिं[7]जावें, खऱ्या गुह्य अर्थास वर्णीत जावें; ।
पहावें मुख प्रेमकोपप्रभावें तुझें तेधवां बोलिलों याच [8]भावें. ॥ ४०
नयनशर धनुष्यें भोंवयांच्या [10]प्र[11]तापें
श्रवणवरिहि येती तांबडे कोपतापें; ।
अधर थरथरीती रक्तवर्णे [12]स्वभावें,
[13]असिस तुज पहावें बोलिलों याच भावें. ॥ ४१
प्रियासीं वृथा दीसते ती उगे ही, गृहस्था जना लाभ तो हाचि [14]गेहीं; ।
विनोदें अशा जो अवो! काळ जातो, करी तो सुखी दुःखितां [15]कोंळजा तो. ॥ ४२
अलभ्य हा लाभ [16]शतक्रतूतें, तो वाटला [17]नेम अवक्र तूतें; ।
हें जाणती ज्या अतिधीट भारी [18]त्यांडे म्हणे नेणसि कैटभारी.' ॥ ४३
बोधी असा [19]सांत्वनदक्ष तीतें, म्हणे शुकाचार्य परिक्षितीतें, ।
[20]टाकी प्रिया त्या सभयास [21]देवी बोलेल तें आइकिजे सदैवीं. ॥ ४४
लक्ष्मी [22]अपांगें [23]मैन कृष्णजीचें, [24]स्वमानभंगें मन [25]उष्ण जीचें, ।
स्नेहें [26]सलज्जें नयनेंचि पाहे टाकूनि चिंता कळतां कृपा [27]हे. ॥ ४५

१. थट्टेचे भाषणानें. २. या भाषणाचा रोख न समजतां. ३. पाणी. ४. देह. ५. विनोदार्थ केलेलें भाषण तूं खरेंच मानिलेंस. ६. कैटभ दैत्याचा शत्रु. (कृष्ण.) ७. चिडावें. ८. रुसवा. ९. 'डुलें' असा अन्यपाठ आहे. १०. आशयानें, हेतूनें. ११. कोपतापें (क्रोधाच्या संतापामुळें) नयनशर (कटाक्षरूप बाण) भोंवयांच्या धनुष्यें प्रतापें (भोंवयांचें सामर्थ्य हेंच धनुष्य त्याच्या योगानें) श्रवणवरिहि (कर्णपर्यंत) येती—असा अन्वय. १२. जात्याच तांबडे असे तुझे ओंठ कांपूं लागले. १३. अशा स्थितींत तुला पहावें या हेतूनें मीं हें भाषण केलें. १४. घरांत. १५. दुःखित हृदयाला. १६. इंद्राला. १७. 'नेणत वक्र तूतें' असा अन्य पाठ आहे. १८. भित्रे. १९. समाधान करण्यांत कुशल. २०. 'टाकूनियां तेथ भयास देवी' असा अन्य पाठ आहे. २१. रुक्मिणी. २२. वक्रदृष्टीनें. २३. 'मुख' असा अन्य पाठ आहे. २४. 'सप्रेम कोपें मन उष्ण जीचें' आणि 'विलोकनीं चित्त अखंड जीचें' असे ही पाठ आहेत. २५. संतप्त. २६. लज्जायुक्त स्नेहानें. २७. या प्रमाणें कृष्णाची कृपा समजतांच काळजी सोडून कृष्णाच्या तोंडाकडे पाहूं लागली.

श्रीरुक्मिणी म्हणतसे पुरुषोत्तमातें, कीं, 'जी! न साम्य मज तूज म्हणोनि मातें।
जे बोलिलास, हरि! ते तरि गोष्टि साची, येते जडास समता कसि चिंद्रसाची?॥
सत्तानुभूति तुझि जे स्वतएव सिद्धा, मी तो गुणप्रकृति याकरितां प्रसिद्धा;।
तूं चित्समुद्र, अजि! मी लटिक्या तरंगा, हें तों नव्हे अनृत, जाणसि [12]अंतरंगा.
दिसें केंवि मी [13]त्वत्प्रकाशाविनाही? अजी वस्त्र [14]तंतूविना जेंवि नाहीं,।
स्वयें ब्रह्म तूं, मी तुझी [15]स्वैर माया, जगीं जन्मलों तैंच दोघें रमाया.॥४८
तूजही जन [16]जनाधिप सारे, सेविताति पसरूनि [17]पसारे;।
नीच केंवि म्हणवे तव देहा?' [18]हें म्हणे झणि अनंत वदे हा.॥ ४९
म्हणउनी म्हणते, 'अजि! केशवा! गणित [19]आत्मपणें जितके शवा,।
[20]अबुध इच्छुनि भाग्य नृपासना, करिति माझिच [21]काम्यउपासना.॥ ५०
[22]मृगजळा मृग धांवति [23]बापुडे, श्रमति तों जळ [24]सौंचचि सांपडे;।
तरि मनीं [25]अनृतामृतवासना, [26]फळद तूंचि, वृथा [27]मदुपासना.॥ ५१

---

१. पंधराव्या श्लोकांत जें श्रीकृष्ण बोलला त्यावर रुक्मिणी उत्तर देते. हें रुक्मिणीचें उत्तर वेदांतपर असल्यामुळें शृंगाररसप्रधान काव्यांत त्याच्याविरुद्ध शांतरसाचें मिश्रण केल्याचा आणि अप्रधान भागांचा वर्णनविस्तार केल्याचा दोष कवीच्या पदरीं येतो असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. २. तुझी माझी योग्यता सारखी नाहीं यास्तव. ३. 'दिसे न मातें' असा अन्य पाठ आहे. ४. खरी. ५. अचेतन पदार्थाला. ६. चैतन्य देणाराची, चैतन्यमय पदार्थाची. हा प्रश्नालंकार आहे. ७. अस्तित्वाचा प्रत्यय. ८. त्रिगुणात्मक माया म्हणून. ९. चैतन्यसागर, ज्ञानसमुद्र. १०. लाटा. ११. खोटें. १२. अन्तःस्थितीला, अंतर्भावाला. १३. तूं मला मूळ कारण आहेस, तुझ्याशिवाय मला गति नाहीं, तुझ्या इच्छामात्रें मी त्रिगुणात्मक माया—जग उत्पन्न करणारी प्रकृति—आहे. १४. तंतू हें वस्त्राचें उपादानकारण आहे. १५. स्वच्छंदचारिणी. १६. राजे. १७. संसाराचा विस्तार, प्रसार करून. १८. 'हें कसें झणि मुकुंद वदे हा' असा अन्य पाठ आहे. १९. या देहास जे अभिमानबुद्धीनें पाहतात, या देहाचा जे अभिमान (आत्मपण) बाळगितात. २०. अज्ञ. २१. सकाम, फलाशायुक्त. २२. "उष्णकाळीं दुपारच्यावेळीं वाळवंटावरील वायु सूर्यकिरणानें तापून तेथें पाण्याच्या विस्तीर्ण तलावाचा भास होतो, व त्यामुळें वाटसरू व हरणें फसून त्यामागून धांवतात, व जसें जसें पुढें जावें तसतसा तो तलाव दूर दूर दिसूं लागतो त्या सर्व दर्शनाला मृगजळ म्हणतात". (विविधज्ञानविस्तार—पुस्तक ५ पृष्ठ १२६.) २३. मृगजळाला पाहून बिचारीं हरणें त्या मार्गानें धांवूं लागतात. २४. त्या हरणांला खरेंच पाणी प्राप्त होतें. २५. अनृत+अमृत+वासना=खोट्या अमृताच्या कल्पना. माझ्या मनांत असतांही तूं खरें अमृत दिलेंस, यावरून माझी भक्ति व्यर्थ. २६. हें सर्व तुझ्या कृपेचें फळ होय. खरें अमृत प्राप्त झालें हा तुझा मोठेपणा होय, हें माझ्या उपासनेचें फळ नव्हे. २७. माझी उपासना.

[1]रजत [2]शुक्तिवरील तयास्तव श्रमति, [3]नेणति जे सुख [4]वास्तव, ।
असुख तें सुख मानुनि, वासना धरिति ते करिती [5]मंदुपासना. ॥ ९२
तनुस मी म्हणुनी [6]अभिमानिती, [7]विषय दुःखहि जे सुख मानिती, ।
धरुनि ते दृढ दुर्भर वासना करिति [8]यज्ञ असे [9]मंदुपासना. ॥ ९३
भजति केवळ ते तुज केशवा ! न अभिमानिति या तितके [10]शवा. ।
मृगजळासम भाग्यनृपासना गणिति ज्यांस [11]चिदर्क उपासना. ॥ ९४
तुतें सेविती [12]सुज्ञ सर्वोत्तमातें, असे अज्ञ ते मागती वित्त [13]मातें; ।
स्वयें थोर तूं [14]येरिती श्रीनिवासा ! असें मी पदीं श्लाघ्य मानूनि [15]वासा. ९५
[16]असमता मज तूज [17]असे खरी, परि असे वदली [18]तुझि [19]वैखरी, ।
[20]शरण केंवि भयें [21]वरुणालया, तदपि उत्तर घे [22]करुणालया ! ॥ ९६
लोकीं [23]नियामक गुणत्रय जेंवि राजे, रज्जूफणींत हरि त्यांत असा विराजे, ।
सर्पास दोरें[24] न दिसे अतिभ्याड साच, त्रासें म्हणे भिसि गुणाप्रति तूं तसाच.
'या राजयांसिच भितो' जरि हे स्ववाणी जी स्थापिसी तरि गमेलचि मंदवाणी ।
कीं [25]ते तुवां पळवुनी, हरिलेंचि मातें, बोलेल हें स्फुट पुढें पुरुषोत्तमातें. ॥ ९८
व्यापिलें जग पदें [26]त्रिविक्रमा ! भें तया न म्हणवे [27]उरुक्रमा, ।
हाचि अर्थ सकळां परी खरा रुक्मिणी विनवि [28]वृष्णिशेखरा. ॥ ९९

१. रुपें. २. शिंपल्यावरील. ३. न जाणति. ४. खरें, वास्तविक. ५. जे वास्तव सुख समजत नाहींत त्यांचे श्रम शुक्तीवरील रजत घेणारासारखे व्यर्थ होत, ते असुखाला सुख समजून माझी उपासना करतात. ६. देहाभिमानी पुरुष विषयजन्य असत्य सुखाला सुख समजतात. ७. रूप गंध रस स्पर्श आणि शब्द हे विषय आहेत. ['रूपं शब्दो गंधरसस्पर्शाश्च विषया अमी' इत्यमरः.] ८. 'अज्ञ' असा अन्य पाठ. ९. माझी उपासना (सेवा, पूजा). १०. निरर्थक देहाला. ११. चैतन्यसूर्याची उपासना. १२. ज्ञानी. १३. मला, मजपाशीं. १४. 'सर्वथा' असा अन्य पाठ आहे. १५. वसति, निवासस्थान. १६. लहानमोठेपणा, सारखेपणाचा अभाव. १७. 'अजी' असा अन्य पाठ आहे. १८. 'निज' असा अन्य पाठ आहे. १९. वाणी. २०. 'शरण जाय भयें वरुणालया' असा अन्य पाठ. २१. समुद्र. राजाच्या भयानें समुद्रांत लपून राहिलों असें मागें १६ व्या श्लोकांत आलें आहे त्यावर हें उत्तर आहे. २२. दयासागरा. २३. नियमन करणारे. २४. अज्ञानानें रज्जु असें मानलें, तर खरा सर्प असतांही भयंकर दिसत नाहीं. २५. तें=ते राजे. २६. वामना. (तीन पावलांनीं स्वर्ग, मृत्यु व पाताळ अशीं तीन्ही भुवनें व्यापिलीं म्हणून वामन अवतारास त्रिविक्रम असें नांव आहे.) २७. मोठें (उरु) पाऊल (क्रम) ज्याचें तो, मोठें पाऊल टाकणारा. २८. यादवश्रेष्ठा.

'भिऊनियां याचि खळा नृपाला या सागरीं कोण म्हणे लपाला ? ।
मनीं समुद्रीं वसतोसि देवा ! गुणासि[1] जाणों भिसि वासुदेवा ! ॥ ६०
बळाढ्यासवें द्वेष हाही तसाची तुझा भाव हे गोष्टिही होय साची; ।
बळी इंद्रियां दुर्भराचीच सेना, खरा द्वेष त्यांसी दिसे जें दिसेना. ॥ ६१
म्हणसि[2] टाकियलें स्वनृपासना तरि जयां तव पादउपासना, ।
नृपपद त्यजिलेंचि तिहीं असे भरत अंग गयादि किती[3] असे ? ॥ ६२
ज्याच्या[4] मनांतील अगाधरीती न लोकमार्गासि कधीं धरीती, ।
आम्ही असे हें वदलासि मातें वदेन तेंही पुरुषोत्तमातें. ॥ ६३
जे सेविती रस तुझ्या पदसारसाचा[5] त्यांचा कळे न कधिं मार्ग विचार साचा; ।
जे आत्मया प्रियतमा तुज आयत्यातें, ध्याती द्विपाद[6] पशु, जाणति काय त्यातें?
तूझा अगम्य पथ हें न अपूर्व कांहीं, कां जे अगम्य निगमाविधिपूर्वकांहीं; ।
निर्मूनि[7] पाळुनि जगा निमिषें हरीतो कर्ता नव्हे करुनि केवळ तूं हरी तो. ॥ ६५
तूझें अलौकिक कथामृत गाति, जेणें जे लौकिकास अजि हाणति लोक तेणें, ।
ऐशाचि ही तुझि न केंवि अलोकरीती आश्चर्य कोण जन येविषयीं करीती ? ॥ ६६
मी[8] निष्किंचन आणिखी प्रियहि मी निष्किंचनाचा खरा,
ते निष्किंचनही जन प्रिय मला तैशाचिया शेखरा[9]; ।
हें मातें वदलेत, अर्थ तुमच्या निष्किंचनत्वीं[10] असा
कीं त्यापासूनियां न किंचिदपि कीं जे ते तुम्ही जी ! असा. ॥ ६७
नव्हेचि ज्यापासुनि कर्म कांहीं, तया अकर्त्या अजआदिकांहीं, ।
तुम्ही प्रिय, प्रीति तुतें तयांची जगांत पूजा हुतभुक्तयांची. ॥ ६८
दारिद्र निष्किंचन शब्द दावी, तयांसि हे गोष्टि कसी वदावी ? ।
तुझ्या प्रिया तूं प्रिय ज्यांस देवा ! ते पूज्य लोकां सकळां सदेवा. ॥ ६९
बहु धनाढ्य[11] मला भजतीच ना; म्हणुनि मी प्रिय शुद्ध अकिंचना[12], ।

---

१. 'गुणासि जाणूनिच वासुदेवा' असाही पाठ आहे. २. 'त्यजियलेंच जिहीं स्वनृपासना' असें १७ व्या श्लोकांत आहे त्यावर हें उत्तर आहे. ३. भरत, अंग, गय इत्यादिक राजांनीं ईश्वरला-भास्तव स्वराज्य सोडिलें. ४. हें १० व्या श्लोकांतील भाषणावर उत्तर आहे. ५. पादकमलाचा. ६. दोन पायांचा पशु=अज्ञ मनुष्य. ७. सर्ग स्थिति लय क्षणांत करतोस. ८. हें १९ व्या श्लोकांतील भाषणावर उत्तर आहे. ९. निष्किंचनांचा शिरोमणि (शेखर). १०. निष्किंचन म्हणजे दरिद्री असा अर्थ न करितां जो अकर्ता, ज्यापासून कांहीं कर्म होत नाहीं तो असा करावा. ११. श्रीमंत. १२. निर्धनास.

जरि असें म्हणसी [1]सुखदायका धन तया किति जी! यदुनायका !? ॥ ७०
कुबेरासम द्रव्य तो बोलवेना, धनाच्या मदें मान ज्याची लवेना, ।
[2]धनाढ्यत्व तें [3]आढ्यतानामकां जी घडे त्यास होते [4]सुधा जेंवि [5]कांजी.॥७१

पदरिं न [6]धनदाच्या कोटि वा अंश कांहीं,
मद तरि न असा जो त्या कुबेरादिकांहीं, ।
[7]अमित वि[8]भव ज्याला गर्व त्याला दिसेना,
तुजचि भजतसे हो! [9]श्रीविरिंच्यादि सेना. ॥ ७२

तया तुझा प्रेमविलास देवा! जी बोलिजे आढ्य जया सदेवा, ।
दरिद्र जो तो तुजला भजेना, पाषाण सत्संगजलीं भिजेना. ॥ ७३

धन गज रथ तूझे सर्व सर्वोत्तमा! ते
न कळत ममतेनें देखतां चित्त [10]मांते, ।
तुज शरण न येतां [11]दुर्जना अंतकाला
गिळि विषय विषाचा त्या मदें भ्रांत काला. ॥ ७४

न भजुनी मज आढ्य असी खरी, तुझिच हे न घडे हरि! [12]वैखरी, ।
जरि तदंतरभाव न सांवरी अमृतअर्थ कलिप्रद [13]सां वरी. ॥ ७५

विवाह मैत्री बरवी [14]समासी, घडू नये ते अधमोत्तमासी, ।
भावार्थ या श्रीपति[15]भारतीचा दावूनि बोले [16]परिहार तीचा. ॥ ७६

तूं राजकन्या, परि [17]उग्रसेना मी सेवितों, जेंवि [18]समग्र सेना; ।
बाह्यार्थ हा व्यर्थ जळो जळाला डोळां पुन्हां आणिल तो [19]जळाला. ॥ ७७

अति श्रेष्ठता तूज सर्वोत्तमातें, उणी मी जरी सेविती उत्तमातें, ।
खरें हें तरी योग्य होतें वराया अजी! आयकावें बरें देवराया! ॥ ७८

जरि नि[20]पटदरिद्री जो न [21]लोंहेंचि कांजी
तरि अमृत मिळाल्या त्यास सोडील कां जी? ।

---

१. 'धनदायका' असा अन्य पाठ. २. 'धनांधत्व' असा अन्य पाठ. ३. गर्वा. ४. अमृत. ५. पेज. ६. ज्यापाशीं कुबेराच्या सारखें पुष्कळ धन असतें त्याला गर्व होत नाहीं, पण ज्यापाशीं कांहीं नसतें त्यालाच गर्व फार होतो. उथळ पाण्यासच भारी खळखळाट हें तात्पर्य. ७. अमर्याद, विपुल. ८. संपत्ति. ९. ब्रह्मदेवादि. १०. माजतें, उन्मत्त होतें. ११. 'दुर्भरा' असा अन्य पाठ आहे. १२. वाणी. १३. कामादिकांस, कामादिक सहा रिपूंला. १४. सारख्या जनाशीं. १५. भाषणाच्या वाणीचा. १६. निवृत्ति, समाधान. १७. यादवांच्या राजाला. १८. सगळ्या सेनेप्रमाणें मी सेवा करतों. १९. वाफाला, नेत्रोदकाला. २०. अत्यंत दरिद्री. २१. पावे.

तेंसि बहुत उणी मी, लभ्य झालासि मातें,
म्हणउनि वरिलें म्यां तूज सर्वोत्तमातें. ॥ ७९

निज तनू नर लावुनि सार्थकीं करितसे भलता पुरुषार्थ कीं, ।
सफळ पौरुष देह तुझा खरा, कवण तूजसम प्रभुशेखरा ! ॥ ८०

साधूं नयेचि तरि जी पुरुषार्थ कांहीं तूझें समत्व न सुरां न अजादिकांही, ।
जो तो करील पुरुषार्थ असी प्रसिद्धी तेव्हां मला उचित हे तव पादसिद्धी. ८१

फळ चहुं पुरुषार्थी तूं निजानंदसारा
तरि सकळ फळात्मा तूंचि कीं सर्वसारा, ।
म्हणुनि सुख समस्त त्यागुनी वासुदेवा !
उचितचि वरिलें म्यां तूज जी ! देवदेवा ! ॥ ८२

कुबुद्धि टाकूनि गृहक्रतूतें जे सेविती साधु अवक्र तूतें, ।
तूं स्वामि ते सेवक सत्क्रियांसी संबंध ऐसा उचित प्रियांसी. ॥ ८३

मिथुनसुखरतातें तूंचि आनंद साचा,
मृग मृगजळिं मानी स्वाद सत्या रसांचा, ।
पिउनि सलिल मूढ ध्यात मिथ्याच पाणी
गृहसुखनिरतातें दूरि तूं चक्रपाणी. ॥ ८४

म्हणुनि टाकुनि सर्व, यदूत्तमा ! भजति नीचपणें तुज उत्तमा ! ।
उचित अर्पियली तनु हे तुतें जरि उणी वरिलें सुखहेतुतें. ॥ ८५

आतां स्वयें न वदिजे भज निर्विकारीं कीं श्लाघ्य मानिति मला जन जे भिकारी, ।
ते तों यती त्यजिति राज्य समग्र सारें भक्षूनि भैक्ष्य चरितें तुझि गाति सारें. ॥ ८६

राज्यादिकें टाकुनि निर्विकारी, त्वदर्थ होताति असे भिकारी, ।
राज्यांत दुःखें सुख तूजमाजी, म्हणूनि तूं श्लाघ्य तया समाजीं. ॥ ८७

निष्काम काय वरिला पति निर्विकारी? कीं श्लाघ्य मानिति जया जन हो ! भिकारी, ।
तूझें सुजाणपण याकरितां बुडालें, जें दूरदृष्टिपण तें म्हणसी उडालें. ॥ ८८

---

१. 'जरि बहुत उणी मी प्राप्त झालासि मातें' असा अन्य पाठ आहे. २. कमी योग्यतेची. ३. प्रभुश्रेष्ठा. ४. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ. ५. देवांला. ६. गृहकर्मांतें. ७. सत. ८. सरळ. ९. हरिण. १०. उदकाचा वास सत्य मानतो. ११. संसारसुखासक्ताला. १२. शरीर. १३. विकाररहित. १४. स्तुत्य. १५. इंद्रियदमन करणारे आत्मसंयमी. १६. 'गृह राज्य सारें' असा अन्य पाठ आहे. १७. भिक्षेनें मिळविलेलें अन्न. १८. तुझ्यासाठीं. १९. त्या अकिंचन लोकांत. २०. श्लोक २१ वा यांत सांगितलेलें के तें.

आणीक आपण वृथा गुणहीन साचा, तो वाटला तुज कसा प्रियमानसाचा? ।
नेणोनि हे मजचि ते उचलोनि घाली माळा, न दृष्टि तिचि दूरपथीं निघाली. ॥
वदसि येरिति तूं यदुनायका! परिस तेविषयीं सुखदायका, ।
अजि! वृथा म्हणणें न करी क्रिया सहज ज्यास न इंद्रियविक्रिया. ॥ ९०
जरी तूं न होसी हृषीकादि सेना, तयां तूजवांचूनि कांहीं दिसेना; ।
वृथा ज्याविना इंद्रियांदीक सारे प्रिया आत्मया व्यर्थ होसी कसा रे? ॥ ९१
स्फुरसि आत्मपणेंचि निरंजना परम तो प्रिय तूं सकळां जना; ।
तुंज निमित्त समस्तहि आवडी, जन यदर्थ धनादिक सांवडी. ॥ ९२
विषयभोग जयाप्रति बिंबतो, तंव चिदंश जळीं प्रतिबिंबतो; ।
तुज भजेल तयीं परमा गती म्हणुनि संत तुतें गति मागती. ॥ ९३
निरसुनि भजल्याच्या सर्वथा मीपणातें,
परमकरुण ऐक्यें देसि तूं आपणातें, ।
म्हणुनि भजति तूतें टाकुनी पुत्र दारा,
कळत वरियलें म्यां तूज ऐशा उदारा. ॥ ९४
नव्हे नेणती, जी नव्हें अल्पदृष्टी, नव्हें दोन्हिही माझिया जी अदृष्टीं; ।
बहू दूरि आणीकही बुद्धि जातें, निवेदीतसें नाथपादांबुजातें. ॥ ९५
तुझ्या भोंवईपासुनी काळ झाला, तया पाहतां कांप ये काळजाला. ।
शरीरें पदें ब्रह्मपर्यंत नाना, गिळी काय पां राजयांच्या तनाना. ॥ ९६
टाकूनि सर्व तुज दीर्घतरा, विचारें म्यां येरिती वरियलें, न कुबुद्धिचारें; ।
अज्ञान आणि अविचार अदीर्घदृष्टी तूझें पद स्मरति, त्यांस नसें अदृष्टीं. ॥
वाक्यांत या भाव तुझा असाच कीं अर्थ दूजा अजि! होय साच; ।
स्थापेल अज्ञानचि तूजमाजी तें आयकावें करुनी क्षमा जी! ॥ ९८
शार्ङ्गस्वनेंचि पळवूनि नृपाधमातें सिंहें मृगांतुनि जसें हरिलेंचि मातें, ।

---

१. मनाचा. २. माळा घाली=पति वरी. ३. दृष्टि दूरवर गेली नाहीं. ४. ऐक. ५. विषयी इंद्रियादिकांची. ६. विकाररहिता. ७. मनुष्यास धनादिक वैभवाची आवड आत्म्याकरतां असते आणि तो आत्मा जर तूंच आहेस. ८. जमा करी. ९. ज्ञानांश, चैतन्यांश. १०. नाहींसे करुन. ११. भजकाच्या, भक्ताच्या. १२. स्त्री. १३. हें सर्व जाणत असतांही. १४. जी माझी दृष्टि अज्ञाण नव्हे व अल्पही नव्हे. १५. चरणकमळांतें. १६. हृदयाला. १७. संबोधनार्थक अव्यय. १८. अत्यंत मोठ्या. १९. लहान दृष्टी. २०. दैवांत. २१. शार्ङ्ग धनुष्याच्या ध्वनीनें (टणत्कारानें). २२. अधम राजाला.

तो सागरीं भिउनि त्यासि म्हणे [1]देडाला, जो हें वदेल मतिमंद म्हणों जडाला. ९९
आणीक एक मन शब्द तुझा न [2]सोसी, सक्रोध उत्तर वदेन असी [3]असोसी, ।
कीं लोकरीतिरहिता वरतील मातें त्या [4]पावतील बहुतेक बहुश्रमातें. ॥ १००
आईक, जी [5]जळधिकंकण ज्या क्षितीचें [6]एकाधिपत्य [7]निरुपद्रव दक्ष तीचें, ।
टाकूनिही श्रमति काय अजी! वनातें जाऊनि सेवुनि तुतें जगजीवनातें. १०१
आणीक एक मज जें अजि! बोललासी, चित्तास तो बहु सखोल [8]कुबोल [9]लासी;
कीं [10]क्षत्रियर्षभ वरीं अझुनी भला गे! आत्मानुरूप तुज ज्यावरि [11]लोभ लागे. १०२
तूझें कथामृत निघेल जिच्या [12]सुकानीं जें वर्णिलें अजि! [13]शुकादिपिका [14]शुकानीं,
तें तूज टाकुनि वरील न [15]नश्वरातें, [16]मी तों तुझीच वरिलें तुज ईश्वरातें. १०३
मरणशील असे जरि [17]कामिनी, तुझि कथा परिसे [18]दिनयामिनी, ।
त्यजुनि तूज अशास वरी न ते, तुझिच मी, तरि काय वरीन [19]ते? १०४
[20]अज परम अनादी, [21]श्री [22]तदंगें अनादी, अज सकळ [23]जनादी श्री तदंगें जनादी, ।
[24]निगम वदति ऐसें सर्वही त्यावरूनी तुज निज [25]अनुरूपा, धन्य झालें, वरूनी. १०५
[26]इह [27]परत्र तुवां निज कामना पुरवितां स्मृतिकुत्सित कां मना?।
उभयसौख्य तुझ्या [28]पदपंकजीं, बुडवणारचि आणिक [29]पंकीं जी! ॥ १०६
आत्मानुरूप वरिलेंचि जरी मला, गे! तूझें मज प्रिय न रूप न नाम लागे; ।
यालागिं जाय म्हणतों म्हणसी वराया रायांस यांत तरि आइक देवराया! १०७
तुज नव्हे किमपि प्रिय हें खरें, जरि असे त्यजिलें [30]सुरशेखरें, ।
चरण [31]होतें तुझे मजला गती, शरण त्यां प्रिय जे मज लागती. ॥ १०८

---

१. लपला. २. सहन करीत नाहीं. ३. इच्छा. ४. अठराव्या श्लोकांत वर्णिलेले जे तें. ५. समुद्र आहे वलय ज्या क्षितीचें (पृथ्वीचें). ६. सार्वभौमत्व. ७. निष्कंटक असें. ८. अपशब्द, दुर्भाषण. ९. भाली, जाळी. १०. क्षत्रियश्रेष्ठ. ११. प्रेम, आवड. १२. उत्तम कर्णांनीं. १३. शुकाचार्यादिक हेच कोकिल व पोपट. १४. किरांनीं. १५. नाशिवंतातें. १६. 'मी तों तुतेंच वरिलें जगदीश्वरातें' असा अन्य पाठ आहे. १७. स्त्री. १८. रात्र. १९. मी तुझीच आहें, तेव्हां ते (अन्य राजे) वरीन काय? हें प्रश्नालंकाराचें उदाहरण आहे. बोलणारा जेव्हां एखाद्या गोष्टीबद्दल वाक्यात्कारीं प्रश्न करतो, परंतु ती गोष्ट कशी आहे त्याविषयीं त्याला शंका नसून उलट पक्की खात्री असते तेव्हां हा प्रश्नालंकार होतो. या अलंकारास इंग्रजींत Erotesis असें म्हणतात. २०. जन्ममरणरहित, (ईश.) २१. लक्ष्मी. २२. त्या अजामुळें. २३. सर्वजनाचें मूळ. २४. वेद. २५. उचिता, मजयोग्य अशा. २६. इहलोकीं. २७. परलोकीं. २८. चरणकमळीं. २९. चिखलांत. ३०. ईश्वरानें. ३१. होवोत.

स्वशरणावरि तूं प्रियचि प्रिया! वचनमाळ तथापिहि अप्रिया, ।
भय करी तरि हो! मजला गती पद तुझे प्रिय जे मज लागती. ॥ १०९
भजति त्यास अनुग्रह तूं करीं करिसि जी गुण हा भय हें हरीं, ।
शरण यीं म्हणऊनि तुझ्या पदा, हरित तें भवसंकटआपदा. ॥ ११०
अनृतही भवसिंधु जसा खरा, न भजतां तुज जी! सुरशेखरा ! ।
शरण मी जरि ये न विनोद हा, करिल ये घडि शून्य दिशा दहा. १११
आतां हरी! नृपति जे मज बोलिलासी ते तीस होत पति जे अति दुष्ट दासी, ।
कानीं जिच्या तुझि कथा न पडे कदापि, दुःखी जिताच, मरतां यमलोक दापी.॥
तूझी कथा मृडविरंचिसभेस देवीं सन्मानयुक्त धरिजेति मनीं सदैवीं, ।
कानीं जिच्या पडति त्या जगदेकसारा! ओपील ते परिसतां नृपलोक सारा. ॥
स्त्रियांचे ते देवा! नृपति खर कीं बैल कुतरे,
अहा! कोणी बोले वधिति धनराज्यार्थसुत रे! ।
'नवोढांच्या लाता खरपुरुष सोसूनि रमती,
वृष स्कंधीं घेती श्वनर अवमानार्ह कुमती.' ॥ ११४

---

१. कृपा. २. खोटा असूनही. ३. लांडगी. ४. ती जिवंत असतांना दुःखी होईल व मेली असतां यम तिला जाचणी करील. ५. दावी, दडपी. ६. शंकर. ७. ब्रह्मदेव. ८. देवांनीं. ९. सर्व जगताच्या सारा! १०. सर्व राजे टाकून देईल. ११. "यथार्थदीपिका, समश्लोकी, ब्रह्मस्तुति इत्यादि अनेक ग्रंथांत अनेक स्थलीं वामनानें श्रुतिप्रमाणानें फार चांगला तत्वविचार केला आहे. त्यांतील कांहीं मासला उतरून घेण्यास स्थलावकाश नाहीं. वामनाची अद्वैतशास्त्रावर इतकी अभिरुचि होती कीं, शृंगारादि रसास उद्दीपन करण्याजोगी उत्तम सामग्री असतांही ती एकीकडे ठेवून तेथेंही यथेच्छ आत्मज्ञान कथन करण्यास त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. रुक्मिणीविलास, या प्रकरणांत शृंगाररस प्रधानत्वेंकरून असावयाचा परंतु त्यांत खालीं लिहिल्याप्रमाणें अनेक पद्यें आहेत. (११४।११७।११८।५०।५३।५४ हे सर्व श्लोक पहा.) याप्रमाणें रुक्मिणीविलासांत रुक्मिणीच्या भाषणांत सर्वत्र वामनानें आत्मज्ञान ओतलें आहे. यामुळें अर्थात् विषय विडंबन होऊन शृंगाररसाचें सरोवर कोरडें ठणठणीत दिसूं लागतें!! काव्यदृष्टीनें पाहिलें तर रुक्मिणीविलासांतील कविता पंडितांच्या नेहमीच्या कवितेप्रमाणें चांगली साधली आहे यांत कांहीं संशय नाहीं; परंतु ग्रंथसंबंधानें पाहतां विलासांत विषयविडंबन व आत्मज्ञानकथन किती विरुद्ध आहे हें सांगावयासच नको. आतां विलासांत कोणत्या गोष्टी असाव्या हें पंडितास समजत नव्हतें असें म्हणावयास जागा नाहीं कारण त्यानेंच 'भामाविलास' म्हणून एक लहानसें प्रकरण गाइलें आहे. त्यांत शृंगार फार खुबीदार व मार्मिक रीतीनें वर्णिला आहे. (६।७।८।९।१।११।१५।१७।२४।२५।३२।३३।३४।३७ हे सर्व श्लोक पहा.)" (हंसकृत वामनावरील निबंध.) १२. गर्दभ. १३. मुलगे. १४. बायकांच्या, नूतन पत्नींच्या. १५. केवळ गाढवासारखे मनुष्य. १६. कुत्र्यासारखे पुरुष.

श्री जों असे तों [1]क्षितिपाळ वर्णी, कंटाळली [2]तप्तसुवर्णवर्णी, ।
[3]ओंकारवाणा सुखभाव दावी, जे जे वदे गोष्टिहि ते वदावी. ॥ ११५
करुनि [4]अंगुलिभंग [5]रमाधवा ! म्हणत ते नृप ते अजि ! माधवा, ।
शव [6]जितेच अशाच रमापति बहुत [7]ओंगळ त्या म्हणती पती. ॥ ११६
श्मश्रु रोम नख केश कातडीं आंत मांस कफ पित्त आंतडीं, ।
मूत्र शेंबुड मळादि वाहती, त्यासि सुंदरपणेंचि पाहती. ॥ ११७
मृगजळ पुरुषाच्या [8]देहं नाना विकारी, रविकरसम [9]त्यांत श्रीपती निर्विकारी. ।
[10]कुळवधु जरि पातिव्रत्य[11]मार्गेंचि पाहे भवजलधि तरे ते सर्व तूझी कृपा हे. ११८
[12]तूझा [13]पदाब्जमकरंद कथारसाचा हुंगेल जे तिसचि हा सुविचार साचा; ।
ठायीं पडे जग भजे अजि ! त्या पतीतें मी भोगितें तुज तयाच रमापतीतें. ११९
[14]सुधा मानुनीयां पितो एक [15]कांजी, सुधापानकर्ता शिवे [16]तीस कां जी ! ? ।
तसी टाकुनी मी [17]जया मंगळाला, नृपांला तयां कां भजों [18]ओंगळांला ?' ॥ १२०
हीं उत्तरें सकळ युक्तचि जेंवि झालीं, दुःखें भडाग्निसम तीं अवघीं विझालीं, ।
तों भी उदास म्हणऊनि अगाधवाचा [19]आणी स्मृतीस मन तो मधु माधवाचा. १२१
या गोष्टिनें सर्वहि तें उडालें, [20]चिंतार्णवीं चित्त महा बुडालें; ।
तो भूमि देखे शरणागतीची ध्यानीं हरीच्या करुणागतीची. ॥ १२२
एकाविणें इतर रक्षक [21]सान वाटे ये तेधवांच शरणागति नीट वाटे; ।
ऐसी अनन्यगुरुभक्तिउपासना ही, दे कृष्ण त्यासिच घडे, इतरासि नाहीं. ॥ १२३
दाता [22]सुरद्रुम न [23]मागतियास नाहीं न [24]प्रार्थितां हरि न दे [25]स्वउपासना ही, ।
ते दीधल्यावरि जरी [26]बहु तो उदास, प्रेमेंच रक्षित असे [27]शरण स्वदास. ॥ १२४

---

१. राजे. २. तावलेल्या सोन्यासारखी लाल झाली. ३. अमंगळवाणा. ४. बोटें मोडून. ५. कृष्णास. ६. ते जिवंत असून शवसम (प्रेताप्रमाणें) होत. ७. वाईट क्रिया. ८. मनुष्याचें शरीर हें नानाप्रकारच्या विकारांना पात्र असें मृगजळ आहे (असत्य—खरें नव्हे.) ९. त्या देहमृगजळांत विकार न पावणारा असा श्रीपति सूर्यकिरणासारखा (सत्य—मूळकारण) आहे. १०. कोणतीही कुलस्त्री पतिव्रताधर्मानेंच वागली तर ती भवसागरांतून पार होते, ही तुझी दया आहे (हें तुझ्या दयेचें फळ आहे). ११. 'धर्मेंचि' असा अन्य पाठ. १२. 'तुझ्या पदाब्जमकरंद कथार्थ सारा हुंगेल जे तिसिच तत्त्वविचार सारा' असा अन्य पाठ आहे. १३. चरणकमळरसाचा. १४. अमृत. १५. पेज. १६. त्या पेजेला. १७. 'जगन्मंगळाला' असा अन्य पाठ आहे. १८. अमंगळाला. १९. 'आणी स्मृतीस गुण तो मधु माधवाचा' असा अन्य पाठ आहे. २०. चिंतारूप सागरांत. २१. लहान. २२. कल्पतरु. २३. याचकास. २४. मागितल्यावांचून देत नाहीं. २५. कृष्ण आपली भक्ति उपासना देत नाहीं. २६. 'मग' असा अन्य पाठ. २७. 'हरि तो स्वदास' असा अन्य पाठ.

जे आवडी त्यजुनियां पदसंपदांची प्रीतीच मागति सदा हरिच्या पदांची; ।
ते त्यांस दे सुरतरू मग ते स्वदास, स्वामी न सोडिच कदापि जऱ्ही उदास. १२५

हा उदास परि याचि उपार्थी लभ्य यास्तव शिर[1] प्रियपायीं, ।
ठेवुनी म्हणतसे मृदुवाणी प्रीति दे न करितां अजि! वाणी[2]. ॥ १२६

दे प्रेम याच तुझिया चरणांबुजाचें[3], माथां सदाशिव[4] धरी शिवें अंबु[5] ज्याचें, ।
कीं तूं उदास सहवास तुझा कराया आणीक यत्न न दिसे जगदेकराया! ॥ १२७

कांता[6] जनास सकळांहुनि थोर वाटे, तूं तो न चालसि असे रिति चोरवाटे[7], ।
यालागिं आवडि पदीं स्वसुरद्रुमातें जी मागणें इतर यत्न दिसे न मातें. ॥ १२८

मातें गुणप्रकृतितें जगदेकराया! तूं पाहतोसि जनबुद्धिस जैं कराया, ।
लोहा जडा चलन चुंबकसंनिधानें[8] आतां तसेंचि करणें करुणानिधानें[9].' ॥ १२९

प्रत्युत्तरें हरिस संमत[10] हें वदोनि, दे उत्तरें कथितसे निजभाव दोनी; ।
न स्वानुरूप वरिला नृप कां भला गे! आतां तरी, वरिं जयावरि लोभ लागे. १३०

अशाहि स्त्रिया देखती वर्तमानीं, म्हणोनी तुझी गोष्टि मी साच[11] मानी; ।
मनीं एक एकीस जें गोड वाटे, तिला अन्य नेऊनि ने अन्य वाटे. ॥ १३१

देखोनि अंबा[12] जशि शाल्वराया झाली मनीं सिद्ध तया वराया, ।
भावानिमित्तें[13] हरि भीष्म तीतें, आणीक दोघी बहिणीसतीतें[14]. ॥ १३२

शाल्वास देखोनि मनोभवार्ता[15], भीष्में असी आइकतांचि वार्ता, ।
ते[16] त्यागिली सांप्रत वर्तमानीं[17], स्त्रिया अशाही मनि साच मानी[18]. ॥ १३३

होऊनिही अजि! विवाह नवा मनातें[19], स्त्री पुंश्चळी[20] सरस देखुनि मानवातें, ।
चिंती मनीं कुनर[21] संग करी, तियेतें त्यागी भला पतन जीस्तव यास येतें. ॥ १३४

स्त्रिया दुष्टकर्में असींही करीती, म्हणोनि प्रसंगें असी लोकरीती; ।
हरी! बोलसी जाणसी पूर्ण मातें वदों कायसी साक्षि सर्वोत्तमातें? ॥ १३५

---

१. मस्तक. २. कमताई. ३. पादकमळाचें. ४. कल्याणकारक. ५. उदक, पादोदक, तीर्थ. ६. स्त्री. ७. ज्या वाटेनें कांता थोर वाटते त्या चोरवाटेनें. ८. लोहचुंबकाचे योगानें जड लोहास चलन येतें. ९. दयासागरानें, करुणानिधीनें. १०. मान्य, अभिमत. ११. सत्य, खरी. १२. अंबा—ही काशीराजाची ज्येष्ठ कन्या. हिच्या दुसऱ्या दोघी बहिणी अंबिका आणि अंबालिका. यांना भीष्मानें जिंकून आपल्या सावत्र भावासाठीं (विचित्रवीर्यासाठीं) आणिलें. अंबेचें प्रेम शाल्वराजावर जडलें होतें व तिनें मनानें शाल्वराजास वरिलें होतें म्हणून तिला भीष्मानें सोडून दिलें—अशी कथा आहे. (पृष्ठ १६४ टीप १६ पहा.) १३. बंधूसाठीं. (विचित्रवीर्यासाठीं.) १४. अंबिका आणि अंबालिका. १५. मदनानें पीडित. १६. अंबा. १७. हाल्लीं सुद्धां. १८. जाण, समज. १९. नूतन मानवाची इच्छा करते. २०. जारिणी स्त्री. २१. दुष्ट चालीचा पुरुष.

धरुनियां [1]श्रीपतिपादपद्मा हे बोलिली बोल [2]सखोल [3]पद्मा; ।
यालागुनी तीस वदे हरी तो, जो दुःख तीचें अवघें हरीतो. ॥ १३६

'भलि भलि अमृताचे घोट हे आयकाया,
बहुत बहुत होती हे तृषायुक्त [4]काया; ।
म्हणवुनि रचिला हो [5]क्षोभ या मानसांचा,
परि वदसि मुखें हा भाव माझाचि सांचा. ॥ १३७

प्रसन्न मी नित्यचि तूजला, गे! [6]वे तो जरी जो वर तूज लागे; ।
परंतु तूतें दिधली स्वकाया [7]जे देतसे सर्व वरादिकां या. ॥ १३८

जें भाग्य वांछित विरिंचिशतक्रतूतें तें मागती सकळही [8]विधि [9]शक्र तूतें, ।
एकांतभक्ति हृदयावरि वास तीतें मोक्षादि सर्व सुख सिद्ध सदा [10]संतीतें. ॥ १३९

सदा [11]चित्समुद्रैक्यविद्यानदी जे? नवें काय आतां तिला ज्ञान दीजे? ।
स्वतां त्यास जो [12]मीपणा क्षिप्र संगें चढे तो तुवां नासिला याप्रसंगें. १४०

अहंपणा त्यागुनि तीव्रतत्वा झोंबे पुन्हा प्रेम पतीव्रतत्वा, ।
[13]साध्वी अशा दाखविलें [14]मतीतें देखोन मी [15]मानवलोंच तीतें. ॥ १४१

वाईट ऐसें तुज बोलिलों कीं तें आइके जे [16]ललना [17]नृलोकीं, ।
मानीच ते निश्चय दुष्ट [18]मतें न तूं तसें [19]भाविसि उत्तमातें. ॥ १४२

न अधमासम वो! मज मानिलें, जरि बहू तुज म्यां अपमानिलें, ।
म्हणुनि नासुनि नूतन मीपणा, स्थितिहि पूर्विल साधिलि आपणा. ॥ १४३

[20]किमंपिही नलगे मज वेगळें, म्हणुनि साधिसि सर्वहि मंगळें; ।
मज भजोनिहि ज्यास मनीं असे विषयभोगचि आइक ते असे. ॥ १४४

---

१. कृष्णपादकमळा. २. गूढ. ३. लक्ष्मी किंवा रुक्मिणी. ४. माझ्या देहाला ही अमृतवाणी ऐकण्याची उत्कट इच्छा होती. ५. तुझ्या मनाला मुद्दाम (याच कारणास्तव) राग आणविला. ६. 'वो' असा अन्य पाठ आहे. ७. जे (जी काया) सर्ववरदाच आहे. ८. ब्रह्मदेव. ९. इंद्र. १०. रुक्मिणीस. ११. ज्ञानसागराशीं ऐक्य पावणारी विद्यानदी. १२. अहंभाव. १३. साध्वीचें लक्षण मनुस्मृतींत आहे तें असें:—'पतिं या नाभिचरति मनोवाक्कायसंयता । सा भर्तुलोकमाप्नोति सद्भिः **साध्वी**ति चोच्यते ॥' (अध्याय ९ श्लोक २९). याचा भावार्थ असा:—मन, वाणी, देह यांनींकरून संयत, आणि आपल्या पतीचा त्याग करून परपुरुषाचा संयोग जी स्त्री करीत नाहीं ती नवऱ्यासह स्वर्गलोकास जाते व इहलोकीं तिला शिष्ट लोक **साध्वी** असें म्हणतात. १४. भावातें. १५. संतुष्ट झालों. १६. जी स्त्री तें (वाईट बोलणें) ऐकेल. १७. मृत्युलोकीं. १८. मला. १९. मानिसी. २०. तुजशिवाय कांहींही नको म्हणून.

ज्या संपदा करिति बंधन [1]दंपतीतें त्या मागती मजहि [2]मुक्तिचिया पतीतें; ।
सब्रह्मचर्य तप [3]वेचिति जे सकामीं ऐशांस हो सुलभ होइन त्यांस का मी? १४५
भोग सर्व घडती पशुदेहीं, त्या [4]तनू नरक शास्त्र वदेही; ।
[5]मुक्तिच्या पतिस त्या विषयातें मागती न समजे विष यातें. ॥ १४६
सेवून याही पुरुषोत्तमातें [6]अभाग्य जे मागति भोग मातें, ।
परंतु हा शब्द न तूज लागे, कीं एक मीच प्रिय तूजला गे! ॥ १४७
घरधणिनि! तुवां हे थोर भाग्येंचि [7]वृत्ती
धरियलि चरणीं या जे निवृत्ति प्रवृत्ती; ।
खळ जन न कधींही या सुबुद्धीस [8]लाहे,
कपटचि मिरवी [9]स्त्री गोष्टि कैंची तिला हे? ॥ १४८
म्हणुनि तूजसमानचि कामिनी जरि तयांत वसे [10]दिनयामिनी, ।
तरिच त्यास तुझा महिमा नसे, [11]परिस आणिक [12]निर्मळमानसे! ॥ १४९
जे पावले स्वनगरा नृपती विवाहीं ते मानले मग [13]मृगांबुनदीप्रवाहीं, ।
माझ्या कथा परिसतां मज देवराया! केला तुवां परम यत्न [14]अंबो! वराया. ॥ १५०
[15]लिखित देउनियां द्विजसत्तमा निज रहस्य मला पुरुषोत्तमा ।
लिहुनि धाडियलें असि दूसरी कवण ईसि घडेल तुझी [16]सरी? ॥ १५१
हें ही असो, [17]झगडियांत तुझ्या स्वभावा म्यां जिंकिलें [18]भगिनिवत्सल सुस्वभावा, ।
केलें [19]विरूप परि [20]लेशें तुवां न मातें वाईट वो! गणियलें पुरुषोत्तमातें. ॥ १५२
हेंही असो, न वरणें वर आपणातें कोणी दुजा म्हणुनियां करुनी पणातें, ।
केला विलंब जरि म्यां तरि नेम काये, पत्रांत या लिहियला [21]स्मर[22]हेमकाये! १५३
[23]ज्याच्या पदांबुजरजें शिव [24]मज्जनातें इच्छीतसे प्रिय समस्तहि [25]सज्जनातें, ।
तो तूं प्रसाद न तुझा जरि आज लाहें जन्में शतांत मरणें करणें मला हें. ॥ १५४

---

१. स्त्रीपुरुषांतें. २. मुक्तीचा स्वामी झालें. ३. साभिलाष सेवा करणारे, फलेच्छापूर्वक सेवा करणारे. ४. ज्या तनूंत भोग घडतात त्या तनू नरकरूप होत असें शास्त्र प्रतिपादी. ५. मुक्तिप्रद मजला. ६. भोग मागणारे लोक हतभाग्य होत. ७. वर्तन, वागणूक, वर्तणूक. ८. पावे. ९. स्त्री. १०. रात्रंदिवस. ११. ऐक. १२. स्वच्छ आहे मानस (चित्त) जिचें ती (संबोधन.) १३. मृगांबु=मृगजळ. १४. 'पहा' असाही पाठ आहे. १५. पत्रिका. १६. बरोबरी, समता. १७. युद्धांत. १८. बहिणीवर प्रीति करणारा. १९. पाट काढून विरूप केलें, एक मिशी व दाढी काढून विरूप केलें. २०. अल्प देखील, थोडें. २१. सुवर्णदेहे! जिचा देह सुवर्णाप्रमाणें असे स्त्रिये!. २२. 'यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनं' इत्यादि श्लोकांत लिहिलेलें. २३. स्नानातें. २४. भक्तांतें. २५. शंभर जन्म घेऊन तुझी प्राप्ति होईपर्यंत प्राण देईन.

गोष्टीस या प्रत्युपकार कांहीं दिसे न आम्हां जगकारकां[1] ही, ।
उत्तीर्ण[2] देऊनिहि आपणातें नव्हें तुझ्या शुद्ध भलेपणातें. ॥ १९५
हा भाव माझा सकळां कळाया बोलोनियां दावितसें कळा या, ।
धरी[3] तुवां प्रत्युपकार कांहीं आम्हां दिसेना जगकारकां ही.' ॥ १९६
नृपासि[4] बोले शुकविप्र संगें कीं बोल ऐसे सुरतप्रसंगें, ।
अनंगलीलेंतहि[5] माधवाचे सुशब्द ऐसेच अगाध वाचे. ॥ १९७
आणूनि कोपोपशमा[6] रमा ते दावी रतिप्रेमहि मारमाते[7], ।
स्वयें निजानंदहि लोकरीती कर्मे करी जेंवि गृही[8] करीती. ॥ १९८
स्वरत नित्यविरक्तहि[9] तो रमेसह[10] असा जगदीश्वर तो रमे; ।
करि विलास घरोघरिंही हरी, चरित तें स्मरतां अशुभें हरी[11]. ॥ १९९

उपसंहार.

(श्लोक.)

धरिति सुहृदयीं हा प्रेमसंवाद साधू,
म्हणउनि अभिधान[12] ग्रंथही हेंचि साधू, ।
गुणलव कथिले हे वामनें केशवाचे,
धरुनि चरण चित्तीं श्रीहृषीकेशवाचे. ॥ २००

मुकुंदविलास[13].

(जरासंधवध.)

(श्लोक.)

स्वयें[14] ईशें[15] सर्वज्ञही[16] उद्धवातें पुसे नीति, वंदूनि त्या माधवातें, ।
तयाच्या वंदों[17] त्याच दिव्या कथार्थी शुकव्यासउक्ती वंदोनी यथार्थी[18]. ॥ १

---

१. जग उत्पन्न करणारांस. २. उतराई. ३. 'परंतु बा प्रत्युपकार कांहीं' असा अन्य पाठ. ४. परीक्षित् राजाला. ५. 'अनंगलीले परि माधवाचे' असा अन्य पाठ. ६. कोपाचा उपशम (शांति). ७. मदनाचे आईस, रुक्मिणीस. ८. गृहस्थ. ९. विरक्त असून ही. १०. रमेसह=रुक्मिणीबरोबर. ११. हरण करी. १२. नांव. १३. हें प्रकरण दशमस्कंध—अध्याय ७०-७३ यांच्या आधारें रचिलें आहे. यांत मागधदेशाधिपति जरासंध याच्या वधाचें वर्णन आहे म्हणून याला 'जरासंधवध' असें नांव आहे आणि तो वध मुकुंदानें युक्ति योजून भीमाच्या हस्तें करविला म्हणून यास 'मुकुंद-विलास' म्हणजे मुकुंदाची सहज लीला असेंही दुसरें नांव आहे. जरासंधानें अनेक राजे कारा-गृहांत टाकले होते. 'आम्हांस मुक्त करा' असा त्यांचा निरोप घेऊन एक त्यांचा दूत कृष्णाकडे

सुधर्मा सभा मोंवतें वृष्णिचक्र, हरी मध्यभागीं, करीं शंख चक्र, ।
घनश्याम हेमांबरीं भासमान नये कोटिकंदर्पशोभा समान. ॥ २
पुढें नाचती संघ नृत्यांगनांचे जयाचें यथाभाग सर्वांग नाचे, ।
सभे बैसले ते समीप द्विजाती यशें धार्मिकांचीं निरोपीत जाती. ॥ ३

सकवच तनु सारें मस्तकीं टोप भारी
यदुमधुवर ऐसे त्यामधें कैटभारी, ।
करि सशर धनुष्यें पाठिसीं पूर्ण भाते,
हरि मनिं नयनींही येरितीची सभा ते. ॥ ४

तों दूत ये एक विदेशवासी सोष्टांग वंदी प्रभु केशवासी, ।
प्रणाम त्यानंतर राजयांचा करी, पुढें काळ बरा जयांचा. ॥ ५

आला होता. तेव्हां धर्माकडून राजसूय यज्ञास बोलविण्यास्तव नारदमुनिही कृष्णाकडे आले होते. जरासंधाचा वध कसा करावा ह्याविषयीं ऊहापोह होतां होतां, सर्वांस उद्धवाचा विचार मान्य झाला. जरासंधाशीं बाहुयुद्ध करणारा कोणी नाहीं तेव्हां त्यास फसवून विप्रवेषानें युद्धभिक्षा मागून भीमाच्या हस्तें त्याच्या शरीराचे जे दोन सांधे जरेनें जोडलेले आहेत ते द्वंद्वयुद्धांत वेगळे करावे असें ठरलें. त्याप्रमाणें श्रीकृष्ण ससैन्य धर्माकडे इंद्रप्रस्थास गेला. तेथून भीम व अर्जुन यांस घेऊन जरासंधाच्या नगरीस गेला. तेथें द्वंद्वयुद्धांत भीमानें जरासंधाचीं दोन शकलें केलीं. तो तात्काळ मृत्यु पावला. त्याच्या गादीवर त्याच्या पुत्रास (सहदेवास) स्थापित केलें व सर्व राजांस बंदींतून सोडविलें. या प्रमाणें जरासंधाचा शेवट झाला व राजांची सुटका झाली व त्यांचीं राज्यें त्यांस परत मिळालीं. नंतर श्रीकृष्ण आपल्या प्रिय भक्तांसह अपार धन घेऊन धर्मराजाकडे राजसूययज्ञासाठीं आला. १४. आपण. १५. देव. (कृष्ण.) १६. सर्व जाणणारा असून ही. १७. मी सांगतों. (वामन म्हणतो.) १८. शुक आणि व्यास यांचें बोलणें. १९. 'करूनी' व 'स्मरूनी' असे अन्य पाठभेद आहेत. २०. ह्यांत नमस्कारपूर्वक वर्ण्यवस्तु सूचित केलें आहे.

१. देवसभा. (देवांच्या सभेसारखी किंवा सद्धर्मानें वागणाऱ्या मंडळीची सभा. तिसऱ्या व चवथ्या श्लोकांत सभेचें वर्णन आहे.) २. यादवांचा समुदाय. ३. पांचजन्य. ४. सुदर्शन. ५. सोन्यासारख्या पिंवळ्या पीतांबरानें. (हेम-सोनें; अंबर-वस्त्र.) ६. प्रकाशणारा. ७. कोटिमदनांची शोभा. ८. कोटिमदनांची शोभा समान नये–कोटिमदनांची शोभा त्याच्या शोभेच्या साम्याला येणार नाहीं. ९. समुदाय. १०. नाचणाऱ्या स्त्रियांचे. ११. क्रमानें. १२. ब्राह्मण. १३. पराक्रमकृत यशें, सर्व दिग्विस्तृत यशें. १४. वर्णीत. १५. चिलखतानें सह. १६. शरीर. १७. 'माथां' असा अन्य पाठ. १८. कैटभ राक्षसाचा शत्रु. (कृष्ण.) १९. या श्लोकांत वर्ण्य कथेची प्रस्तावना केली आहे. २०. परदेशांतील, अन्य देशांतील. २१. पृष्ठ ३३२ टीप ३ पहा. २२. राजांनिमित्त नमस्कार करी. २३. जरासंधास मारल्यावर. २४. ज्या राजांचा.

जरासंधें बंधें करुनि [1]अयुतद्वंद्व नृपती,
बहू केले कष्टी मग 'हरि हरी' हेंचि जपती; ।
दुराशा राज्याची त्यजुनि अवघे पातकमळ,
'स्वदृष्टीनें पाहूं' म्हणति 'हरिचें पादकमळ.' ॥ ६
हरिचरण पहाया भूप जो तो भुकेला,
वध [2]मगधपतीचा [3]या सुखा हेतु केला; ।
'म्हणति शरण आलों मुक्ति देणार साची,
परि [4]रुचि न तिला हे जे [5]पदाब्जीं रसाची.' ॥ ७
'म्हणुनि मारुनि [6]मागध माधवा! चरण सत्वर दावि रमाधवा!' ।
धरुनि भाव मनीं इतुका महा वदति दूतमुखें [7]नृप [8]काम हा. ॥ ८
विनति संपवि दूत [9]विशारद, प्रगट होय अशांतचि [10]नारद, ।
नमुनि त्यास [11]सभासदवेष्टित, प्रभु पुसे [12]निजपांडवचेष्टित. ॥ ९
[13]स्वजनवत्सल [14]लौकिक तांडव [15]स्फुट करुनि म्हणे, 'अजि! पांडव ।
[16]धरुनियां असती कसि [17]कामना? विदित भाव करीं इतुका मना.'॥ १०
प्रश्नें हरी सुख करी [18]मुनिअंतरंगा, शब्दांत दावुनि [19]दयांबुधिच्या तरंगा, ।
'जें मी वदेन म्हणतों पुरुषोत्तमातें तें हा पुसे' [20]ऋषि म्हणे [21]स्वयमेव मातें.'॥ ११
'मी पांडवांचेंचि बरें कराया प्रार्थू पहातों, जगदेकराया! ।
[22]त्यांची त्वरा या पुरुषोत्तमातें योजी स्वयें त्या वचनींच मातें.' ॥ १२
'मी [23]भक्त, माझ्या वचनास मान देणार सर्वत्र जरी समान, ।
या कारणें बोलवितो [24]मला [25]हो [26]ऐशी मुनीला सुखधाम लाहो.' ॥ १३

१. दोन अयुतें. (अयुत=दहा हजार.) २. मगध देशच्या राजाचा. (जरासंधाचा.) ३. बंदींतील सारे राजे मुक्त होतील, त्यांस जें सुख होईल त्या सुखाला. 'त्या' असा अन्यपाठ आहे. ४. गोडी, मधुरता. ५. पादकमळीं. ६. मगध देशचा राजा (जरासंध.) ७. जरासंधाच्या बंदींतील राजे. ८. इच्छा, मनोरथ. 'काम' हा शब्द पुल्लिंगी आहे. ९. ज्ञानी, कुशल. १०. पृष्ठ ५२८ टीप ८ पहा. ११. सभासदांनीं वेष्टिलेला कृष्ण. १२. आपल्या पांडवांचा वृत्तांत. १३. आपल्या लोकांविषयीं (भक्तांविषयीं) दयाळु, स्वभक्तकारुणिक. १४. लौकिक आहे तांडव ज्याचें असा कृष्ण. १५. उघड. १६. 'धरुनियां बसती असि कामना' असाही पाठ आहे. १७. इच्छा, हेतु. १८. नारद ऋषीच्या मनाला. १९. दयारूप सागराच्या. २०. नारद ऋषि. २१. आपण होऊन. २२. पांडवांचें बरें करण्याची. २३. नारद हा परमभागवत होय. २४. मजकडून, नारदाकडून. २५. मुनीला सुखधाम लाहो—नारदाला मोठ्या सुखाचा लाभ होवो. २६. 'ऐशी' याचा संबंध पहिल्या दोन ओळींकडे.

नमुनि मुनि म्हणे 'तो [1]राजसूयक्रतूतें
करुनि यजिल राजा पांडुचा पुत्र तूतें, ।
[2]स्वचरणशरणातें [3]चक्रवर्ती कराया,
[4]लव निजकरुणेचा दावि लौकीक राया. ॥ १४
मिळतिल जन सारे त्या समस्तांत देवा !
दिसशिल हरि ! येथें [6]सर्वभूतां [7]सदेवा, ।
[8]क्रतुवर म्हणुनी हा होय ऐसी कृपा हे,
करुनि निजअपांगें पांडवांलागिं पाहें.' ॥ १५
श्रवण कथन [10]ज्यांचें दुष्टही [11]अंत्यजाती
करुनि तरति पापें भस्म होऊनि जाती; ।
क्रतुवर हरि ! होतां त्या तुझे दिव्य [12]पायें
त्रि[13]भुवनजन पाहे तूंचि त्याच्या उपायें. ॥ १६
तुझ्या कीर्ती गाती [14]अतळ वितळीं आणि सुतळीं,
सहस्रां तोंडींही [15]भुजंगपति गातो अतितळीं, ।
मनुष्य [16]मर्त्यलोकीं [17]क्षितिसुर, सुर [18]स्वर्गभुवनीं,
[19]वितान त्रैलोक्यावरि यश तुझें जी ! जनिं वनीं. ॥ १७

---

१. राजसूय यज्ञाला. राजानें अभिषेकद्वारा करावयाचा जो यज्ञ तो; अथवा राजा म्हणजे लतात्मक सोम, त्याचें सवन (कंडन) ज्यांत करतात तो=राजसूय यज्ञ. २. आपल्या चरणीं शरण आलेल्या पांडवाला, धर्मराजाला. ३. सार्वभौम. [चक्रवर्ती पुरुषाचें लक्षण सामुद्रिक ग्रंथांत आहे तें:—'अतिरक्तः करो यस्य ग्रथितांगुलिको मृदुः । चापांकुशांकितः सोऽपि **चक्रवर्ती** भवेद्ध्रुवम् ॥' (राघवभट्टकृत 'अर्थद्योतनिका' नामक अभिज्ञानशाकुंतलटीका—अंक ७ श्लोक १६ पृष्ठ २४३.) चक्रवर्ती=चक्रे भूमंडले राजमंडले वा वर्तयितुं शीलमस्य । यद्वा चक्रं सैन्यं वर्तयितुं सर्वभूमी चालयितुं शीलमस्य । अवश्यं वा चक्रं वर्तयति । असे या शब्दाचे विग्रह आढळतात.] ४. लेश. ५. आपल्या कृपेचा. ६. सर्व प्राण्यांना. ७. निरंतर. ८. श्रेष्ठ यज्ञ, मोठा यज्ञ. ९. आपल्या नेत्रकटाक्षानें. १०. ज्या तुझें. ११. अतिशूद्रादि जाती. १२. पायांच्या कृपेनें. १३. त्याच्या उपायें त्रिभुवनजन तूंचि पाहे. त्या अश्वमेध यज्ञाच्या योगानें त्रिभुवनांतील लोक तुला पाहतील. (त्रिभुवनांतील लोकांस तुझें दर्शन होईल.) १४. अतळ आणि वितळ यांमध्यें. (पाताळें सात आहेत तीं हीं:—१ अतल, २ वितल, ३ सुतल, ४ तलातल, ५ रसातल, ६ महातल, व ७ पाताल.) १५. सर्पांचा राजा. (शेष.) १६. मृत्युलोकामध्यें. १७. ब्राह्मण. १८. स्वर्गलोकांत. १९. चांदवा, छत.

त्वत्कीर्ति जी त्रिभुवनीं जरि चांदवा हे [1]मंदाकिनी चरणतोय [2]अमंद वाहे, ।
गंगा दुजी तिसरि [3]भोगवती हरी ते [4]पादोद्भवा [5]जगतिपातक संहरीते.' ॥ १८
[6]साम्राज्य या [7]क्रतुमिसें अजि पांडवांतें देऊनि दाखवि जगीं यशतांडवातें'. ।
भावें अशा यश निरूपुनि, नारदानें केलें [8]कथूनि, [9]निजकार्य [10]विशारदानें. ॥ १९
ऐकोनि गोष्टी मुनि नारदाच्या भक्तांचिया [11]मुक्तिविशारदाच्या, ।
आधींच हें कृत्य [12]अगाध वाटे तों देखिले यादव [13]अन्य वाटे. ॥ २०
गमे यादवां कीं नृपांचाचि [14]धांवा धरूनी मनीं, शत्रु आधीं वधावा, ।
मुनी पांडवांचेचि [15]सिद्धीस पाहे, मुकुंदास दोहींकडेही कृपा हे. ॥ २१
[16]पक्षद्वयावरि करूं म्हणतो कृपा हे, [17]साक्षी हरी निजसभे मतभेद पाहे, ।
कीं मागधा वधिन नेउनि भीमसेना, संकल्प हा स्वकृत हें [18]नमनी [19]स्वसेना. ॥ २२
देखे हरी खवळले यदुवीर भारी, हे नीति त्यास न वदे मधुकैटभारी, ।
कीं सांगतां बहु [20]जरासुतगर्व दूतें [21]निःसीम कोप चढला सकळां यदूंतें. ॥ २३
[22]जरासंधवैरानुबंध स्मरावा यदूंनीं, तयांच्या करें तो मरावा, ।

---

१. स्वर्गंगा. ही स्वर्गांतून मेरुपर्वताच्या शिखरावर पडते व तेथून त्रिभुवनांत वाहत जाते. हिला या लोकीं 'भूगंगा' आणि अधोभुवनीं 'पातालगंगा, भोगावती' असें म्हणतात. २. जलद, वेगानें. ३. पाताळांतील नदी. (अध्याय ७० श्लोक ४४ पहा.) ४. (तुझ्या) पायांपासून उत्पन्न झालेली. ५. पृथ्वीचें पातक. ६. सार्वभौमत्व. सार्वभौमत्व तीन गुणांनीं येतें, किंवा तिहींपैकीं एका गुणानेंही येतें. ते तीन गुण हे:—१ राजसूय यज्ञ करणें, २ बारा राजांचा अधिपति असणें, ३ सर्व राजांवर आपली सत्ता असणें. ['येनेष्टं राजसूयेन मंडलस्येश्वरश्च यः । शास्ति यश्चाज्ञया राज्ञः स सम्राट् ॥' अमरकोष—२ कांड क्षत्रियवर्ग श्लोक ३ पहा.] ७. यज्ञाच्या योगानें. ८. सांगून. ९. आपलें काम. १०. कुशल अशा नारदानें. येथें दशमस्कंध—अध्याय ७० संपतो. ११. मुक्ति देण्याविषयीं कुशल अशा नारदाच्या. १२. कठिण. १३. दुसऱ्या रस्त्याला. कृष्णाच्या मनांत पांडवांचें कार्य आधीं करावें असें होतें, व यादवांच्या मनांत जरासंधास आधीं मारावें असें होतें, याकरितां यादव दुसऱ्या रस्त्याला गेले म्हणजे त्यांच्या मनांत वेगळा विचार आला असें म्हटलें आहे. १४. प्रार्थना. १५. कार्यसिद्धीस. 'सिद्धीस' असाही पाठ आहे. १६. दोन्ही पक्षांवर. १७. मनांतलें जाणणारा. १८. मानणार नाहीं. १९. आपलें सैन्य, यादवमंडली. २०. जरासंधाचा गर्व. (जरासंध नांव पडण्याचें कारण सभापर्व—अध्याय १८ श्लोक ११ यांत सांगितलें आहे. जरा नामक राक्षसीनें दोन शकलांचा संधि (जोड) केला म्हणून 'जरासंध' असें नांव पडलें—मोरोपंतकृत सभापर्व—अध्याय १ गीति ७४-८३ काव्यसंग्रह पृष्ठ ९ पहा. २१. अमर्याद, अमर्याद. २२. जरासंधाचें मागलें वैर.

असी घाडितां गोष्टि भूपाळकानीं, यदूंमाजि वेतीस गोपाळकानीं. ॥ २४

'पंथीं पायीं जातां प्रगट न करी माग धरणी,
पळाला सत्रादां हतबळ असा मागध रणीं; ।
पुरीतें तूं जातां विमुख तुज त्या मार्गगमनीं
स्वयें केलें मानी मृगपतिस जैसा मृग मनीं. ॥ २५

'करुनि गर्व अपार अरा हरी! प्रबळ आपण निर्बळ संहरी, ।
म्हणुनि मारुनि सत्वर या खळा करिं सुखी क्षिति सागरमेखळा.' ॥ २६
श्रवण हें करितां बहु तापले, अधर चाविति यादव आपुले; ।
म्हणति, 'हे अपकीर्तिच ऊघडी परिहरूं अरि मारुनि ये घडी.' ॥ २७
तनुत्राणें देहीं तटतटित ऐसेचि फुगले,
मुनी मध्यें बोले, म्हणुनि अति सक्रोध उगले; ।

---

१. येथें वामनानें चार अक्षरांचें यमक साधिलें आहे. "वामनानें मराठीभाषेंत संस्कृतांतील अक्षरगणांच्या वृत्ताप्रमाणें वृत्तें उतरण्याचा प्रथमच आम्हावर अनुग्रह केला. ही गोष्ट वामनाचे यमकांकडे विशेष लक्ष्य लागण्यास कांहीं कारण झाली असावी असें वाटतें. संस्कृत रचना स्वभावतः माधुर्य ओजादिगुणांनीं अति मोहक आहे, यामुळें तींतील पद्यांशीं मराठीभाषेंतील पद्यांची तुलना जेव्हां वामनानें करून पाहिली असेल तेव्हां मराठीभाषेंतील पद्य फिकें आहे असें पंडितास वाटून, श्रुतिमाधुर्यादि चमत्कृतीकरितां त्यांनीं त्यांत प्रासयमकांची योजना केली असावी, व यमकास दुसरेंही एक कारण असें असावें कीं, मुकुंदराज, ज्ञानेश्वर आदिकरून महाराष्ट्रकवींनीं ओव्या, अभंग वगैरे छंदांत सर्वत्र पद्यांच्या चरणांचीं सारखीं अक्षरें योजिलेलीं आढळतात. तें अवलोकन करून अक्षरगणाच्या कठिण वृत्तास ही वामनानें यमकें मोठ्या परिश्रमानें व व्यापकपणानें योजिलीं आहेत. अनुप्रास यमकादि शब्दालंकाराविषयीं मराठीभाषेंत मोरोपंतानें तर सीमाच करून टाकिली आहे; तरी त्याला देखील वामनाचीं यमकें पाहून मोठा आनंद व विस्मय झाला होता. 'अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं । केली भाषाकवि जे त्यांची तो सर्व हा नियम कांहीं ॥' मोरोपंत. वा. पं. स्तु." (हंसकृत वामनावरील निबंध–पृष्ठ ६९ पहा.) २. रस्त्यातून. ३. पाय. ४. पृथ्वी. पृथ्वी माग प्रगट न करी. पृथ्वीवर त्याच्या पायांच्या खुणा उठत नसत इतक्या घाईनें तो पळे. ५. निर्बळ. ६. मार्गातील जाण्यांत. जैसा मृग मनीं मृगपतिस, तैसा पुरीतें तूं जातां तुज, त्या मार्गगमनीं स्वयें विमुख केलें (असें तो जरासंध) मानी. 'हरिण हा वध्य नाहीं म्हणून सिंह त्याच्यावर चाल करून न गेला तरी हरिण असें म्हणतो कीं मी त्याला परत लाविलें, त्याप्रमाणें हा जरासंध हतबळ झाला व पळाला म्हणून तूं (कृष्ण) आपल्या नगराकडे परतलास तरी जरासंध असें म्हणतो कीं मी त्याला परत लावला–असा भाव. ७. हे कृष्णा. ८. समुद्रवलयांकित (पृथ्वी). ९. त्यांचे ओंठ. १०. चिलखताच्या योगानें. ११. क्रोधानें सह, रागावलेले. १२. उगे राहिले.

अशांतें गुह्याचें[1] कथन करितां विप्रवचना[2]

निमित्तें[3] हे केली म्हणतिल मृषा[4] शब्दरचना. ॥ २८

सर्वज्ञ यास्तवचि लौकिक भाव दावी, कीं नीति उद्धवमुखें[5] स्फुट[6] हे वदावी, ।
त्यातें वदे सदय[7] माधव हें स्ववाचा कीं, 'उद्धवा! नयन तूं निजवैभवाचा[8]. ॥ २९
आम्हांस तूं तनुस नेत्र जसा तसा रे! वर्तों तुझ्याच वचनें यदुवीर सारे. ।
हें उद्धवा! तुज विचाररहस्य[9] ठावें, 'कोणीकडे[10] प्रथम सांग अगा! उठावें?' ॥ ३०

त्रिभुवनपतिची[11] हे आयके शुद्ध वाचा,

जनिं विजनिंहि कोंडे तोष त्या उद्धवाचा. ।

विदित[12] मत सभेत्रें दूतदेवर्षिवाणी[13],

अणुभरि न जयातें बुद्धिचातुर्यवाणी[14]. ॥ ३१

म्हणे 'मुकुंदा! मुनिनारदानें जें बोलिलें बुद्धिविशारदानें, ।
ते योग्य[15] सिद्धि[16] स्वकरें कराया जावेंचि तेथें, जगदेकराया!' ॥ ३२
शरण भूपति सोडवणें खरें, मनि असें धरिलें सुरशेखरें[17], ।
परि जरासुतमृत्यु जधीं घडे, उभयसिद्धिकपाटहि[18] उघडे. ॥ ३३
जिंकोनि राजे सहसा धनातें जो राजसूय क्रतुसाधनातें[19] ।
आणील त्याला मखराजसिद्धी ते हों न दे[20] मागध हे प्रसिद्धी. ॥ ३४
मेल्याविणें तो सहसा धनातें नेदील, होऊं क्रतुसाधनातें ।
तैसाचि सोडील न त्यां नृपांतें दोन्हीं घडावीं खेळघातपातें[21]. ॥ ३५
रणीं मृत्युही त्यास देवा! असेना जरी जाय अक्षौहिणी[22] कोटि सेना, ।

---

१ गुप्तगोष्टीचें, मनोगताचें. २. ब्राह्मणाच्या वचनाला (नारदाच्या वचनाला). ३. उगीच. ४. खोटी. ५. उद्धवाच्या तोंडानें. ६. उघड. येथें पहिल्या श्लोकाशीं व आख्यानाशीं संबंध जोडून दिला आहे. हा उपोद्घातच समजावयाचा. सर्वज्ञ ईश्वरानें उद्धवाला नीति कां विचारली या प्रश्नाचें उत्तर २८ व २९ श्लोकांत दिलें आहे. ७. दयाळू. ८. आमच्या वैभवाचा. ९. विचारांतली खुबी. १०. जरासंधाकडे किंवा पांडवांकडे. ११. त्रिलोकेशाची (कृष्णाची). १२. ठाउकें. १३. दूताचें आणि नारदाचें भाषण. १४. बुद्धि व चातुर्य यांची उणीव. १५. 'यागसिद्धि' असाही पाठ आहे. १६. युधिष्ठिराकडे राजसूययज्ञार्थ साहाय्य करण्यासाठीं जाणें. (अध्याय ७१ श्लोक ३.) १७. देवश्रेष्ठ कृष्णानें. १८. दोघांच्या (नारदाच्या व दूताच्या किंवा पांडवांच्या व बंदींतल्या राजांच्या) कार्यसिद्धीचें दार. १९. जो राजे जिंकोनि–राजसूयक्रतुसाधनातें–धनातें आणील, त्याला मखराजसिद्धि. २०. होऊं देणार नाहीं. २१. दुष्ट (जरासंधाच्या) वधानें. २२. अक्षौहिणी. या संबंधें पुढील कोष्टक लक्षांत ठेवण्यासारखें आहे:—'अक्षौहिण्यामित्यधिकैः सप्तत्या ह्यष्टभिः शतैः । संख्या

जरासंध तो 'द्वंद्वयुद्धीं वधावा, वडे योग तेव्हां फळे भूपधांवा.' ॥ ३६
जरासंधदेहास या दोनि भाग स्वहस्तें चिरूनी करी जो विभाग, ।
तयाच्या करें मृत्यु तो या खळाचा, नव्हे अन्यथा घात उच्छृंखळाचा.॥ ३७
पाहिजे समबळीच खळा या, देहसंधिस बळें उखळाया, ।
पाडुनी अयुतनागबळातें, कोण जी ! चिरिल त्या प्रबळातें ? ॥ ३८
भीम एक समसत्व नृपा या तोचि एक खळमृत्युउपाया, ।
हें रहस्य विरळांसचि ठावें, सद्य यास्तव मखार्थ उठावें. ॥ ३९

मगधपति वधावा जाउनी त्याच वेंटे,
समबळि अरि ज्याचा एकला भीम वेंटे; ।

युक्ता सहस्राणि गजानामेकविंशतिः ॥ एवमेव रथानां तु संख्यानं कीर्तितं बुधैः । पंचषष्टिः सहस्राणि षट् शतानि दशैव तु ॥ संख्यातास्तुरगास्तज्ज्ञैर्विना रथतुरंगमैः । नृणां शतसहस्रं तु सहस्राणि नवैव तु ॥ शतानि त्रीणि चान्यानि पंचाशच्च पदातयः ॥.'

सेना	पत्तिः	सेनामुखम्	गुल्मः	गणः	वाहिनी	पृतना	चमूः	अनीकिनी	अक्षौहिणी
गजाः,—रथाः	१	३	९	२७	८१	२४३	७२९	२१८७	२१८७०
अश्वाः:—	३	९	२७	८१	२४३	७२९	२१८७	६५६१	६५६१०
पदातयः:—	५	१५	४५	१३५	४०५	१२१५	३६४५	१०९३५	१०९३५०

यावरून १ पत्ति=१ रथ+१ गज+३ अश्व+५ पदाति; ३ पत्ति=सेनामुख, ३ सेनामुख=१ गुल्मः; ३ गुल्म=१ गण; ३ गण=१ वाहिनी; ३ वाहिनी=१ पृतना; ३ पृतना=१ चमू; ३ चमू=१ अनीकिनी; १० अनीकिनी=१ अक्षौहिणी.

१. झोंबी खेळून. २. जरासंधाच्या बंदींतील राजांनीं केलेला (कृष्णाचा) धांवा. ३. उन्मत्ताचा, दांडग्याचा, जरासंधाचा. ४. तुल्य बल ज्याला आहे असा. (अध्याय ७१ श्लोक ५). ५. देहाच्या (जरेनें सांधलेल्या) सांध्याला. ६. ज्याला दहा हजार हत्तींचें बळ आहे अशाला. ७. तुल्य-बल. [सत्त्व=बल. 'सत्वं गुणे पिशाचादौ बले द्रव्यस्वभावयोः । आत्मत्वव्यवसायासु वित्तेष्वस्त्री तु जंतुषु ॥' इति मेदिनी.] ८. 'तोचि योग्य' असा ही पाठ आहे. ९. दुष्टाच्या मृत्यूच्या उपायाला. १०. गुप्त गोष्ट. ११. थोडक्यांना. १२. आज. १३. यज्ञाला जाण्याकरितां. १४. मार्गानें. १५. वाटतें.

त्यजुनि सकळ [1]इंद्रप्रस्थभूमीस सेना,
गमन अजि! करावें घेउनी भीमसेना. ॥ ४०
जवळि तूं असतां अजि! भीम हा चिरिल [2]मागधसंधि उभी महा, ।
[3]शिखिमुखीं वन अर्पुनि [4]खांडव, करि जसा रणिं तांडव [5]पांडव. ॥ ४१
करुनि तूं जग मोडिसि माधवा! परि निमित्त [6]विधीस [7]उमाधवा ।
करिसि, या रिति या [8]कुरुनंदना करिं पुढें [9]यदुनंदननंदना! ॥ ४२
परि [10]द्वंद्वयुद्धार्थ तो सांपडावा, चमत्कारयोगेंच फांसा पडावा, ।
न दे ब्राह्मणा पाठि [11]नेदूनी दान करावें तयाच्या बधा हें [12]निदान. ॥ ४३
स्वयें [13]विप्रवेषासी भीमें [14]सजावें अकस्मात [15]आतिथ्यकाळास जावें, ।
म्हणें मागतों युद्ध दे हें वदावें, [16]खंडाण्यापशूतें तया हेंचि दावें. ॥ ४४
असें द्वंद्वयुद्धीं हरी! त्या नृपातें चिरावें [17]क्षिती [18]पाडुनी घातपातें, ।
तई याग तेव्हांच त्या भूपतींतें घडे मुक्ति भक्ताश्रियांच्या पतींतें. ॥ ४५
[19]पदभ्रष्टा राण्या [20]गिरिदरिं अरण्यांत असती,
कितेका [21]कुग्रामीं करुनि असती जी [22]स्ववसती; ।

---

१. इंद्रप्रस्थग्रामांत. इंद्रप्रस्थ–हिंदुस्थानाच्या उत्तरेकडे दिल्ली म्हणून यमुनेच्या कांठीं जें प्रसिद्ध शहर आहे त्याच ठिकाणीं भारतीयुद्धांत प्रसिद्धीस आलेलें इंद्रप्रस्थ नांवाचें शहर होतें. या शहराच्या सभोंवार खांडवप्रस्थ नांवाचें अरण्य होतें. पांडवांचा आपल्या मुलांबरोबर कलह होऊं नये, म्हणून धृतराष्ट्रानें, 'या ठिकाणीं शहर वसवून राहा,' असें पांडवांस सांगितलें. पुढें पांडवांनीं तें शहर वसविलें व त्याची रचना सर्वोत्कृष्ट झाल्यामुळें, त्याला 'शक्रप्रस्थ' असेंही म्हणूं लागले. भारतांतील प्रसिद्ध गोष्टी ज्या मयासुरसभा आणि राजसूययज्ञ, त्या याच ठिकाणीं घडल्या. हस्तिनापुराप्रमाणें इंद्रप्रस्थ हेंही कुरुदेशाच्या राजधानीचें शहर होतें. (भरतस्थलादर्श–पृष्ठ ३१.) (मुक्तेश्वरकृत आदिपर्व–अध्याय ४६ ओंव्या १-२० पहा.) २. मागधाचा (जरेनें सांधलेला) सांधा. ३. अग्नीच्या मुखांत. ४. खांडव नांवाचें. ५. अर्जुन. ६. कारण. ७. शंकराला. ८. भीमाला. ९. यादवांना नंदनवनासारखा (कृष्ण.) हें संबोधन आहे. 'यदुनंदन कंदना' असाही पाठ आहे. १०. बाहुयुद्धाकरितां. 'द्वंद्वयुद्धांत' असाही पाठ आहे. ११. न देऊन. १२. आदिकारण. १३. ब्राह्मणाच्या वेषाला. विप्राचा वेष धरून. (श्लोक ७.) १४. ध्यावें. १५. आतिथ्यकाळीं, अतिथि जातात त्या वेळीं, वैश्वदेवसमयीं. अमरकोश-कांड २ ब्रह्मवर्ग यांत अतिथीचें लक्षण असें सांगितलें आहे:—'दूराच्चोपगतं श्रांतं वैश्वदेव उपस्थितम्। अतिथिं तं विजानीयान्नातिथिः पूर्वमागतः ॥.' १६. खोकर बैलाला. १७. पृथ्वीवर. १८. 'वाळूनी' असा अन्यपाठ आहे. १९. पदभ्रष्ट झालेल्या, राज्यावरून काढलेल्या. २०. पर्वताच्या दरींत. २१. खेडेगांवांत. २२. आपलें राहणें.

दळाया कांडाया इतर गृहकृत्यास बसती,
तुतें जेव्हां जेव्हां स्मरति इतराही[1] नृपसती. ॥ ४६
निजवुनि नृपकांता पाळणीं बाळकांतें,
स्मरतचि तुज गाती श्रीजगत्पाळकातें; ।
करिसिल पतिमुक्ती[2] मागधातें वधूनी,
म्हणुनि भरंवसा हा मानिला त्या वधूंनीं. ॥ ४७
गाती तुझें विशद[3] कर्म[4] नरेंद्रकांता[5] कीं मारुनी रिपुसि सोडविशी स्वकांता[6], ।
गोपी जगीं क्षितिपति[7] स्मरत, स्वमाया[8] इत्यादि बंध हरि[9], कीर्ति जगीं संजाया[10].
व्रजसतींसह[11] गाय[12] वनीं हरी, धनददूत[13] तई अबला[14] हरी[15], ।
वधुनि तो खळ, तो प्रभु[16] त्या वधू[17] त्वरित सोडवि, मागध[18] तो वधू[19].॥४९
जळचरें[20] चरणीं धरितां करी[21] करिं[22] सरोरुह[23] काकुलती[24] करी, ।
स्वगति[25] जो तई[26] दे द्विरदाधिपा[27], वरद[28] तोचि[29] वधू[30] मगधाधिपा[31].॥५०
जनकजा[32] हरितां[33] दशकंधरें[34] वधुनि त्यासहि कौस्तुभकंधरें[35], ।
स्वपदही[36] दिधलें, स्वपतीस[37] तो[38] रिपुहर[39] स्वपदप्रद[40] दीसतो. ॥ ५१
स्वजननीजनकें[41] यदुशेखरें[42] वधुनि कंसहि सोडविलीं खरें[43], ।
कवण त्याविण मागध संहरी म्हणुनि[44] भूपसत्या[45] वदती 'हरी[46] !'॥ ५२

---

१. दुसऱ्या देखील (राजांच्या बायका) इतर ठिकाणीं असणाऱ्या. 'हरि गाती नृपसती,' 'तुतें तेव्हां जे हे स्मरत हरि तेही नृपसती' असे पाठभेद आहेत. २. अध्याय ७१ श्लोक ९ पहा. ३. पवित्र. ४. जरासंधवध आणि स्वपतिमोक्षण. ५. राजांच्या बायका. ६. आपल्या नवऱ्याला. ७. राजा. (कृष्ण.) ८. आपली माया. ९. नाहींशी करतो. १०. होण्याकरितां. ११. गोपींसह. १२. गातो, गात असतां. १३. कुबेराचा दूत. शंखचूड. याला शापानें राक्षसयोनि प्राप्त झाली तेव्हां हा वृंदावनांत होता. तेथें यानें कित्येक गोपींचें हरण केलें म्हणून कृष्णानें यास मारलें. (दशम स्कंध—अध्याय ३४.) १४. स्त्रिया. (गोपी.) १५. हरण केल्या, नेल्या. १६. कृष्ण. १७. गोपी. १८. तो कृष्ण. १९. मारी. २०. नक्रानें. (वामनपंडितकृत गजेंद्रमोक्ष—पृष्ठ २६३ पहा. २१. हत्ती. २२. शुंडाग्रीं. २३. कमल. २४. प्रार्थना. २५. आपली गति, मोक्ष. २६. त्यावेळीं. २७. गजेंद्रास. २८. वर देणारा. २९. कृष्ण. ३०. मारी. ३१. मगध देशच्या राजाला. (जरासंधाला.) ३२. जनकाची मुलगी (सीता.) ३३. नेली तेव्हां. ३४. रावणानें. ३५. ज्याच्या गळ्यांत कौस्तुभ मणि आहे त्या कृष्णानें. ३६. आपलें पद. ३७. आपल्या नवऱ्यांना. ३८. तो कृष्ण. ३९. शत्रूचें हरण करणारा. ४०. आपलें पद—राज्य—देणारा. ४१. आपलीं आईबापें देवकी=वसुदेव. ४२. कृष्णानें. ४३. खरोखर. ४४. 'म्हणुनि भूपसती स्तविती हरी' असाही पाठ आहे. ४५. राजांच्या स्त्रिया. ४६. 'हरी हरी' म्हणती. हरीची प्रार्थना करितां.

[1]द्रुतविलंबितवृत्त तसा हरी ! नृपहि सोडवि, मागध संहरीं, ।
[2]द्रुतकृपाळु मखार्थ [3]विलंबितो प्रभुस कार्य असे अविलंबि तो. ॥ ५३
चारि हे द्रुतविलंबितवृत्तें आयकोनि हरि चारिहि [4]वृत्तें, ।
पातला [5]द्रुतचि, [6]अल्पविलंबें कार्य [7]उद्भवहि त्या [8]अविलंबें, ॥ ५४
असे तो पुढें नीट जोडोनि [9]पाणी असा उद्धवें प्रार्थिला चक्रपाणी; ।
म्हणें 'हेंचि गाती हरी ! लोक सारे हरी ! तूं न दुःखें हरीसी कसा रे!॥ ५५
गाती असेच [10]शरणागत जे पदातें व्यासादि जे मुनि अशा यशसंपदातें.' ।
ऐसेंच उद्धव म्हणे, 'हरिभक्त सारे गातां न पावसि म्हणे हरि ! तूं कसा रे !॥ ५६
जरासंध हा सर्वथाही वधावा धरूनि, असा हा [11]बहूजीव धांवा ।
जईं राजसूयाचिया [12]क्षिप्रें संधि [13]हरी [14]तोचि आम्हां [15]अरी हे प्रसिद्धी.॥ ५७
नृपां राज्य, साम्राज्यही पांडवांतें, सुखी [16]वृष्णिवृंदें, करू [17]तांडवातें, ।
यशाची तुझ्या सर्वलोकीं प्रसिद्धी वधें मागधाच्या [18]अतिक्षिप्र सिद्धी.'॥ ५८
[19]सविनय [20]निपुणाची येरिती सिद्ध वाचा,
परिसुनि [21]यदुवृंद, [22]स्वामि हा उद्धवाचा, ।
[23]मुनिवर, [24]नृपदूत प्रीति पावोनि सारे,
म्हणति, 'चतुर नाहीं उद्धवा ! तूजसा रे !' ॥ ५९
भीम एक कळला [25]खळहंता, यादवीं दवडिली [26]स्वअहंता. ।
गोष्टि [27]अप्रिय मना जइं वाटे बुद्धि हें करुनि लावि [28]सुवाटे. ॥ ६०

---

१. हें वृत्ताचें नांव आहे. यांतलीं पहिलीं अक्षरें ऱ्हस्व असल्यामुळें त्यांचा उच्चार लौकर होतो व मागलीं दीर्घ असल्यामुळें त्यांचा उच्चार सावकाश होतो. त्याप्रमाणें तूं मागधास लौकर मारून यज्ञ सावकाश कर--असा भाव. २. लौकर कृपा करणारा. ३. वेळ लावतो. ४. वर्तमानें. ५. लौकर. ६. थोड्या अवकाशानें. ७. उत्पत्ति. ८. लौकर. ९. हात. १०. शरण आलेले. ११. पुष्कळ प्राणी. जरासंधापासून त्रास पावलेले. १२. लौकर. 'तयीं राजसूयाचिही क्षिप्रसिद्धी, अरी तोचि आम्हां हरी हे प्रसिद्धी' असाही पाठभेद आहे. १३. हरण करील. १४. तो कृष्ण. १५. शत्रु. (जरासंध.) १६. यादवांचे समुदाय. १७. नृत्याला. 'तांडव' हा शब्द वामनपंडितांचा फार आवडता आहे असें वाटतें. १८. फार लौकर. १९. विनयानें सह, नम्र, विनीत. २०. कुशलाची. (उद्धवाची.) 'अतिनयनिपुणाची' पाठभेद. २१. यादवांचा समुदाय. २२. उद्धवाचा स्वामी कृष्ण. २३. नारद. २४. जरासंधाच्या बंदींतील राजांकडून आलेला दूत. (उद्धवाचें बोलणें सर्वांस आवडलें.) २५. दुष्टाला--जरासंधाला मारणारा. २६. आपला गर्व. २७. न आवडणारी. २८. चांगल्या रस्त्याला. 'लावि' याचा कर्ता 'उद्धव.'

हरी इंद्रप्रस्था गमन करुनी, पांडुतनया,
स्वभक्ताची वाणी सहजचि वंदे त्या सुविनया, ।
सवें ने भीमातें सहज करुणेनें तदनुजा
प्रकारें त्या मारी मगधपति, दे राज्य तनुजा. ॥ ६१
जसें गीत केलें नृपांच्या वधूंनीं, तसें सोडिलें मागधातें वधूनी, ।
हरूनी तयांच्या महाआपदेतें पदंद्वंद्व दाऊनि दे संपदेतें. ॥ ६२
'न करूं म्हणति राज्यें' भूप जे त्यांस देवें,
परिहरुनि अविद्या दीधलीं त्यां सदेवें, ।

---

१. अध्याय ७१ श्लोक २१ पहा. २. पंडूच्या मुलाला. धर्मराजाला. ३. आपल्या भक्ताची. (उद्धवाची.) ४. 'वंदे' याचा कर्ता 'हरी.' ५. विनयवंताला. हें 'पांडुतनया'चें विशेषण. ६. बरोबर. ७. त्याच्या धाकट्या भावाला—अर्जुनाला. ८. त्या प्रकारानें, उद्धवानें सांगितल्याप्रमाणें. ९. सहदेवा. (अध्याय ७२ श्लोक ४८ पहा.) १०. दोन पाय. पायांची जोडी. हें 'मुकुंदविलास' काव्य वामनांच्या चांगल्या काव्यांपैकीं एक होय. वामनाच्या काव्याचे जे ठळक ठळक गुण आहेत ते यांत बरेच दृग्गोचर होतात. "वामनाच्या काव्यांत बहुतकरून सर्वत्र माधुर्य आणि प्रसाद हे गुण दृष्टीस पडतात. ओजोगुणाचें व्यंजकपद्य बहुधा, त्याच्या काव्यांत आढळत नाहीं. स्वभावोक्ति ह्या बहारदार व मनोरम अलंकाराचा वामनानें पुष्कळ ठिकाणीं उपयोग केला आहे. त्याचीं उदाहरणें अन्यत्र कांहीं आलींच आहेत यास्तव एथें आणखी देत नाहीं. अलंकाराचें साम्य चित्राशीं करितां येईल. इच्छेस वाटेल त्याप्रमाणें मनोहरत्वाची कल्पना करून तदनुरूप काढिलेल्या चित्रापेक्षां ईश्वरनिर्मित मूर्तिविशेषाप्रमाणें हुबेहुब काढिलेलें चित्र किती मनोहर व बहारीचें दिसतें! ही गोष्ट जुन्या चितार्‍यांनीं काढिलेलें चित्रें आणि फोटोग्राफांतील चित्रें ह्यांची तुलना करून पाहिली म्हणजे ढळढळीत दिसूं लागते. स्वभावोक्ति हा अलंकार फोटोग्राफांतील तसबिरीप्रमाणें विवक्षितव्यापाराचें हुबेहुब चित्र होय. वामन संस्कृतज्ञ महान् पंडित होता यामुळें त्यास स्वाभाविक संस्कृताची फार संवय लागली असावी व त्याच्या व्यवहारांतील भाषणांत देखील संस्कृत शब्दांची अतिप्रवृत्ति असावी असें वाटतें; परंतु त्याच्या कवितेंत तसें दिसत नाहीं. अप्रसिद्ध संस्कृत शब्द किंवा चार चार पांच पांच पदांचे लांब लांब समास त्याच्या काव्यांत बहुतकरून आढळत नाहीत. त्याच्या काव्यरचनेची शैली साधी, सरळ व सुबोध आहे. त्यानें निवडून वर्णन केलेलीं लहान लहान प्रकरणें कितीएक स्वभावतःच मनोरंजक आहेत व त्यांतील वर्णनही कितीएक स्थळीं बहारदार झालें आहे. काव्याच्या रीतीनें एकादें वर्णन करावें असा पंडितानें मुख्य हेतु धरून वर्णन केलेलें दिसत नाहीं. केवळ ईश्वरगुण, सगुणनिर्गुणाचें ऐक्य आणि भक्तीचें महत्त्व हीं जगास दाखवावीं हाच त्याचा प्रधान हेतु होता यामुळें त्याच्या बहुतेक प्रकरणांत भक्ति आणि शांत हे रस उत्कर्षानें वर्तत आहेत." (हंसकृत वामनावरील निबंध—पृष्ठ ६८-६९ पहा.) ११. नाहींशी करून. १२. माया, भ्रम. १३. निरंतर.

मिळुनि[1] बहुत राजे क्लेश फारां दिसांचे
हरुनि विमेळ[2] केले दग्धतापादि[3] साचे. ॥ ६३

नव्हे जागरीं[4] बद्धक[5] स्वप्नसेना[6] प्रबुद्धांतसा[7] बद्ध[8] भोगी[9] असेना,[10] ।
असें ध्यान लावूनियां चिद्रसाचें[11] दिल्हें राज्य कीं जें न वाटेचि सांचें.[12] ॥ ६४

सदन्नें[13] सद्वस्त्रें[14] विविध[15] सदलंकारनिकरें,[16]
तयां शोभा केली अभय[17][18] अभया[19] देउनि करें, ।
रथीं एका एका बसवुनि कृपायुक्त हृदयें,[20]
तयां आज्ञा देतां गमन करिती भाग्यउदयें.[21] ॥ ६५

तें सोडवूनि अवघे नरदेव[22] देवें[23] येऊनियां करविला क्रतु[24] वासुदेवें, ।
यागांत मोक्ष शिशुपाळनृपास[25] देवें देतां दिसे प्रकट सर्वजनां सदेवें. ॥ ६६

---

१. 'मळिण' असाही पाठ आहे. २. शुद्ध. ३. दग्ध आहेत तापादि ज्यांचे. ज्यांचे त्रिविध ताप दग्ध केले आहेत असे. 'पापतापादि' असाही पाठ आहे. ४. जागृतीमध्यें. ५. बद्ध करणारी. ६. स्वप्नांतील सेना. ७. शहाण्यांना. ८. बांधलेला. ९. भोग घेणारा-सुखोपभोग घेणारा. १०. स्वप्नसेना जागरीं (कोणासही) बद्धक नसे तसा प्रबुद्धां भोगी बद्ध असेना. ज्याप्रमाणें स्वप्नांतलें सैन्य जागें झाल्यावर (जागृतीमध्यें कोणासही बद्ध करणारें (अपाय करणारें) वाटत नाहीं, त्याप्रमाणें ज्ञात्यांना भोग घेणारा (राज्य वगैरे वैभवाचा उपभोग घेणारा बद्ध आहे (मुक्त होणार नाहीं किंवा मुक्त नाहीं) असें वाटत नाहीं. ११. ज्ञानरूपी रसाचें, परब्रह्म स्वरूपाचें. १२. खरें. १३. चांगलीं अन्नें. १४. चांगलीं वस्त्रें. १५. नानाप्रकारचे. १६. चांगल्या अलंकारचे समुदाय. १७. 'वसनें' असाही पाठ आहे. १८. 'अभय वचनें पीत वसनें' असाही पाठ आहे. १९. निर्भय (करांचें विशेषण.) २०. दयायुक्त अंतःकरणानें २१. भाग्य उदयास आल्यामुळें. सामासिक पदें संधिनियमानुसारें न जोडतां वेगळीं ठेवण्याचा वामनपंडितांचा परिपाठ फार दिसतो. २२. राजे. २३. कृष्णानें. २४. यज्ञ. २५. शिशुपाल हा सोमवंशीय दमघोष राजाचा पुत्र. ह्याची माता श्रुतश्रवा ही वासुदेवाची भगिनी, तेव्हां हा कृष्णाचा आतेभाऊ. शिशुपालाच्या आजाचें नांव चेदि म्हणून याला 'चैद्य' अथवा 'चेदिप' आणि ह्याच्या देशास 'चेदि' असें नांव पडलें. या देशाची राजधानी शुक्तिमती नामक नगरी. शिशुपाल हा हिरण्यकशिपूचा अंशावतार होय. यास जन्मतः तीन डोळे व चार हात होते. हा कृष्णाच्या मांडीवर बसला तेव्हां याचे दोन हात व एक डोळा असे गळून पडले. तत्क्षणींच श्रुतश्रवा भयभीत होऊन कृष्णास शरण गेली आणि 'यास मारणार नाहीं' असें वचन दे असें त्यास म्हणाली. 'मी या शिशुपालाचे शतापराध क्षमा करीन' असें कृष्णानें आपल्या आतेस वचन दिलें. नंतर तो द्वारकेस परत आला. पुढें राजसूययज्ञांत इंद्रप्रस्थ येथें कृष्णाची अग्रपूजा करावी असें ठरलें. ती गो[illegible] शिशुपालास पसंत न पडून त्यानें भीष्माची आणि कृष्णाची अद्वातद्वा बोलून भडोनांत नि[illegible]. ती कृष्णास सहन झाली

उपसंहार.

(श्लोक.)

मुक्तिदायक[1] मुकुंदविलास[2] ग्रंथ यास्तव 'मुकुंदविलास,'[3] ।
ध्यात वामन मुकुंदपदातें[4] अर्पितां निजमुकुंदपदातें[5] . ॥ ६७

नाहीं, तथापि त्यानें शिशुपालाचे शंभर अपराध होतांच आपल्या चक्रानें त्याचें शिर तोडिलें व तो तत्काल मरण पावला. (सभापर्व—अ० ४५.) ह्या शिशुपालवधाच्या कथानकावर माघकवीचें एक उत्तम संस्कृत काव्य आहे.

१. मुक्ति देणारा. २. कृष्णाची लीला. ३. 'मुकुंदविलास' हें ग्रंथाचे नांव. ४. कृष्णाच्या पदाला. ५. आपल्या मुकुंद या अक्ष[illegible]

वामनपंडितकृत कवितासंग्रह, भाग पहिला.

परिशिष्टें.

१. अधिक पद्यें.

रामजन्म.

पृष्ठ ४ श्लोक ४२-४३ यांमध्यें हे श्लोक आहेत:—

कल्पना नव्हेति नाटकरीती, सूचना ऋषिहि नीट करीती।
मेषराशि पदवी बरवी हो, घे तई तदवलंब रवी हो. ॥ १
सूर्यास उच्च म्हणती पद मेषराशी, तेथूनि उच्च रवि दुष्ट निमेश राशी ।
लग्नीं जया सकळ जन्म तया निमेशी, पुत्रोत्सवीं रवि चढे म्हणऊनि मेषीं.॥ २

सीतास्वयंवर.

पृष्ठ १८ श्लोक ६७-६८ यांमध्यें हा श्लोक आहे:—

शवासमें सर्वहि तीं नृपांगें, पाहोनियां तुच्छपणें अपांगें ।
सर्वोत्तमा याच रघुत्तमाला, अर्पी गळां श्री निजहस्तमाला. ॥ १

भरतभाव.

पृष्ठ २९ श्लोक ६० व ६१ यांमध्यें हीं पद्यें आहेत:—

(पद)

रामांघ्रिधूळिमधें भरत देह घोळी ॥ ध्रुवपद. ॥
श्रीरामपदपद्मीं देखे अंकित भूमी ।
चित्तीं स्मरे मूर्ति सांवळी. ॥ रामांघ्रि० ॥ १ ॥
वज्रांकुशध्वज ऊर्ध्व रेखांबुज ।
चिन्हें देखे पृथ्वीमंडळीं. ॥ रामांघ्रि० ॥ २ ॥
कंठ गद्गदित देह रोमांचित ।
प्रेमजळ नेत्रीं त्याचे कुळीं. ॥ रामांघ्रि० ॥ ३ ॥
भरत नाम स्मरे, अन्य हरिपद जीं ।
धन्य जैसा वामन केवळीं. ॥ रामांघ्रि० ॥ ४ ॥ १

(श्लोक.)

वंदी असा सानुज राघवाचे, ते पादरेणू रघुराघवाचे, ।
प्रत्यक्ष तो राघव देखिला हो!, झाला सुखाचा अवितर्क लाहो. ॥ २

पदरजांत असा स्मरतो जया, भरत त्याच अजी रघुराजया ।
नयनिं देखुनि कैंवि पहातसे, तुम्हिहि सर्व मनांत पहा तसे. ॥ ३
असें पाहतां भेट झाली जयाची मिठी बैसली, जाण त्या चिन्मयाची ।
अहो! रत्न जोडे जसें कामिकाला तसा क्षेमआलिंगनीं होय काला. ॥ ४

पृष्ठ ३० श्लोक ७९-८० यांमध्यें हें पद आहे:—

रघुनाथजी! मज तूं गती । सत्वर येईं सीतापती! ॥ ध्रुवपद. ॥
निमिष निमिष मज युगसम होई एवं वर्ष चतुर्दश ।
क्रमिति कसी असि मति अति विव्हल वाटति, शून्य दिशा दश. ॥रघु०॥१॥
त्रिभुवनजीवन तो मज तो तूं जासी अजी! वना ।
तळमळि निर्जळिं मासोळी जसि होय असे माझ्या मना. ॥ रघु० ॥ २ ॥
कठिण करुनि मन, कंठिं धरुनि प्राण कंठीन मी हाल जी! ।
इतुकी जधिं अवधी होइल मी तधीं त्यजीन तनु तात्काळ जी! ॥ रघु० ॥३॥
भरत म्हणे भरतां चतुर्दश क्षणभरि न धरित माव जी!
ज्वलित हुताशनिं मज आपोशन करणें तुझीच आण जी! ॥ रघु० ॥ ४ ॥
अभयकरांकित मस्तक करि मणी वामन प्रभु इच्छा अगा! ।
भरति चतुर्दश तेच दिशीं तुज देइन दर्शन तूं उगा. ॥ रघु० ॥ ५ ॥ १

लोपामुद्रासंवाद.

पृष्ठ ३४ श्लोक २४-२५ यांमध्यें खालील श्लोक आहेत:—

जटायु पक्षी मजलागिं धांवे, तों रावणें त्यास सये! वधावें ।
तेथूनि यानें मज दुष्ट लंके पक्षीवनामध्य अवेश शोके. ॥ १
अहो! गोदातीरा रघुपति फिरे, पादयुगुळें
गळे नेत्रीं पाणी, सुखि न निघती शब्द सगळे, ।
वदे सौमित्रातें, 'सखिविण दिसे सर्व अरुची,
अहो! गेली गेली सुमनकळिका मारतरुची.' ॥ २

पृष्ठ ३४ श्लोक २६-२७ यांमध्यें हा श्लोक आहे:—

मारीच मारीच मृगास रानीं, लंकेस लंकेश वधी शरांनीं ।
वाळीस वारीच, सख्यास पाळी, गातां सदा त्यास भजे कपाळीं. ॥ १

विराटपर्व.

अध्याय पहिला.

पृष्ठ ४२ श्लोक ९०-९१ यांमध्यें पुढील पद्य आहे:—

जयत्सेन नाकुलाभिधान रे! जयद्वल सहादेव जाण रे!।
मालिनी सती नाम ठेवुनी चालिले पुढें सिद्ध होउनी ॥ १

अध्याय तिसरा.

पृष्ठ ६० श्लोक ५२-५३ यांमध्यें पुढील श्लोक आहे:—

झाला प्रसन्न रवि तेक्षणिं ते सतीला,
कांती पित्यासम असे तनुभासतीला।
धाडी पुढें सतिस रक्षण सेवकांशी
'जा, निर्भयें' वदलि वाणि अशी अकाशीं. ॥ १

पृष्ठ ७० श्लोक १७८-१७९ यांमध्यें हा श्लोक आहे:—

प्रदीप्त वासी तनु ताप रीती, संतप्त तैसी बहुतां परी ती।
संतोषवूनी मग भीम तीला, नृपालया पाठविलें सतीला ॥ १

दंपत्यचरित्र.

पृष्ठ १७२ श्लोक १२-१३ यांमध्यें हा श्लोक आहे:—

पाहोनियां ते द्वय मेहुने हो!, झालों कृतार्थ म्हणती वय मेहुनेहो।
ऐसा विचार तरि येथ रमापतीचा, किंवा तरी कवन तेथहि वामनाचा. ॥ १

भूगोलवर्णन.

पृष्ठ १८६ पद्य ८६ च्या शेवटीं आणि ८७ च्या आरंभीं ही ओंवी आढळते:—

जंबुद्विप यासि सारा। क्षारसागराचा फेरा।
कोटा भोंवताला घेरा। उदकाचा ये रिती ॥ १

नामसुधा.

अध्याय पहिला, चरण दुसरा.

पृष्ठ १९८ श्लोक १४-१५ यांच्यामध्यें हा श्लोक आहे:—

करी प्रायश्चित्तें, तनु विविध तीर्थांत बुडवी,
व्रतें नाना कर्में करुनि, हरिभक्तीस उडवी,।
पवित्रें तीं देऊं न शकति, तया पावनकळा
सुराभृद्भांडातें त्रिभुवन नद्या जेंवि सकळा. ॥ १

---

१. 'येथहि मापतीचा' असाही पाठ आहे. २. 'किंवा जरी कवण तेथहि मानवाचा' असाही अन्य पाठ आहे.

अध्याय तिसरा; चरण चौथा.

पृष्ठ २४२ श्लोक ३-४ यांच्यामध्यें हा श्लोक आहेः—

जिव्हा कधीं न भगवद्गुण नाम वर्णी, चिंती न, तत्पदकथा न कदापि कर्णी ।
नाहीं कदापि नमिला, जिहिं देवराणा, दूतां म्हणे यम 'तया नरकासि आणा.' १

बाळक्रीडा. (प्रथम.)

पृष्ठ २९४ श्लोक २५-२६ यांमध्यें हा श्लोक आहेः—

एवं धाष्टर्या म्हणुनि वदती श्लोक शब्दीं पुराणीं
भावार्थाची उपजविली जे व्यासपुत्रें शिराणी ।
ऐसीं धाष्टर्यें म्हणुनि वदतो जेधवां धीट वाणी
इत्यादि श्रीहरि न वदला सत्य आश्चर्य वाणी. ॥ १

पृष्ठ ३०३ श्लोक १०१-१०२ यांमध्यें हा श्लोक आहेः—

देवकीतनय मी वसुदेव, जन्मतां मज जसा वसुदेव ।
गोकुळीं त्वरित आणुनि ठेवी, दाविली तरि तुम्हांप्रति ठेवी. ॥ १

उखळबंधन.

पृष्ठ ३१३ श्लोक ५४ यापुढें पुढील श्लोक आहेः—

हा ग्रंथ ऊल्लूखल नाम ज्याला, ऊल्लूखलीं बंधन त्या अजाला ।
स गो गण (?) प्रेमकळाप्रदा मी, बांधोनि यातें सकळां प्रदामी. ॥ १

वनसुधा.

अध्याय पहिला.

पृष्ठ ३१५ श्लोक १८-१९ या श्लोकांमध्यें हा श्लोक आहेः—

वनीं मुलें खेळति ते अशीं कीं, परस्परें चोरुनि नेति शीकीं ।
जो घे त्वरें हास्य करुनि देतो, न घेच जो गोष्टि तसी वदे तो. ॥ १

अध्याय चौथा.

पृष्ठ ३२४ श्लोक १२-१३ यांमध्यें ही गीति आहेः—

कर्दलिदलशत पत्रीं दशशतपत्रीं मऊ शिला पात्रीं ।
पुष्पीं चित्रविचित्रीं जेविति पात्रीं, तरूचिया पात्रीं. ॥ १

पृष्ठ ३२५ श्लोक १६-१७ ह्यांमध्यें हा श्लोक आहेः—

स्थूळ आपण जनीं अतिमान, क्षुद्र देह न जया अभिमान ।
भोग भोगुनिहि धाक असेना, मित्र आणि समहोरि पुसेना ॥ १

हरिविलास.

पृष्ठ ४०८ श्लोक २५-२६ यांमध्यें हा श्लोक आहेः—

देखे स्वकृष्णें यमुनेसि कृष्णा, कीं दूषितो तीस भुजंग कृष्णा ।

करावया शुद्धि तिची हरी तो, बाहेरि घाली, भव जो हरीतो. ॥ १

यज्ञपत्न्याख्यान.

पृष्ठ ४७४ श्लोक २८-२९ यांमध्यें हे श्लोक आहेत:—

वन अशोक तरू नव पल्लवीं, रुचिर त्यांत सहाग्रज बल्लवीं ।
हरि दिसे, शुक ये रिति बोलतो, परि मनीं परमार्थ सखोल तो. ॥ १

अशोकां धीरांच्या तनु बनि सुशोभा पदलवीं,
नखें श्रीकृष्णाच्या अभिनव गमे जीं प्रतिलवीं ।
हरी तेथें क्रीडे म्हणुनि रस ऐसा स्रवतसे,
अशोकांचे जेथें कथि शुक नवे पल्लव तसे. ॥ २

पदां दोंची व्याख्या प्रकट दिसते पल्लवपदीं,
न त्यामध्यें हो ! तें प्रथम पद नंदात्मजपदीं ।
नखें त्यांचीं त्याचें लव मुनि असें सूचवितसे,
भले घेती येथें पदलव रसाची चवि तसे. ॥ ३

हरी तेथें क्रीडा करुनि नटवेषास मिरवे,
घनश्यामा देही मणिमय अलंकार बरवे ।
गळां माळा, कर्णीं वरिच, अलकीं उत्पलकळ्या,
पहातां त्या रूपा मनिं उठति, संतोषडकळ्या. ॥ ४

पृष्ठ ४७५ श्लोक ३६-३७ यांमध्यें हे श्लोक आहेत:—

आत्माच तो परम मी म्हणऊनि मातें, जाणोनि संत भजती पुरुषोत्तमातें ।
जे हेतु वर्जित विनाव्यवधान साची, हे स्वात्मभक्ति मज अर्पिति मानसाची. १

सकळ आत्मनिमित्तचि आवडी, जन तदर्थ समस्तहि सावडी ।
किमपि हेतु नसोनिहि जो प्रिय, क्षणभरी परि होय न अप्रिय. ॥ २

पृष्ठ ४७५ श्लोक ३७-३८ यांमध्यें हे श्लोक आहेत:—

स्वात्माच कृष्ण म्हणुनि प्रिय ज्यांस वाटे, हे दोनि कंटक तयांस न त्या सुवाटे।
भक्तीस हेतु अरुचीस निमित्त कांहीं, कां आढळेल सकळात्मउपासकांहीं. ॥ १

म्हणूनि म्हणतो हरी कुशल जो तदर्थी असें
स्वबोध तनु ते मला म्हणति हा निजात्मा असे ।
स्वभक्तिच अहेतु कीं करिति हेतु जेथें सरे
न अप्रिय कभीं असे व्यवहितत्वही ओसरे. ॥ २

---

१. 'बल्लवपदीं' असाही पाठ आहे.